कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह
दाखल क्र M 1377 विषय अद्वैत वेदान्त
नाव. ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान (मराठी) संस्कृत
लेखक/लिपिकार श्री. ह्र. ह्र. धर्माधिकारी आनंद
पृष्ठ 163 काळ इ.स. 1968 पूर्ण/अपूर्ण

॥ श्री ॥

ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान

सविवरण व त्याच्या व्याख्याना सह

यांच्यातील

अव्यवहित विषय वेदान्तविचार विषयक

विस्तृत द्वितीय वर्णक
व तृतीय वर्णक भाग १

(प्रेसकॉपी)

भाग ५

M1377
11/12/07

॥ श्रीः ॥

ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान
सविवरण व त्याच्या व्याख्यानासह
यांच्यातील
अव्यवहित विषय वेदान्त विचार विषयक
विस्तृत द्वितीय वर्णक

व

ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान
सविवरण व त्याच्या व्याख्यानासह
यांच्यातील
या वेदान्तमीमांसा शास्त्राच्या अधिकार्यादि
साधक अर्थादि पदार्थ विचाररूपी
तृतीय वर्णक

॥ अथ अव्यवहितविषयवेदान्तविचारविषयक विस्तृत-द्वितीय वर्णक ॥

॥ व्याख्यान ॥

४२।१ पण 'अथातो धर्मजिज्ञासा' [जै. सू. १।१।१] अशीं पूर्वतंत्रांत ~~धर्म~~ ब्रह्म जिज्ञासा सिद्ध आहे.

॥ विवरण ॥

११०।१ पूर्ववर्णकांत विचाराच्या विधीचा फलानुबंध व अव्यवहितविषय ब्रह्माचा अनुबंध सांगितला. आतां अव्यवहित वेदान्तविचार स्वरूपी विषयानुबंध दुसरीकडून अप्राप्त अनुष्ठानाय शास्त्रविधिकरितां प्रथम पूर्वपक्षाकडून आक्षेपाला अवतीर्ण करितात — 'पण अथातो धर्म ?' ~~इत्या~~

॥ विस्तृतव्याख्यान ॥

३७३।१ 'पण विचारविधीला अपेक्षित अधिकारी विषय व फलानुबंध यांत विषय व फल यांचें प्रतिपादन केलें; अर्थात् अधिकारी ही सिद्ध आहे. म्हणून 'पण अथातो धर्मजिज्ञासा अशीं पूर्वतंत्रांत' इत्यादिकाचा काय उपयोग? ~~[illegible]~~ विचाररूपी विषयाला शास्त्रविधि याकरितां दुसऱ्या वर्णकाचा आरंभ आहे? अशी ही शंका घेतां येणार नाहीं. कारण त्याला असंदिग्धत्वानें अप्रतिपाद्यत्व आहे. गतार्थत्व अगतार्थत्वानें संदेह असतांही या विचाराचा प्राथम्य कां असूं नये? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात: 'पूर्ववर्णकांत' विधीशीं जो अनुबंधाला प्राप्त होतो तो अनुबंध, फलरूप जो अनुबंध तो फलानुबंध. 'फलानुबंध २ (= संबंधाला) 'अव्यवहितविषय' - विचारविधिकाच्यापासून उत्पन्न झालेल्या ज्ञानाचा वेदान्त ~~[illegible]~~ साक्षात् विषय असून परंपरेनें ब्रह्मालाही आहे. असा येथें विग्रह जाणावा. अनर्थनिवृत्ति व आनंदप्राप्ति फलाला इष्टत्व असल्यामुळें व ब्रह्माला अज्ञातत्व असल्यामुळें (~~[illegible]~~ वेदान्तांच्या) त्यांच्या विचाराला प्राथम्य आहे; ~~[illegible]~~ विचाराला प्राचीन तंत्रन्यायानें सिद्धार्थत्व असल्यामुळें त्याला पुनः कर्तव्यता नाहीं. कारण अनन्यसाधारणाला विषयत्व असतें अशी आशंका असतां विचारानिरासाकरितां या वर्णकाची प्रवृत्ति आहे असें त्यानें पौर्वापर्य सूचक आहे. असा अर्थ. या वर्णकांत विचारशास्त्र विषय आहे. तें आरंभ करावें किंवा करूं नये? अशा गतार्थ अगतार्थत्वानें संदेह असतां पूर्वपक्ष सांगतात: 'प्रथमं पूर्व-

॥ व्याख्यान ॥

कारण सकळ वेदार्थ विचाराचा तेथें उदय झालेला आहे; व ब्रह्मज्ञानालाही चोदना-

॥ विवरण ॥

वेदान्तांना अर्थनिर्णयाकरितां अपेक्षित न्यायकलाप 'अथातो धर्मजिज्ञासा' इत्यादि सूत्रांनीं सूत्रित आहे असा अर्थ. पण विधिवाक्यार्थनिर्णयांतच प्रवृत्त आहे? अशी आशंका घेतली असतां सांगतो- 'कारण सकळ' कारण विद्या कार्य मात्र परत्व आहे. असा अर्थ. पण वेदान्ततात्पर्यावरून ब्रह्मज्ञान हें कार्य नव्हे, व केवळ असलेल्या वाच्याचें प्रमेय नसतें? त्यावर सांगतो- 'ब्रह्मज्ञानालाही'

॥ विवरणव्याख्यान ॥

वादी: 'पण धर्मजिज्ञासा' येथें ब्रह्मजिज्ञासा सिद्ध आहे हें कसें? कारण त्यांना वैय्याधिकरण्य आहे. धर्मात्र कृतक तर ब्रह्म मात्र ~~[illegible]~~ अनित्य असेल जाणविण्याकरितां समर्थ झालें नाहीं? अशी आशंका असतां सांगतो- 'वेदान्तांना अर्थनिर्णयाकरितां' अथवा ब्रह्मप्रतिपादक वाक्यांचें उदाहरण घेऊन पूर्वतंत्रांत विचार केला नसल्यामुळें त्याला गतार्थत्व कसें? अशी आशंका असतां वाक्यांचे उदाहरण नसलें तरी त्यांना प्रतिपादक न्यायसंदर्भ तेथें सिद्ध आहे असें सांगतो- 'वेदान्तांना अर्थनिर्णयाकरितां' पूर्वोत्तर मीमांसेंत विषयभेदासारखी शंका घेतात- 'पण विधिवाक्यार्थ' पूर्वोत्तर कांडांतील भिन्न प्रमेयांनीं त्यांच्यातील न्यायही भिन्न आहे असा अर्थ. पण पूर्वतंत्रांत धर्माचा विचार केला असून ब्रह्माचा विचार केला नसल्यामुळें तेथें सकळ वेदार्थांचें निरूपण कसें? अशी आशंका असतां सांगतो- 'कारण विद्या' लोकांत सर्व पदांचें कार्यपरत्वें संगतिग्रहण असल्यामुळें कार्यच वेदार्थ आहे. व त्याचें तर तेथें निरूपण असल्यामुळें मग काय अवशिष्ट आहे कीं ज्याच्याकरितां पुनः आरंभ केला जावा? असा अर्थ. सकळ वेदाला कार्यपरत्व सांगितलें त्यावर आक्षेप घेतात- 'पण वेदान्ततात्पर्यावरून' "आत्मा वा अरे द्रष्टव्यः" इत्यादिकांत ज्ञानविधि उपलब्ध होतो. व तदपेक्षित अर्थप्रतिपादक इतर वाक्यें आहेत. तेव्हां वेदान्तांना (~~[illegible]~~) अकार्यनिष्ठत्व कसें? अशा आशंकेनें (~~उपासनेला~~) सांगतो- 'त्यावर सांगतो' पण विधिपरत्व समान असलें तरी विधींना भिन्नत्व असल्यामुळें त्यांच्या अर्थांच्या निरूपणाकरितां पृथगारंभ आहे? अशी (सिध्दा

६२४

॥ ०व्याख्यान ॥

७२।३ लक्षणत्वाने धर्म ~~(विकरण)~~ रूपत्व आहे. म्हणून अभ्याधिक शंकेचा अभाव असल्यामुळे पुढे

विवरण ~~[illegible]~~

११०।८ पण क्रियाविधिकलाप येथें निरूपित आहे. ज्ञानविधीचें निरूपण करण्याकरितां हें शास्त्र आरंभिलें जातें याकरितां असें सांगतो – 'म्हणून ... ब्रह्मजिज्ञासा सिद्धच आहे'. ११०।९ कारण विधीला अपेक्षितरूप असा उत्पत्ति, विनियोग, प्रयोग अधिकारांना क्रियाविधिसंप्रतिपत्ति (=ज्ञान) विधीत असल्याने निरूपितत्व आहे. असा अर्थ. ११०।१० पण जसें प्रथमाध्या-

६२४।६२४

॥ विवरणव्याख्यान ॥

एकदेशी शंका घेतात – 'पण क्रियाविधिकलाप'. विधिभेद असतांही न्यायसामान्यामुळें पुनः आरंभाची अपेक्षा नाहीं असें सांगतो – 'त्यावर नाहीं असें सांगतो'. न्यायसामान्य दाखवितो – 'कारण विधीला'. याचा हा अर्थ – कार्यस्वरूपमात्रबोधक विधि उत्पत्ति विधि. जसें "आग्नेयोऽष्टकपालः" इत्यादि. ३८४।१८ अंगसंबंधबोधक विधि विनियोगविधि. जसें "प्रयाजादिकांनीं उपकार करून" इत्यादि. सांगकर्माचा अनुष्ठापक विधि प्रयोगविधि. जसें "प्रयाजादिकांनीं उपकार करून दर्शपूर्णमासांनीं यजन करावें" इत्यादि. कामना जीवनादि निमित्तवाला कर्मांत ऐश्वर्य प्रतिपादक विधि अधिकार-विधि. जसें 'स्वर्गकामो यजेत' इत्यादि. ३८४।२५ पण वेदान्तांना विधिपरत्व असलें तरी दुसऱ्या शंकेच्या निरासाकरितां पुनः आरंभ आहे असें (सिद्धान्त्येकदेशी) शंका घेतात – 'पण जसें प्रथमाध्यायांत'. ३८५।१ लोकांत वाक्याला प्रमाणान्तरानें दृष्टार्थबोधित्व नियत आहे. म्हणून वेदालाही तथात्व आहे. कारण "अविशिष्टस्तु वाक्यार्थः" [जै॰सू॰ १।२।४।७०] असा न्याय आहे. परंतु (वेदांत) तें संभवत नाहीं. कारण धर्मांत प्रमाणान्तराची अनुपपत्ति आहे. इत्यादि न्यायावरून वेदाला अप्रामाण्य आहे? असें पूर्वपक्षानें शंका करून सिद्धान्त केला आहे. पुरुषवाक्यांचा तर असा स्वभाव आहे कीं – प्रमाणान्तरानें सिद्ध बोधितत्व असणें. परंतु वेदाला पुरुषबुद्धिरचितत्व नसल्यामुळें कर्तव्य निरूपण करितां येत नसल्यामुळें अनपेक्षता आहे. तसेंच त्याच्या अर्थाचा बाध उपलब्ध होत नसल्यामुळें स्पष्टार्थ अविसंवादित्व आहे. संवादकाभावामुळें अननुवादित्व आहे. अशा न्यायावरून त्याला प्रमाणत्व आहे. असें त्याला प्रथमपादांत प्रामाण्य सांगितलें. पुनः अर्थवादादिकांना धर्मासंबंधी अबोधकतेनें अप्रामाण्याची शंका असतां विधीला अपेक्षित अशा प्राशस्त्यरूप अपूर्वोपकारी प्रत्ययाला विध्यर्थाच्या परिच्छित्तीत (=अपेक्षारूपी मर्यादेत) जननानें अर्थवादाला व अर्थस्मारकतेनें मंत्रांना

॥ विवरण ॥

श्रौत वेदाचें प्रामाण्य निरूपित आहे. दुसऱ्यांत कर्मोत्पत्तिविधिभेद, तिसऱ्यांत विहितांचा अंगांगीभाव;

॥ विवरणव्याख्यान ॥

अपूर्वप्रकारी [illegible] विधेयार्थे [illegible] ज्ञानानें प्रामाण्य (द्वितीयपादांत) सांगितलें. तसें स्मृतींचेंही प्रामाण्य तिसऱ्या पादांत, नामधेयाचें चवथ्या पादांत सांगितलें. अशारितीनें विधि, अर्थवाद, मंत्र, नामधेय, स्मृत्यात्मक वेदाचें प्रामाण्य प्रथमाध्यायांत सांगितलें. असा भाव. वेदापासून श्रेयःसाधनादिकांचें अवबोध भावनादिकांच्या बोधामुळे प्रवृत्त्यादिकांची सिद्धि होते म्हणून दुसरें काय अवशिष्ट आहे? अशा आशंकेच्या निरासानें विध्यंशभेदाचें निरूपण करण्याकरितां द्वितीयाध्यायाची प्रवृत्ति आहे. असा आशय मनें सांगतात- 'दुसऱ्यांत'. कर्मविषयक उत्पत्तिविधींचा भेद असा विग्रह. तेथें तेथें उपक्रम्यमान कर्म एक आहे किंवा नाना? अशी जिज्ञासा असतां जेथें शब्दान्तर, अभ्यास, संख्या, गुण, प्रक्रिया, नामधेय यांतील अन्यतम भेदक प्रमाण उपलब्ध होतें तेथें भेद असतो. अन्यथा नसतो. असें निर्णीत आहे. कारण अन्यथा अनुष्ठानविशेषाचा असंभव आहे. असा अर्थ. विनियोगविधीच्या शेषशेषिसंबंधबोधनलक्षण विनियुक्ति व्यापाराच्या निरूपणाकरितां तृतीयाध्यायाचा आरंभ आहे. परंतु तें अनुपपन्न आहे? कारण काय उपकारित्वामुळे अन्यशेषत्व आहे? किंवा तें परे? दुसऱ्या पक्षीं आधानादिकांनाही शेषत्व येईल. पहिला पक्षही नाहीं. कारण त्याच्या स्वरूप व प्रमाणाचें निरूपण करितां येत नाहीं. पुनः काय परार्थत्व शेषत्व होय? किंवा अन्योद्देशानें क्रियमाणत्व? पहिल्या पक्षीं उपकारकत्वच शेषत्व होतें. दुसऱ्या पक्षीं उद्देश्याला सिद्धत्व आहे? किंवा प्रयोजनाला? पहिल्या पक्षीं स्वर्गादिकाला सिद्धत्व असल्यामुळे तेथें वर्तमान प्रोक्षणादिकालाही त्यानें अंगत्व येईल. दुसऱ्या पक्षीं स्वर्गोद्देशानें प्रवृत्त यागादिकालाही तत्त्व (=प्रयोजनाच्या उद्देशानें क्रियमाणत्व) असल्यामुळे त्यानें उपकारकत्वच येईल. श्रुतिवर शेषशेषीभावास प्रमाण नाहीं. कारण 'सक्तून् जुहोति' इत्यादिकांत व्यभिचार होतो. त्यामुळें श्रुतिमूलक लिङ्गादिकही प्रमाणाभावग्रस्त होतात. अनंगत्व असतां अननुष्ठेयत्वही येत नाहीं कारण आधानादिकांप्रमाणें त्याची उपपत्ति होते? अशी आशंका असतां तिच्या निरासानें विध्यंशभेदाच्या निरूपणाकरितां तृतीयाध्यायाचा आरंभ आहे असें सांगतात- 'तिसऱ्यांत विहितांचा'. त्याच्या स्वरूपाचें निरूपण करितां येत नाहीं असें ही नाहीं कारण सम्यक् इच्छित प्रवृत्तिविषयत्वाधीन प्रवृत्तिविषयत्व

॥ विवरण ॥

चतुर्थांत क्रतुपुरुषार्थ प्रयुक्त अनुष्ठेय परिमाण, पंचमांत अनुष्ठानक्रम, षष्ठांत विधीला अपेक्षित

॥ विवरणव्याख्यान ॥

शेषत्व आहे. त्याविषयीं प्रमाणाचा अभाव होत नाही. कारण श्रुत्यादिकांनाच प्रमाणत्व आहे. अन्यथाचरितार्थ विधीपासून सामान्य संबंध सिद्धि नसतां तर श्रुत्यादिक विशेष सिद्धींत समर्थ नाहींत. त्यामुळें 'सक्तून् जुहोति' इत्यादि वाक्यांत होमाच्या असमीहित सक्तुगत अतिशयाच्या अवबोधित्वाच्या अनुपपत्तीनें त्यांनीं निरपेक्ष श्रुत्यादिकांना तेथें प्रमाणता नाही. ~~[illegible]~~ यागाचें अंग असा अर्थ प्रयुक्त आधानादिकांना तर उपकारकत्व आहे. पण तरतथात्व नाही. कारण दुसऱ्या प्रयोजकाचें निरूपण करितां येत नाहीं. म्हणून शेष: वाक्यानुत्पादनाकरिता. तृतीयलक्षणाचा २ ध्यायाचा आरंभ उचित आहे असा अर्थ. । उक्त न्यायानें इतिकर्तव्यता विशिष्ट कर्मस्वरूप कळलें असतां कामनावानाची किंवा जीवनादि निमित्तवानाची प्रवृत्ति सिद्ध होते असल्यामुळें ~~असल्यामुळें~~ प्रयोगविधीच्या निरूपणाशी काय उपयोग? सांग प्रधानाचें यौगपद्यानें अनुष्ठान सिद्धि तर प्रयोगविधीचें फल आहे. परंतु तें संभवत नाही. कारण प्रयोगविधीला अभिमत फलवाक्यांत अंगाचें अश्रवण आहे. म्हणून चतुर्थाचा आरंभ करूं नये? अशी आशंका असतां चतुर्थाचा आरंभ करावा असें सांगतात– 'चतुर्थांत' – क्रतुशब्दानें विधीला लक्षीत करून त्याच्या प्रयुक्ततेनें अनुष्ठेयाचें व (पुरुषार्थ=) फलप्रयुक्ततेनें अनुष्ठेयाचें परिमाण चिंतित आहे. असा अक्षरार्थ. प्रवर्तकान्तराचें निरूपण करितां येत नसल्यामुळें विधीला प्रवर्तक म्हटलें पाहिजे व सांग प्रधानाचें यौगपद्यानें अनुष्ठान दुसरी कडून संभवत नसल्यामुळें ते प्रयोगविधीच्या आधीन आहे. फलवाक्यांत अंगांचें अश्रवण होत नाही. कारण सांग प्रधानाशी एकवाक्यतेला प्राप्त झालेल्या महावाक्याला प्रयोगविधित्व प्राप्त आहे— असा. । अक्रियाकारकत्वानें क्रमाला अविधेयत्व असल्यामुळें अविहिताला तर अनंगतेनें प्रयोगविधीचें विधेयत्व संभवत नाही. एका कर्त्याला युगपत् अनेकांच्या अनुपपत्तीनें प्रयोगवचनाला क्रमविधायकत्व आहे असेंही नाही. कारण नियत क्रमानें अनुष्ठानाची उपपत्ति होत असल्यामुळें नियतक्रमाची असिद्धि आहे. म्हणून तद्विषयक पंचमाचा आरंभ करूं नये अशी आशंका असतां त्याच्या निरूपणाकरितां याचा आरंभ आहे असें सांगतात 'पंचमांत'

॥ विवरणव्याख्यान ॥

अनुष्ठानक्रम: नियत क्रमानें आस्थान (=ठिकाण) नसतां या कार्य या क्रमानें हें अनुष्ठेय आहे! किंवा अन्यक्रमानें अशा चिंतेने प्रयोगांत विक्षेपाची आपत्ति असतां अविशिष्ट सांग प्रधानांच्या यौगपद्यानें अनुष्ठानाच्या अनुपपत्तीनें नियतक्रम आश्रयणीय आहे. तेथें क्रमाला अक्रियाकारकत्व असतांही श्रुति अर्थ पाठ स्थान ~~प्रवृत्ति~~ मुख्य प्रवृत्ति लक्षण प्रमाणांच्या सद्भावानें, प्रयोगविधीनें स्वांगतेने त्याला (=क्रमाला) अपेक्षित केले जातें. म्हणून क्रमनिरूपण उचित आहे असा अर्थ. ॥ ('यजेत' येथील आख्यातानें सांगितलेल्या) भावनेला भाव्याची साकांक्षा असतां एकपदोपात्त यागादि भाव्यत्वानें संबंधाला प्राप्त होतो. भिन्नपदानें ग्रहण केलेले स्वर्गादि नव्हे. स्वर्गपदालाही सुखसाधनद्रव्यवाचित्व आहे; 'मूर्तं अन्यार्थं पदं ग्रियते' अशा न्यायावरूनही स्वर्गादिकांनी यागादिकांची भावना करावी असा वाक्यार्थ कळतो. त्या आकांक्षेची अनुपपत्ति नाही. कारण साधनालाही काम्यत्व असतें. म्हणून कर्माला अफलत्व असल्यामुळे त्याचें भोक्तृत्वलक्षण कर्मस्वामित्व अधिकाराचा असंभव असल्यामुळे त्याच्या उपपादनाकरिता ह्या (=सहाव्या) लक्षणाचा आरंभ करूं नये? अशा शंकेच्या निरासानें अधिकाराच्या उपपादनाकरिता सहाव्याचा आरंभ करावा असें सांगतात-

'षष्ठांत विधीला अपेक्षित अधिकाराचा निर्णय'. कर्माला फलराहित्य असतां बोधादिक प्रमाण प्रवर्तकत्वानें प्रामाण्य नाहणार नाही. ३८८।१ क्रियात्मकत्वामुळे यागादिकाला स्वतः फलत्व नाही. 'यजेत' येथील प्रत्ययाला केवळ आख्यातरूपत्वच नाही परंतु लिङ् प्रत्ययानें विधिरूपत्वही आहे. त्यांत तो आख्यातत्वाकारानें भावनेला सांगतो विधित्वाकारानें पुरुषाला प्रवृत्त करितो. (=पुरुषाला) पुरुषही स्वाभिमत फळावाचून प्रवृत्त होत नाही. म्हणून त्याला अपेक्षित स्वर्गच भाव्यतेनें बोधग्रहण करितो. स्वर्गशब्दही उत्कृष्ट सुखांत रूढ आहे. द्रव्यांत लाक्षणिक आहे. म्हणून सुखाचें भाव्यत्व विधिश्रुतीनें सिद्ध आहे. यागाचें भाव्यत्व तर एकपदानें प्रतीयमानही प्रत्ययानें कळत नाही. परंतु प्रकृतीनें कळतो. तसें असतां स्वर्गाचें भाव्यत्व भावनेला स्वीकार्य आहे. कारण तें एकार्थ विधिरूप प्रत्ययानें कळतें. कामियोगामुळेही स्वर्गाला भाव्यत्व आहे) म्हणून ३८८।२ श्रेयः साधनांनी युक्त भावनेला प्रत्ययार्थत्व असल्यामुळे एकप्रत्ययानें ग्रहण केलेल्या स्वर्गाला फलत्व आहे. म्हणून त्याचें भोक्तृत्वलक्षण

॥ टिप्पणी ॥

'यजेत' - [illegible]

॥ विवरण ॥

अधिकाराचा निर्णय, अशारीतीने पूर्वपक्षकाने प्रकृतिविषयीचा अपेक्षित विचार केला आहे. समग्र अंगा-

११०।१४ ११०।१५

नी संयुक्त विधि प्रकृति असून विकलांग संयुक्त विकृति म्हटल्या जातात. तेथें सप्तमांत प्रकृतींत उपदिष्ट अं-

॥ विवरणव्याख्यान ॥

अधिकारनिरूपण उचित आहे असा अर्थ. पूर्वोत्तर पक्षांत हेतुहेतुमद्भाव लक्षण संगतीचे कथन करण्याकरिता पू-
र्वपक्षार्थाला संकलित करितात - "अशारीतीने". प्रकृति व विकृतीचे स्वरूप सांगतात - "समग्र अंगांनी". दर्श-

३०८।८

पूर्णमास सोमयागादि प्रकृति असून "सौर्यं चरुं निर्वपेत्" इत्यादि विकृति होते. । अतिदेशाचे निरूपण
करण्याकरिता जरी अध्यायान्तराचा आरंभ कर्तव्य आहे तरी तो उपपन्न होत नाही कारण सर्वत्र उपदेशानेच सर्व धर्म प्राप्त
होतात. ते असे - करणभूत धात्वर्थाला अंगांची अपेक्षा असल्यामुळे त्यांच्या उद्देशाने धर्मांचे विधान केले जाते.
यजादि श्रुतिसामर्थ्यावरून नहीं प्रतिपन्न सर्व धात्वर्थांना प्रकरणादिद्वारे विशेषित करणे शक्य असल्यामुळे
उद्देश्यत्व आहे. ग्रहालाही उद्देश्यत्वाने एकत्वाने अविवक्षित आहे. म्हणून यागादिमात्र उद्देश्याने विधीयमान ध-
र्मांना विकृतींतही उपदेशानेच प्राप्तत्व असल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाला वैयर्थ्य आहे अशा शंकेच्या निरासाने विधि-

३८८।१६

भेदाच्या उपपादनाच्या इच्छेने सप्तमाचा आरंभ केला पाहिजे असे सांगतात - "तेथें सप्तमांत". भावनेच्या प्राधान्यामुळे
तिच्या आकांक्षेने अंगांचा संबंध सांगितला पाहिजे. तेथेंही त्यांच्या साक्षात् अन्वयाची अनुपपत्ति असल्यामुळे भा-
गाहून करणसंबंध प्राप्त होतो. सकल भावना संबंधित्वाने तर अंगांची अधिगति नाही. कारण भावनेचे विधेयत्व आहे.
धर्मविधींतही विधेयत्वामुळे प्रकरणादिकांनी विशेषणाची उपपत्ति होत असल्यामुळे प्रतिप्रकरणांत धर्मांचे व्यवस्थितत्व आहे.
तेथें तर सौर्यादि कर्मे आविहित इतिकर्तव्यता असेच लक्षित होतात. इतिकर्तव्यता अनुगृहीत अशा करणांनाच उपकार-
कत्व दिसत असल्यामुळे येथेंही त्यांची अपेक्षा असतां प्रयाजादि वैदिक पदार्थ वर्गाने दर्शपूर्णमासादिकांच्या उपकारकत्वाने
सामर्थ्य कल्पित असल्यामुळे त्यांच्या उपकारकत्वाची कल्पना केली जाते असे अतिदेशाचे सिद्ध होते असा अर्थ ।

विशेषातिदेशाला निरूपण करण्याकरिता लक्षणान्तर (= अध्यायान्तर) प्रवृत्त होते. परंतु ते युक्त नाही कारण विकृतीतील

॥ विवरण ॥

गांच्या विकृतीत अतिदेश निर्णीत आहे. अष्टमांत तर "आग्नेयोऽष्टाकपालः" इत्यादि प्रकृतींत उपदिष्ट अंगांच्या "सौर्यं चरुं निर्वपेत्" इत्यादि विकृतींस द्रव्य देवतादि सामान्य द्वाराने विशेषातिदेश निरूपिला आहे. नवमांत तर प्रकृतीत उपदिष्ट व विकृतींत अतिदिष्ट अशा मंत्रसाम व संस्कार कर्मांच्या प्रकृति विकृतीतील द्रव्य देवतांच्या

॥ विवरण व्याख्यान ॥

भावनेच्या विधीतील आकांक्षेने अतिदेश प्राप्तिसमयीं विशेषाकरितां हेतु दिसत नाही. कारण ज्या प्राकृत कर्मांना सकळ विधींनीच अतिदेशाचीच उपपत्ति होते. पण करण विधीतील आकांक्षेला उपकाराकरितां अपेक्षित करिते. प्रकृतीत ही सकळ विधीतील करणांना उपकारकत्वाने कल्पितत्व नसल्यामुळे विशेषातिदेश आहे असें असल्यास तथापि नियामकाचा अभाव असल्यामुळे ज्या कोणत्याही अतिदेश होईल अशी आशंका असतां तिच्या निराकरणाने विशेषातिदेशाचें येथें निरूपण केले आहे, असें सांगतात- 'अष्टमांत तर'. सर्वांच्या इतिकर्तव्यतेच्या उपकारकत्वांत तर प्रमाण नाही. विधीतील त्याची विशेषकल्पकत्वाच्या अभावही नाही. कारण याला प्रकृतीतील कल्पित उपकारकत्व आहे. म्हणून सादृश्यामुळे ~~ही~~ कल्पना संभवते. कसें तर अग्नि यागांची प्रवृत्ति एकदेवतात्वाने, ऐन्द्राग्नांची द्विदैवतत्वाने, अग्नीषोमीय दैक्ष्य पशूची पशुबंधांतरांत प्रकृति द्रव्यसादृश्याने, एकादशिनी सवनीयाची सुत्याकालत्व सामान्यामुळे असा अर्थ. । प्रकृतींत करणावच्छिन्न तर भावना प्रतीत होते. अंगभूत दर्शपूर्णमासांच्या स्वरूपाच्या आकांक्षेने ही इतिकर्तव्यतेच्या अन्वय होतो व असें असतां "अग्नये जुष्टं निर्वपामि" इत्यादि मंत्रांना व अवघातादि संस्कारांना साधनांश प्रयुक्तत्व असतांही आग्नेयादि स्वरूप साध्यांश प्रयुक्तत्वाने उपपत्ति असल्यामुळे व यागांस तर साधनांत नीवार सूर्यादिकांत अप्राप्ति असल्यामुळे ऊहाच्या अयोगामुळे त्याच्या अनुमादनाकरितां नवम लक्षणाच्या आरंभ करणे नये अशा शंकेच्या निरासाने विधिव्यापार भेदाच्या निरूपणाकरितां त्याचा आरंभ करावा असें सांगतात- 'नवमांत तर'. भावनेच्या अंशत्रय माध्यमिककरितां करणाच्या व इतिकर्तव्यतेच्या आकांक्षेमुळे करणाच्या व इतिकर्तव्यतेच्या भावनेशीं अन्वय मानाहून यागाच्या अनुग्राह्य अनुग्राहकत्वाच्या आधव सिद्ध्यर्थ त्याकरितां करता असल्यामुळे व फलाचाही अपूर्व द्वारा भाव्यत्वाने अपूर्वाचें साक्षात् भाव्यत्व फक्त असल्यामुळें करणाच्या इतिकर्त-

॥ विवरण ॥

भेद असतां प्रकृतिगत द्रव्यादि शब्दांचा त्याग करून विकृतिगत द्रव्यादि शब्दांचा अध्याहार लक्षण ऊह दाखविला आहे जसा 'अग्नये जुष्टं' या मंत्राला विकृतींत 'सूर्याय जुष्टम्' अशा पदाचा प्रक्षेप आहे. दशमांतंतर प्रकृतींत सावकाश अशा विकृतींत अतिदिष्ट अंगांच्या विकृतीतील विशेष अंगाच्या उपदेशाने बाध दर्शविला आहे. जसे प्रकृतीपासून विकृ-

॥ विवरणव्याख्यान ॥

त्यांतील अन्वय अपूर्वसाधन प्रयुक्त असून स्वरूप प्रयुक्त नाही असें प्रतीत होत असल्यामुळे संस्कारांना व मंत्रांना अपूर्वसाधनांश प्रयुक्तत्व आहे. म्हणून, व नीवार सूर्यादिकांतही अपूर्व साध्यत्व समान असल्यामुळे अतिदेशाने प्राप्त ~~म्हणून~~ मुळें अनूदित व्रात्यांना त्यांच्यावर उपकार करण्याच्या अशक्तीमुळे ऊह स्वेच्छुत्पादन उचित आहे असा अर्थ. अग्नि सूर्य रूपाने देवताभेद असतां अतिदेशाने प्राप्त "अग्नये जुष्टं निर्वपामि" या मंत्राच्या प्रसरणाची विकृतींत अनुपपत्ति असतां अग्निपद परित्यागाने सूर्यपद प्रक्षेप असा मंत्र ऊह. "गिरा गिरा च दक्षसे" येथील गिरापद परित्यागाने इरापद प्रक्षेप, असा सामाचा ऊह, द्रव्यान्तर संबंधी अवघातादिकांचा द्रव्यान्तराशी संबंध असा संस्काराचा ऊह येथे दर्शविला आहे. । विकृतींत लुप्तकार्य अशा प्रकृतीतील अंगांचे अननुष्ठेयत्व उपपादन करण्याकरिता दशमाचा आरंभ केला जातो. परंतु हे संभवत नाही कारण विकृतीतील अवघात इतिकर्तव्यतेची अपेक्षा करिते. तेथें तिचे ~~म~~ अवघात असतां अतिदेशाने प्राप्त अशा तिचा आश्रय केला पाहिजे. तिचे कार्य तुषविमोकादिकांचे नंतर असंभव असल्यामुळे, तिचा (अवघाताचा) ~~त्याचा~~ येथे बाध होतो? असेही म्हणतां येणार नाही कारण प्रकृतीत उपकार कल्पनेच्या पश्चात् ज्ञानोत्तरकालीनत्व असल्यामुळे. विकृतींतही प्रथम पदार्थांची प्राप्ति होत असल्यामुळे तेथें दृष्ट अतिशयाच्या असंभव असतां "कृष्णलान् धृते श्रपयति" इत्यादिकांत जशी कृष्णलादिकांत अदृष्टाची कल्पना केली जाते त्याप्रमाणे येथेही? असें प्राप्त झाले असतां त्याच्या निरासाने प्रयोगविधीच्या व्यापाराने निरूपण करण्याकरितां लक्षणान्तराचा आरंभ करतात.

असें सांगतात - "दशमान्तर"? करणाच्या वरील उपकाराची आकांक्षा करणाऱ्या ~~श~~ विज्ञातकरण विशेष अशा विकृतीतील भावनेने प्रकृतीतील भावाचा उपकार आक्षिप्त केला जातो. त्या उपकारार्थी पदार्थ तंत्रत्व असल्यामुळे त्यांचा (~~प्रधानांच्या~~ (भावांचा) (~~[illegible]~~) आश्रय

॥ विवरण ॥

तीनं अग्नि देशाने प्राप्त बर्हींच्या "शरमयं बर्हिः" अशा विकृतीतील विशेषोपदेशाने बाध होतो. एकादशांत तर अनेक शेषी विधीने प्रयुक्त शेषाच्या एकदां अनुष्ठानापासून सर्व शेषींना उपकार साम्य असें तंत्र नामक सांगितले आहे. जसें "आग्नेयोऽष्टाकपालः" "उपांशुयाजमन्तरा यजति" "अग्नीषोमीयमेकादशकपालम्" अशा पौर्णमास कर्मत्रयाने प्रयुक्त प्रयाजादिकांच्या एकदां अनुष्ठानानेच त्या शेषित्रयावर उपकार होतो- असे.

विवरणव्याख्यान

आहे. तेथें तर प्रकरणाचा लोप असतां त्यांतही लोप होतो. तसेंच अवघातकार्य तुषविमोकादिकांचा कृष्णलादिकांत असंभव असल्यामुळे नकुशादिकार्य अशा वेदीतील आस्तरणादिकांची प्रत्यक्षउपदिष्ट शरमयादिकांनी सिद्धि होत असल्यामुळे त्यांच्या अनवस्तरणामुळे बाधाचें निरूपण उचित आहे म्हणून ~~त्याचे~~ ते तंत्र निरूपण करण्यास योग्य आहे. कारण त्याचा असंभव आहे. असा अर्थ । दर्शपूर्णमास व ज्योतिष्टोमादिकांत तर अंगांच्या तंत्राचें एकत्व अनुपलब्ध आहे. ते प्रयोगाच्या ऐक्याच्या अभावाच्या निबंधनाने आहे? असेंही नाही. कारण आग्नेयादिकांतही प्रयोगैक्याचा असंभव असल्यामुळे तंत्राची अनुपपत्ति आहे. त्यांच्यात एकफल साधनत्वाने प्रयोगैक्य आहे? असेंहि नाहि कारण त्यांच्या उत्पत्ति वाक्यांत त्यांना अन्योन्य निरपेक्षत्वाने फलकरणत्व आहे. अशा रितीने (तंत्राच्या करिता) अनारंभाची शंका असतां तिच्या निरसनाने प्रयोगविधीच्या व्यापारभेदद्वारविषयाश्रितां आरंभ आहे. असे सांगतात- "एकादशांत तर." जरी उत्पत्तिवाक्यांत प्रत्येकाला फलसाधनता दाखविली आहे तथापि फलविशेषाच्या आकांक्षेला परिपूरक फलवाक्यांत त्यांना एकसाध्याचें साधनत्व तृतीयाश्रुतीने कळते. म्हणून एक फलसाधनतेने एकप्रयोगाच्या अंगतेने अंगतंत्राची उपपत्ति होत असल्यामुळे त्याचें (तंत्राचे) प्रतिपादन उचित आहे असा अर्थ ।

पशुतंत्रमध्येंपतित पुरोडाशाख्य कर्माला पशुविधिमध्ये उद्देशाने अनुष्ठित अंगजनित उपकार ग्राहित्व नाही. कारण अनुद्दिश्यमान पुरोडाशादिकांत उपकारित्वाविषयी प्रमाणाचा अभाव आहे. त्यामुळे प्रसंगाची अनुपपत्ति आहे म्हणून त्याच्या प्रतिपादनाकरिता लक्षणान्तराचा आरंभ करू नये? अशा शंकेच्या निरासाने विधीच्या व्यापार भेदाच्या

॥ विवरण ॥

इत्यत्रोत्तर एकोदेशीनें प्रयुक्त शेषानुष्ठानाच्या अप्रयोजक सामर्थ्ययुक्त दुसऱ्या शेषीतही उपकार प्रसंगनात्मक स्वरूपाचा आहे; जसें पशुविधि प्रयुक्त अंगांच्या पुरोडाशांतही उपकार आहे. अशा रीतीनें प्रत्यक्ष अ-
१११।४ (= जाणणाऱ्याचे)
ध्यायांत शंका निराकरणानें जसा विध्यंश भेद निरूपित आहे तसा - प्रतिपत्तव्य ब्रह्म प्रत्यक्षादिकांच्या योगानें असिद्ध असल्यामुळें प्रतिपत्ति विधीच्या अप्रयोगाची आशंका असतां तिच्या निराकरणाकरितां या शास्त्राचा आरंभ
१११।६
कसा जुळतो? त्यावर सांगतो - '**अबाधकें शब्द त्यांचा अभाव असल्यामुळें**'. यूप आहवनीयादिकांप्रमाणें ब्रह्माची

॥ विवरणव्याख्यान ॥

निरूपणाकरितां द्वादशाध्यायाचा आरंभ आहे असें सांगतात - 'इत्यत्रोत्तर'. प्रधानोद्देशानें अंगांचें विधान असतांही सामर्थ्य वर्तल्यामुळें ना-अन्यत्र उपकारकत्व आहे; जसें जामाताकरितां स्थापित दीपाला अन्योपकारकत्व आहे. म्हणून हें प्रासंगिक उपकार आहे. शास्त्रप्रमाणकत्व असल्यामुळें त्याच्या प्रतिपादनाकरितां लक्षणान्तर उचित आहे असा अर्थ. अप्रयोजक असून जो सामर्थ्यानें युक्त तो अप्रयोजकसामर्थ्ययुक्त. "अग्नीषोमीयं पशुमालभेत" हा पशुविधि आहे. त्यानें प्रयुक्त जो प्रयाजादि अंगें त्यांनी केलेला तर उपकार पशुपुरोडाशाच्या एक भागांतही समान आहे. असा अर्थ. दृष्टान्ताचा उपसंहार करितात -
३८१।२८
'अशा रीतीनें' सांगितलेल्या विषयावरून दार्ष्टान्तिकाचा सांगतात - 'तसा प्रतिपत्तव्य'. वेदान्तविचार स्वतः असल्यामुळें वेदान्तापासून हें (~~[illegible]~~) ब्रह्माची सिद्धि होत नाही असें जाणावें. प्रतिपत्तव्य ब्रह्माच्या अभावामुळें प्रतिपत्ति विधीच्या असंभवाबद्दल (पूर्व) सांगितलें असल्यामुळें अबाधक शंकेचा अभाव कसा? त्यावर सांगतो - 'यूप आहवनीयादिकांप्रमाणें'. याचा हा अर्थ - 'यूपं तक्षति', 'यूपमष्टाश्रीकरोति' "खादिरो यूपो भवति" इत्यादि वाक्यांच्या पर्यालोचनानें तक्षणादि संस्कार विशेषविशिष्ट दारुविशेष यूप अलौकिक ही विधिपर वाक्यावरून निश्चित होतो. किंवा असा अलौकिक ही आहवनीय 'अग्नीनादधीत' इत्यादि वाक्यावरून संस्कृत अग्नि निश्चित केला जातो. किंवा स्वर्गकाम पदार्थ सह इत्यादि प्रमाणत्वामुळें अलौकिक ही अपूर्व कळतें. तसें विधिपर ही सत्यादि वाक्यापासून अलौकिक ही ब्रह्माची सिद्धि होते. - असा. पण इतर ही प्रत्यक्षादिकांच्या विरोधामुळें अन्यपर वेद त्याचा साधनाकरितां समर्थ नाही तरी अशी आशंका

॥ ०व्याख्यान ॥
४२।३

ब्रह्मजिज्ञासाही सिद्धच आहे. येथे कोणी अभ्यधिक आशंकेचा संभव दाखविणारे ब्रह्मजिज्ञासेला पृथक् आरंभ करितात. कोणती ही येथे अभ्यधिक आशंका? — "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः" [जै. सू. १।१।२] असे बोलणाऱ्या जैमिनींनीं विधीचे प्रामाण्य दाखविले आहे. येथे (वेदान्तांत) कांहीं वाक्यांत विधीचे श्रवण होत नाहीं. जसें "सदेव—

॥ विवरण ॥

६३२।६३३

सिद्धि होते- किंवा असिद्धि असतां आरोपित रूपानेही उपासनेसाठी सिद्धि होते असा अर्थ. येथें पूर्ववादी सिद्धान्त्येकदेशीयांना दूषित करण्याकरिता वेदान्तांचे विधिनिष्ठत्व अंगीकार करून जी अभ्यधिक आशंका तिच्या निराकरणाकरितांच त्यांच्या आरंभप्रकाराला दाखविले- 'येथें कोणी'. पण क्वचितच विधीचे श्रवण असले तरी विधीने आकांक्षित अनुबंध समर्पणाने व्यवहित हो वेदान्तवाक्यजात त्याच्याशी एकवाक्यतेने संबंधाला प्राप्त होते.

(विवरणव्याख्यान)

६३३।६३३

असतां सांगतो- 'किंवा असिद्धि असतां'. 'वाचं धेनुमुपासीत' इत्यादिकाप्रमाणे आरोपित ब्रह्माची उपासना संभवत असल्यामुळे अभ्यधिक शंका नाही असा अर्थ. आरंभाचे समर्थन काय पूर्वपक्षीचे आहे किंवा सिद्धान्तीचे? पहिला पक्ष बरोबर नाही कारण ते अनारंभवादी आहे. दुसरा पक्ष ही नाही कारण विधीच्या अंगीकाराने आरंभाचे समर्थन आहे. व सिद्धान्तींनीं तर त्याचा अंगीकार केला नाही? अशी आशंका असतां सांगतात- 'येथें पूर्ववादी'. येथें = अनारंभाची शंका असता. सिद्धान्त्येकदेशीयांना दूषित करण्याकरिता पूर्वपक्षी त्यांच्या आरंभप्रकाराला दाखवितो. असा संबंध. सिद्धान्तींना अभिमत आरंभप्रकाराहून वैलक्षण्य दाखविण्याकरिता 'वेदान्तांचे' विधिनिष्ठत्वाला अंगीकार करून जो हा आरंभप्रकार त्याला दाखविले. असा संबंध. विधिविचारापूर्वी सिद्ध झाला असल्यामुळे पुनः आरंभ करणे व्यर्थ आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'कोणी अभ्यधिक आशंका'. विधिरहितही 'सोऽन्वेष्टव्यः' इत्यादि वाक्यांना ज्याप्रमाणे विधीला अपेक्षिताच्या प्रतिपादकत्वाने प्रामाण्य आहे. तसें सत्यादिवाक्यांनाही आहे? अशी शंका घेतो- 'पण क्वचितच'. 'क्वचितच' = 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः' इत्यादि वाक्यांत असा अर्थ. 'अनुबंध समर्पणाने' = विधीला अपेक्षित विषयाच्या समर्पणाने असा अर्थ. अपेक्षिताला पूर्ण करितात—

॥ व्याख्यान ॥

सोम्येदमग्र आसीत्" [छां० ६।२।१] इत्यादिकांत. जेथेंही विधीचें श्रवण होतें जसें "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः" [बृ० २।४।५] "तस्मिन्यदन्तस्तदन्वेष्टव्यम्" "तद्वाव विजिज्ञासितव्यम्" [छां० ८।१।१] इत्यादिकांत. तेथें जरी 'कृत्य' प्रत्यय अवि-

॥ विवरण ॥

सर्वत्र विधिश्रवणानें काय उपयोगी असतो अशी आशंका (वेदान्त्येकदेशी) सांगतात-'जेथेंही'. तेथेंही विधीची अनुपपत्ति आहे असा भाव. पण भाव व कर्मांत विहित हे 'कृत्य' प्रत्ययांचें 'कृत्याश्च' [पा० सू० ३।३।१७१] या सूत्रानें विधींत स्मरण असल्यामुळें 'तव्य' प्रत्ययानें ज्ञानाचें विधान केलें जातें? त्यावर सांगतात- 'तेथें जरी कृत्य प्रत्यय अविशेषानें --- विधान करण्यास समर्थ होत नाहीं' तरी येथें बाधक संभवत नाहीं असा अर्थ. 'पण 'गतव्यम्' अशा गमनाच्या अभिधानाप्रमाणें ज्ञानाचें हें विधान होईल? खरें भावविषयांत 'तव्य' प्रत्यय

॥ विषयव्याख्यान ॥

'तेथेंही'. "तयोरेव कृत्यक्तखलर्थाः" [पा० सू० ३।४।७०] या सूत्रानें भाव व कर्मांत 'तव्य' प्रत्ययाचें विधान असल्यामुळें त्याला विधेयत्व नाहीं असा अर्थ. पण 'तव्य' प्रत्ययाला आचार्यादिकांच्या अभिधायित्वाप्रमाणें विधीचें अभिधायित्वही युक्त आहे अशी शंका घेतात-'पण (आप)'. काय कृत्यप्रत्ययाचा भाव व कर्म अर्थ आहे किंवा तेंच? असा विकल्प करून पहिल्याचा अंगीकार करितात- 'भाव व कर्मांत'. दुसऱ्याचा निरास करितात. 'कृत्याश्च'. 'तव्य' प्रत्ययाचें लोकांत विधान अविशेष असलें तरी येथें विध्यर्थ संभवत नाहीं अशा आशयानें सांगतात- 'त्यावर सांगतात'. 'तरीही' येथील अपेक्षिताला पूर्ण करितात- 'तरी येथें'. 'आत्मा वाऽरे द्रष्टव्यः' याला कर्मप्रधानत्व असल्यामुळें विधिप्रधानत्व नाहीं असा अर्थ. कर्मविषयत्व असतांही विध्यर्थत्व दृष्ट आहे? अशी शंका घेतात- 'पण 'गंतव्यम्''. गमनाच्या विधानसत्त्वाचा अंगीकार करितात- 'खरें प्रमाणें येथें विधिपरत्व नाहीं असें सांगतात- 'भावविषयांत' 'तव्यम्' येथें तव्य प्रत्ययावरून क्रियेचा साध्यत्व प्रतीत होत असल्यामुळें कर्मपरत्व नाहीं, याहून तर कर्मपरत्व असल्यामुळें विधिपरत्व नाहीं असा अर्थ. पण सर्व प्रत्य

॥ व्याख्यान ॥

शेषाने विधीस स्मरत असेल तरी जो भावाभिधायी 'तव्य' प्रत्यय आहे तो क्रियाप्रधान-त्यामुळे क्रियेंत पुरुषाचा नियोग जित करण्याकरितां समर्थ होतो. जेथें पुनः कर्मप्रधानत्वानें बोलला जातो, तेथें द्रव्यांत गुणभूत क्रियेला कार्यान्तर संबंधित्वानें विधान करण्यास

॥ विवरण ॥

असतां विधान युक्त होईल असें सांगतात- 'जो भावाभिधायी तव्य प्रत्यय'. 'भाव = याने धात्वर्थ मात्राला सांगितले जाते. त्याच्या (क्रियेच्या) प्राधान्यामुळे स्वतंत्र फलाकरितां विधान करण्यास समर्थ होतो असा अर्थ. पण कर्माला सांगणाऱ्या 'तव्य' प्रत्ययावरून नाही "स्वाध्यायोऽध्येतव्यः" असा धात्वर्थ (=क्रिया) विषयक सिद्ध होतो? त्यावर सांगतात- 'जेथें पुनः', तेथें हीं काय स्वतंत्र फलाकरिता कर्माचें (=क्रियेचें) विधान होते? किंवा कर्मकारकातील फलाकरिता? स्वतंत्र फलाकरितां तर नव्हे असें सांगतात- 'तेथें द्रव्यांत'. आता जर कर्मकारक समवायी फलाकरिता विधि आहे? तर त्यावर सांगतात —

॥ विवरणव्याख्यान ॥

येथे भावत्व ज्याचे अधिकरण आहे अशा वस्तूचे अभिधायित्व असल्यामुळे 'भावाभिधायी' या विशेषणाला वैयर्थ्य आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'भाव याने'. 'धात्वर्थमात्राला = क्रियामात्राला असा अर्थ. ~~पण~~ फलाच्या अशा व असतां क्रियेंत पुरुषाच्या नियोगाची अनुपपत्ति असल्यामुळे व फलपरत्व असतां 'क्रियाप्रधानत्वामुळे' हें अनुपपन्न आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'त्याच्या प्राधान्यामुळे'. 'त्याच्या = धात्वर्थमात्राच्या.' 'प्राधान्यामुळे' याचे स्पष्टीकरण करितात- 'स्वतंत्र फलाकरिता'. कर्मकारकाशी युक्त नसलेल्या अदृष्ट फला करितां असा अर्थ. त्याविषयी हेतूला सांगतात- 'त्याच्या प्राधान्यामुळे'. कर्मपरत्वाचाही विधिपरत्व इष्ट आहे? अशी शंका घेतो- 'पण कर्माला'. पण 'कार्यान्तर संबंधित्वानें विधान करण्यास समर्थ होत नाही' असें सांगितलें तें इष्ट आहे? अशी आशंका असतां विकल्पाच्या उत्तराने त्याचा निरास करितात- 'तेथें ही काय?' दुसऱ्या (अन्य) पक्षाचें उत्थापन करितो- 'आता जर' निरास करितात- 'त्यावर'

॥ व्याख्यान ॥

४२।११

समर्थ होत नाही. कृत्यपरत्व असतांही त्याच्या अनुत्पाद्यत्वामुळे अविकार्यत्वामुळे, अनाप्यत्वामुळे व असंस्कार्यत्वामुळे समर्थ होत नाही. संस्कृतांच्या कार्यान्तरांत उपयोग

त. दी.
या ३८३।२२ विवरण ॥

‘कृत्यपरत्व असतांही’ ~~[illegible]~~ याचा अर्थ – ‘कृत्य’ (= तव्य) प्रत्ययाला कर्मकारकगत अतिशय फल- करिता क्रियाविधिपरत्वाचा अंगीकार असतां आत्म्यांत उत्पत्त्यादि अन्यतम कर्मफळ सांगितले पाहिजे. तें तर संभवत नाही. आत्म्याची तर उत्पत्ति नाही कारण त्याला अनादित्व आहे. त्याला विकाराचाही संभव ~~ही~~ नाही कारण नित्यत्व आहे. त्याची प्राप्तीही नाही कारण सर्वगतत्वानें त्याला नित्याप्तत्व आहे. संस्कार्यत्वही नाही कारण संस्कार दोन प्रकारचा आहे. गुणाधान लक्षण व मलापकर्ष लक्षण. पहिला संभवत नाही कारण त्याला निर्गुणत्व आहे. पण आत्म्यांत विहित क्रिया सामर्थ्याने करून अज्ञान अधर्मादि मलांचा अपकर्ष करणे १११।२३ संस्कार होईल ही त्याचा नाही असें सांगतात – ‘संस्कृतांच्या’. तेथें (पूर्वतंत्रांत) १११।२४ “सक्तून् जुहोति” असें क्रतुप्रकरणांत श्रवण असल्यामुळे क्रत्वंगता सक्तुहोमाला कळते. त्यांत अंगें दोन प्रकारचीं आहेत. अर्थकर्मे व संस्कार

॥ विवरण व्याख्यान ॥

ग्रंथ स्पष्टार्थ आहे. ३८४।३

‘सांगतात’ निरासाचें स्पष्टीकरण करितात – ‘कृत्यप्रत्ययाचा’. संस्काराच्या दुसऱ्या पक्षाला उत्थापन करितो – ‘पण आत्म्यांत’. विनियुक्त विनियोगानें संस्कार दिसत असल्यामुळे व आत्म्याला उभय पक्षाचा अभाव असल्यामुळे संस्कार्यत्व नाही असें सांगतात – ‘त्याचा नाही’. ३८४।६ सक्तुन्यायानें ~~[illegible]~~ आत्म्याचा प्राधान्य भंगानें उपास्तीचें प्राधान्य ग्रहण केलें जातें असें व्याख्यानांत सांगितलें तेथें हा सक्तुन्याय कोणता? अशी ~~शं~~का असतां सांगतो – ‘तेथें सक्तवं तथैव पूर्वतंत्रांत ~~[illegible]~~ – ~~[illegible]~~ ~~[illegible]~~ अंग अंगि जी असतात आणि ‘सक्तून् जुहोति’ येथें गुणप्रधानभावांत ~~वै~~ वैपरीत्य कसें? अशी ~~अशी~~ आशंका असतां वैपरीत्याला दाखविण्याकरितां अंगांचे द्वैविध्य सांगतो – ‘त्यांत अंगें’. ‘त्यांत’ = ‘अंगांगीत’ ~~अर्थ~~ अर्थकर्मे कोणती? व इतर कर्मे कोणती? अशी विवक्षा असतां सांगतो —

॥ विवरण ॥

कर्म॰ क्रतूवर उपकार करणाऱ्या (कारकां) चा आश्रय न करितां स्वातंत्र्याने विहित प्रयाजादिक अर्थकर्म॰ व व्रीह्यादि कारकांना गुणभूत तीं संस्कारकर्मं॰ त्यांत सक्तुहोमाला अर्थकर्मता नाही कारण त्याला सक्तु द्रव्याचे प्रोक्षणादिकाप्रमाणे गुणभूतत्व आहे. संस्कारकर्मं ही दोन प्रकारची आहेत: पहिला नियुक्ताचा संस्कार. जसे "व्रीहिभिर्यजेत" अशा विधिने युक्त व्रीहींना उद्देशून प्रोक्षणादि संस्कार. दुसरा विनियोक्ष्यमाण संस्कार "जसा आहवनीये जुहोति" अशा विनियोक्ष्यमाण (आहवनीया) चा आधानाने संस्कार. कारण संस्कृताचा विनियोग आहे असा अर्थ. त्यांत होमाने भस्मीकृत सक्तूंच्या दोन्ही प्रकारांनें क्रतूंत विनियोगाचा अभाव असल्यामुळे व वैयर्थ्याचाही अयोग असल्यामुळे संस्कारकर्मत्वाचा त्याग करून व 'सक्तून्' असे

॥ विवरणव्याख्यान ।

'क्रतूवर' 'आश्रय न करिता' व 'स्वातंत्र्यानें' यांचा व्याख्यान व्याख्येय सुगम आहे असे जाणावे. अनुयाजादि 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. अशा रीतीनें अंग द्विविधाला दाखवून त्याच्या (=सक्तुहोमाच्या) अर्थकर्मतेचा निरास करितो- 'त्यांत सक्तुहोमाला'. 'त्यांत' = अर्थकर्म व संस्कारकर्मामध्ये असा अर्थ. 'व्रीहीन्प्रोक्षति' (व्रीहींना प्रोक्षण करितो) "पत्न्यवेक्षितम्" (पत्नीने अवेक्षित) येथें प्रोक्षण अवेक्षणादिकाप्रत जसें व्रीहीं~~[illegible]~~ इत्यादिकांना प्राधान्य आहे तसे 'सक्तून् जुहोति' येथे द्वितीया श्रुतीने सक्तूंना प्राधान्य आहे. व होमाला गौणत्व लक्षित होते म्हणून अर्थकर्मत्व नाही असा अर्थ. मग संस्कारकर्मत्व कां असणार नाही? अशी आशंका असतां त्याचा असंभव दाखविण्याकरितां ~~त्याच्या~~ द्वैविध्य सांगतो- 'संस्कारकर्मे ही' विनियुक्त विनियोक्ष्यमाण संस्काररूपाने त्यांना द्वैविध्य आहे असा अर्थ. विनियोक्ष्यमाण संस्कार असे लक्ष्य असतां (येथें) अग्निसमाला विनियोक्ष्यमाणत्व असल्यामुळे संस्काराच्या वैयर्थ्याचा ~~[illegible]~~ आयोग म्हणून सांगतो- 'कारण संस्कृताचा'. असे असल्यामुळे काय? त्यावर सांगतो- 'त्यांत होमानें'. मग विनियोग नसो? अशी आशंका असतां सांगतो- 'वैयर्थ्याचाही'. स्वतंत्र फलसाधनत्वाचे अश्रवण असल्यामुळे, दर्शपूर्णमास प्रकरणांत पठित आहे म्हणून फलकल्पनेची अनुपपत्ति असल्यामुळे, व अध्ययनविधीने ग्रहण केले आहे म्हणून आनर्थक्याचा असंभव अ-

॥ व्याख्यान ॥

नसल्यामुळेही त्याला असंस्कार्यत्व आहे. म्हणून "आत्मानमुपासीत" [बृ.१।४।१५]
४२।१३
असे आत्म्याचा इष्टितमत्व संभवत नाही. आतां जर सक्तुन्यायाने विपरीत गुणप्रधान
भाव कल्पिला जाईल तर तेथेंही जाणलें जात नाही कीं तें उपासन काय आहे? व आत्मा

॥ विवरण ॥

प्राधान्य हें सोडून 'सक्तुभिः' अशा गुणभावाने कर्मांचें (=क्रियेचें) प्राधान्य ग्रहण करून जशी त्यांना अर्थकर्मता निरूपित आहे. तसें 'आत्मानम्' असे साध्यतेचें प्राधान्य सोडून "आत्मना उपासीत" अशा गुणत्व ग्रहणानें स्वतंत्रफलाकरिता प्राधान्यानें उपासनेचें विधान असो? अशी शंका घेतात 'आतां जर' तेथें जसें-होमाचा प्राधान्य असलेल्या धातूचा सकर्मकत्व असल्यामुळे सक्तूंना कर्मकारकतेनें भस्म केले जातात. तसे ज्ञानाचाही सकर्मकत्व असल्यामुळे अर्थात: कर्माभाव असतां विधान नाही. असा परिहार करीतात – 'तरतेथेंही' शब्दावरून सक्तूंच्या प्राधान्याचा भंग असला तरी अर्थावरून कर्मत्वाप्रमाणे उपास्तीचें ही आत्मा कर्म आहे किंवा नाही? दुसरा पक्षच बरोबर नाही कारण ज्ञानाचा दुसरा पर्याय उपास्तीला सकर्मकत्व असल्यामुळे कर्माभाव असतां विधी अनुपपत्ति येते. तसें आत्म्याला त्याप्रकारानें उपासन सिद्ध करणेंही अनुपपन्न आहे असा अर्थ. शब्दावरून करणत्व असले तरी अर्थावरून आत्म्याचा कर्मत्व आहे? अशी शंका घेतो —

विवरणव्याख्यान

म्हणूनच येथें श्रुतीचा भंग होतो असा अर्थ. 'कर्मांचें' = क्रियेचें असा अर्थ. दार्ष्टान्तिकाला सांगतात – 'तसें आत्मानम्'. 'साध्यतेनें' = उपास्तीपासून उत्पन्न झालेल्या अतिशयाच्या विशेषतेनें. 'स्वतंत्रफलाकरिता' = मुक्तिफलाकरिता असा अर्थ. पण उपासनशब्दाचा अर्थ प्रसिद्ध असल्यामुळे व आत्म्याचा कर्तृत्व प्रसिद्ध असल्यामुळे 'तरतेथेंही' या प्रश्नाची अनुपपत्ति आहे. अशी आशंका असतां सांगतात – 'तेथें जसें' वाक्याला सोडून अन्वयाला सांगतात – 'शब्दावरून सक्तूंच्या' 'करणकर्म' याच्या पूर्वीपर्यंत. पहिल्या करणाने उत्थापन करितो – 'शब्दावरून करणत्व' पुढील ग्रंथ स्पष्टार्थ आहे. पण आत्म्याला विषयत्व असतां 'आत्मा-

॥ व्याख्यान ॥

४ २।१५

करून ते कसें केलें जाते? पण मग असें कळतें की ज्ञान उपासन असून आत्माच विषयभावाने त्याचा संपादन करितो? असें आहे तर तेंच ज्ञानाने आत्मा प्राप्त केला जातो असें प्राप्त झालें. तें तर कृतकरण अनर्थक आहे; कारण आत्माला नित्यप्राप्तत्व आहे.

॥ विवरण ॥

'पण मग असें' ज्ञा धातूला सकर्मकत्व असल्यामुळे व ("आत्मानमुपासीतेत्यादि) उपास्तीलाहि त्याचा दुसरा पर्याय असल्यामुळे तिला सकर्मकत्व आहे. अथ अनुसंधानात्मक ज्ञान असें म्हटलें. पण आत्म्याला कर्मत्व असतां 'आत्मना' अशी तृतीया कशी? त्यावर सांगतो 'आत्माच' पण मग कर्मकारकत्व असतां आत्म्यांत कांही अतिशय सांगितला पाहिजे? त्याचा अभाव असल्यामुळे निष्कर्मक ज्ञानाचें विधान करणें शक्य नाही. असें सांगतात- 'असें आहे तर' पण ज्ञानानें

२१२।१८

प्राप्ति आत्म्यांत विधेय क्रियाफळ आहे? त्यावर नाही असें सांगतात- 'तें तर'. नित्यचैतन्यात्म प्रतीतीवरून प्राप्तत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

प्राप्त केला जातो' असें कसें म्हटलें? कारण विषयत्व असतां प्राप्तीच्या नियमाचा असंभव आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'पण मग कसें?' ज्याच्याकडून ज्याला अतिशय उत्पन्न केला जातो तो त्याचा विषय असतो. असा नियम असल्यामुळे आत्म्याला ही विषयत्व असतां त्याला क्रियाजनित अतिशयशालित्व म्हटलें पाहिजे. तेथें उत्पत्ति विकृति व संस्कृतीचा नित्य, असंस्कारी, व निर्गुण आत्म्यांत असंभव असल्यामुळे त्याची प्राप्ति सांगितली पाहिजे. ती तर संभावित केली जात नाही. कारण भेदाचा अभाव आहे. दुसरे तर दुसऱ्याकडून प्राप्त केलें जातें म्हणून निष्कर्मक बोधाचा असंभव असल्यामुळे त्याच्या विधीची अनुपपत्ति आहे असा अर्थ. पण आत्म्याला स्वरूपाने प्राप्तत्व असतांही अवभास्यत्व (भासविला जाणें) या विशिष्ट आकाराने प्राप्तीचा संभव आहे? अशी शंका घेतो- 'पण ज्ञेयत्वानें?' आत्म्याचा स्वप्रकाशत्वानें अन्याधीनत्वसिद्ध असल्यामुळे तेथें प्रकाशसंबंधाचा क्रियाफलत्व नाही असें सांगतात- 'त्यावर नाही' पण अवभास्यत्व विशिष्ट प्रकाराने साध्य नाही शंका असतां 'नित्य अवभास्यत्वामुळे' असें म्हणावयास

३८।५।३

पाहिजे होतें, 'कारण आत्म्याला नित्य प्राप्तत्व आहे' असें कां म्हटलें? त्यावर सांगतात- 'नित्यचैतन्यत्वानें' नित्यचैतन्यानें

॥ व्याख्यान ॥

७२१९

संस्कार्यत्व असतां तर उपयोगाच्या अभाव सांगितला. म्हणून विधीचा अभाव असल्यामुळे अविवक्षितार्थच शब्द आहेत – मग. म्हणून धर्मजिज्ञासेनंतर स्नान करावें असें प्राप्त होत असतां 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' असें हें आरंभलें जातें. अनंतर ब्रह्म जाणण्याची इच्छा करावी स्नान करूं नये असा अभिप्राय. कारण नियोगांत मान्य कु- मानि घ्याचीहि 'कृत्य' प्रत्ययावरून नियोज्यत्व निराकरण करणें शक्य नाहीं. 'कट तुम्हाकडून कर्तव्य आहे, ग्राम तुझ्याकडून गंतव्य आहे' याप्रमाणें. जे म्हटलें कीं- कृत्य परत्व असतां प्रयोजनाच्या अभावामुळे नियोगाचा आनर्थक्य आहे. तें असत्य आहे. कारण अविद्येचा उच्छेद उपलब्ध होतो व अविद्या संसाराचा हेतुभूत आहे.

॥ विवरण ॥

असल्यामुळे त्याचा शब्द क्रमता नाहीं असा अर्थ. 'संस्कार्यत्व असतां' येथून 'असा अभिप्राय' येथपर्यंत ग्रंथ
३८५६
स्पष्टार्थ आहे. 'द्रष्टव्यः' येथील 'तव्य' प्रत्ययाचा कर्मपरत्व असल्यामुळे नियोगाची प्रतीति नाहीं असें जें म्हटलें त्यावर सांगतात- 'कारण नियोगांत' 'कट तुझ्याकडून कर्तव्य आहे' इत्यादिकांत उत्पत्त्यादि फल संभवत असल्यामुळे, नियोगाचा संभव असला तरी येथें त्याचा असंभव आहे, कारण नियोगाचा अभाव आहे' असें जें ('द्रव्य परत्व असतांही त्याच्या अनुत्पाद्यत्वामुळे येथें) म्हटलें त्याचा अनुवाद करितात- 'जें म्हटलें कीं' मलनिवृत्तिरूप संस्कार संभवत असल्यामुळे हेतु असिद्ध आहे असें सांगतात- 'तें असत आहे' अविद्या अधर्मादि निवृत्ति संस्कार आहे. संस्कृताच्या

॥ विवरणव्याख्यान ॥

निःसंबंधत्व असल्यामुळे त्याला क्रियाची न प्रकाशन नाहीं असा अर्थ. 'द्रष्टव्यः' येथून 'तें असत आहे' येथपर्यंत ग्रंथ स्पष्टार्थ आहे. 'हेतु' = प्रयोजनाच्या अभाव. संस्कृताच्या अन्यथा नियोगाचा अभाव असल्यामुळे संस्कार फळ नाहीं असें सांगितलें त्याचें निराकरण करण्याकरितां लौकिक संस्कारांहून वैलक्षण्य सांगतात- 'अविद्या अधर्मादि' असा, त्यामुळे कार्य त्याचा सांगतात- 'संस्कृताच्या

॥ व्याख्यान ॥

४।२।२४

दुसरे पुनः असा आरंभ करितात — परिनिष्पन्न (=सिद्ध) वस्तूंत प्रतिपत्ती (ज्ञान) त्या हेतुतेने संभावित सामर्थ्य ही प्रत्यक्षादि प्रमाणान्तराच्या त्यांत असंभव असल्या- ४।३।२ मुळे वेदाच्या पुनः कार्यविषयतेने सुतरां असंभव आहे. असे मानणाऱ्यांची संकर्ष (= देवता) कांड पर्यंत वेदार्थ विचाराचे अवसान आहे. अशी बुद्धि होईल तिच्या निरासाकरिता २७०।२७ पुनः ब्रह्मज्ञानाची प्रतिज्ञा केली आहे. येथेंही सर्वत्र आत्मज्ञान विधानांत कार्यनिष्ठता समान-

॥ विवरण ॥

तर अन्य विनियोगाची आकांक्षा नाही. कारण त्याचा स्वयं पुरुषार्थत्व आहे. व अपुरुषार्थ संस्काराकार्य नियोगाची अपेक्षा असते. म्हणून त्याच्याकरिता आरंभ केला जातो. असे प्रयगारंभवाद्याचे मत आहे. ३

२१२।१९ त. दी. ३८६।४

"दुसरे पुनः असा आरंभ करितात" इत्यादिकाचा हा अर्थ — प्रतिपत्तिविधीचा अपेक्षित हे चतुर्विध न्याय प्रथमतंत्रांत निरूपित आहे." तेथें (=तसे असतां) त्याचा विषय अशा ब्रह्माच्या निरूपणाकरितां हे शास्त्र आरंभ करण्यास योग्य आहे. परंतु ते तर संभवत नाही. कारण ब्रह्मांस प्रमाणाचा अभाव आहे — असा. ब्रह्मांत वेद प्रमाण होत नाही कारण त्याला कार्यपरत्व आहे असें सांगितले. त्यांत कार्यपरत्वाचा अंगीकार करितात — "येथें ही" कर्मकांड प्रमाणे असाही" शब्दाचा अर्थ. २७०।२७ "आत्मज्ञानविधानांत" — आत्मप्रतिपादक सत्यादि वाक्यांत. असा अर्थ. "समान" कर्मकांडाच्या समान असा अर्थ

॥ विवरणव्याख्यान ॥

तर" सुखप्राप्ति व दुःखनिवृत्तींत अन्यतमाचा पुरुषार्थत्व आहे. प्रोक्षणादिकापासून उत्पन्न होणाऱ्या संस्काराला तसा आत्यन्तिक नसल्यामुळे नियोगांत अनुप्रवेशित्व युक्त आहे. येथें तर तसें नाही असा अर्थ.

३८६।१६

"दुसरे पुनः असा आरंभ करितात" येथें ब्रह्मांत प्रमाणाचा अभाव असल्यामुळे ब्रह्ममीमांसेचा आरंभ करू नये. अशा अन्याधिक्य आशंकेच्या निरासाकरिता पुनः आरंभ आहे असें सांगितले. ते संभवत नाही. कारण (प्रतिपत्ती) विधीच्या निरूपणाला असंभव आहे. अशी आशंका असता आशय सांगतात. "दुसरे पुनः" "चतुर्विध न्याय" — उत्पत्ति, विनियोग, प्रयोग, २७०।२७

॥ व्याख्यान ॥

४३१३

वर्णन करितात: तत्वावबोधही अधिकाऱ्याच्या नियोग विषयतेने कळत असल्यामुळे कार्य आहे. (~~तरी त्याच्यापासून ब्रह्मही कळेल~~) म्हणून त्याच्या (ब्रह्माच्या) विचाराकरितां शास्त्र आरंभ करण्यास योग्य आहे.

॥ विवरण ॥

पण मग ब्रह्मांत ~~त्याला~~ अप्रामाण्य आहे? त्यावर सांगतात- 'तत्वावबोधही' निर्विषय ज्ञानविधीच्या अनुपपत्तीनें वेदान्तांचे ब्रह्मांत अवान्तर तात्पर्य आहे असा अभिसंधि. त्याविषयीं हेतु सांगतात- 'अधिकाऱ्याच्या नियोग विषयतेने:'- याचा हा अर्थ — ज्ञानाचा फळाशी संबंध कळतो व त्या फळकाम्याकडून ते अनुष्ठेय असतं व नियोगावरुन त्याचे अनुष्ठान होते. अशा रीतीने फळकाम्याच्या नियोगविषयतेनें ते कळत असल्यामुळे ते कार्य आहे- असा भाव.

× (तदीत्याद्यपासून? — कार्यमात्रपर वेद नाही कारण प्रतिपत्ति (उपासन) (ज्ञान) विधिपर वेदान्तांनी ब्रह्म कळते असा निर्णय करिताहां आरंभ आहे असा अभिप्राय. पहिल्या मतांतर विधीचा अभाव करून अभ्याधिक आशंकेचे निराकरण करून प्रतिपत्ति (उपासन) (ज्ञान) विधीचे समर्थन करण्याकरिता आरंभ आहे.)

॥ विवरणव्याख्यान ॥

व अधिकार असा वेदान्तांना विधिपरत्व असतांही विषयतेने ब्रह्मांत निरूपण संभवते असा 'ब्रह्मांत वेद प्रमाण नाही' येथून 'अवान्तर तात्पर्य आहे' येथपर्यंतच्या ग्रंथाचा भाव. 'त्याविषयीं' = कार्य निष्फळ विषयीं. हा अधिकाऱ्याचा नियोग कोणता? व तत्वज्ञानाला त्याचे विषयत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात - 'ज्ञानाचा?' 'तरति शोकमात्मवित्' इत्यादिकांनी ज्ञानाचे शोकाने हल्ला दिल्याने साध्यसाधनता कळते. निरधिकार ज्ञानानंतर निवृत्ति (सिद्धि) द्वारा कृतिसाध्यत्व नाही- म्हणून अधिकाऱ्यावाचून शोक निवृत्ति संभवत नाही ज्ञान उत्पन्न होणे शक्य नाही. म्हणून फळकामी अधिकारी सिद्ध होतो. ~~व [illegible]~~ 'द्रष्टव्य:' येथील प्रकृतीनें ग्रहण केलेलें ज्ञान त्याच्या (अनियोगाच्या) विषयत्वाने संबंधाला प्राप्त होते. नियोगाला हे साक्षात् कृतिव्याप्यत्व संभवत असल्यामुळे ~~शास्त्राला~~ कार्यत्व आहे. असा अर्थ. सांगितलेल्या अर्थाची व्याख्यानांत अरुढता सांगतात - 'फळकाम्याच्या'

॥ व्याख्यान ॥

(पूर्ववादी-) यावरसांगतो- तें आरंभ करण्यास योग्य नाही कारण त्याला गतार्थत्व (= ~~[illegible]~~ (विचारितार्थत्व)) आहे. कसें? जो पहिला आरंभप्रकार- कर्माला सांगणाऱ्याही कृत्य प्रत्ययानें नियोग मान्य आहे असा- तो स्वतःच पुढें त्याचे (अर्थात) विधायकत्व दर्शविले असल्यामुळे व 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' इत्यादिकांचे विधायकत्व ~~आम्नाय~~ (वेदांत) प्रसिद्ध असल्यामुळे

॥ विवरण ॥

'यावरसांगतो' इत्यादिकानें पूर्ववादी आरंभ द्वयाचें निराकरण करितो- जरलोकांत कर्मविधायी कृत्य प्रत्यय नियोगाला जाणवीत नाही? अशी आशंका असेल तर तसें नाही असें सांगतो 'सा स्वतःच' जरवेदांती तर त्यावर सांगतो- 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' म्हणून पूर्वतंत्रांतील प्रथम सूत्रानें अध्ययन विधीला अंगीकार करणाऱ्यांना हा-

॥ विवरणव्याख्यान ॥

'यावरसांगतो' असा उपक्रम असल्यामुळे उत्तर ग्रंथ सिद्धान्तमतासारखें भासतो परंतु तें उपपन्न होत नाही कारण प्रत्यंचाचें समर्थन केलेंले आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'यावरसांगतो इत्यादिकानें' कारण लोकांत कर्मविधायी कृत्य प्रत्ययावरून नियोगाची अप्रतिपत्ति आहे? किंवा वेदांत? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितो- 'जरलोकांत' कारण 'कर तुझ्याकडून कर्तव्य आहे' इत्यादिकांत नियोगाची प्रतिपत्ति होते असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करून निरास करितो- 'जरवेदांत' या शंकेच्या निराकरणासाठीच सांगतो- 'म्हणून (पूर्वतंत्रांतील)' अध्ययनविधीच्या विधायकत्वाची प्रसिद्धि म्हणून शंका नाही? अर्थ. 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' येथे कर्मकारकात्वे वैफल्य असल्यामुळे सक्तुन्यायानें स्वाध्यायानें अध्ययन करावे असें अध्ययनाचें प्राधान्य आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'प्रथम (सूत्रानें)' 'स्वाध्यायाला (= स्वशाखीय वेदाला) अध्ययन क्रियेनें संस्कार्यत्व असल्यामुळे संस्कृत स्वाध्यायापासून उत्पन्न अर्थज्ञानाला फल आहे. म्हणून कर्मकारकाचा प्राधान्य असतांही जसें विधिपरत्व आहे. तसें 'द्रष्टव्यः' येथेही विधिपरत्वाचा संभव असल्यामुळे अधिक आशंका नाही. असा अर्थ. तसेंच संपूर्ण अध्ययनानंतर वेदार्थाच्या विचाराचें त्याकर्तव्यतेला सूचित करणारें जै-

॥ व्याख्यान ॥

येथें किंचित् आशंकेला कारण नाहीं. पण चतुर्विधही क्रियाफलाच्या आत्म्यांत असंभव सांगितला? जर असें आहे तर स्फुरण्याचें होईल? तेंहि नाहीं कारण आत्मविषयक ज्ञाना

॥ विवरण ॥

विचारगतार्थच आहे. असा अर्थ. 'पण चतुर्विध' इत्यादिकाचा अर्थ पूर्वी सांगितलाच आहे. (स्फुरण्यानें) आत्म्याला करणत्व असतांही त्याला कर्मकारकत्व असल्यामुळें स्वतः अपरोक्षतेनें नित्यसिद्धच. विधेय क्रियाजन्य प्रतिभासाचा अयोग असल्यामुळें अकर्मकत्व आहे. म्हणून निष्कर्मक ज्ञानाचें विधान शक्य नाहीं असें सांगितलें असें सांगतात - 'तेंही नाहीं'. स्वरूपज्ञानही आत्म्याच्या व्यवहाराला हेतु असल्यामुळें 'आत्मविषयक ज्ञानाला' येथें ज्ञानविषयत्व आत्म्याला सांगितलें. आत्म्यांत चतुर्विधफलाचा अभाव असल्यामुळें अकर्मत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

भिन्न ज्ञानकांड्याच्याही विचाराची प्रतिज्ञा केली ते झालें. कारण विचाराचा प्रयोजक उभयत्र समान आहे. अशा आशयानें सांगतो 'प्रथमसूत्रानें' आत्म्यांत क्रियेपासून उत्पन्न झालेल्या अतिशयाचें निरूपण केलें तरी भेद नसल्यामुळें त्याला कर्मकारकत्व नाहीं. त्यामुळें (अशी शंका संभवत असल्यामुळें) अन्याधिक आशंकेचा अभाव कसा? अशी आशंका असतां कर्मकारकत्वाच्या असंभव असतांही आत्म्याला करणत्वाची कल्पना असल्यामुळें अधिक शंकेचें अवतरण नाहीं असें अनारंभवाद्यानें सांगितलें असतां 'तेंहि नाहीं' येथें कर्मकारकत्वाच्या निरासकेला तो उद्देश आहे. कारण आत्म्याला करणत्व मानलें आहे? अशी आशंका असतां सांगतात - 'आत्म्याला करणत्व' 'ज्ञा' धातूला सकर्मकत्व असल्यामुळें शब्दतः करणत्व असलें तरी अर्थावरून आत्म्याला कर्मकारकत्व मानलें पाहिजे. परंतु तें उपपन्न होत नाहीं कारण आत्म्याला स्फुरणरूपत्व असल्यामुळें ज्ञानक्रियेपासून उत्पन्न होणाऱ्या स्फुरणातिशयित्वाचा अयोग असल्यामुळें ज्ञानविधि नाहीं अशी अधिक आशंका युक्त आहे असा अर्थ. 'मी' असें आत्मज्ञान सिद्ध असल्यामुळें तेथें विधि व्यर्थ आहे व त्यामुळें 'भगवान् ध्यात्वा' या ग्रंथाला अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां सांगतो - 'आत्म्यांत चतुर्विधफलाचा'

॥ व्याख्यान ॥

ते नित्यसिद्ध आहे असें सांगितले. मग सिद्धत्वाचाच पुनः अभ्यास (नियम) विधिनिमित्तक उपासनारूप अभ्युदय फलाकरिता ('हिरण्यं धार्यम्' (या विधीनें) हिरण्य धारणाप्रमाणे होईल.

॥ विवरण ॥

असेल तरी कर्तृसमवायी मोक्षफलाकरिता त्याच भासविणाऱ्या ज्ञानाच्या संतानाचा नियमविधि होईल. जसें- 'हिरण्य धारण करावें' असा पक्षानें प्राप्ताच्या नियमविधि अभ्युदय फलाकरितां आहे. त्याप्रमाणे असें सांगतात 'मग सिद्धात्याच'

॥ विवरणव्याख्यान ॥

'पर्यंतत्वाकरिता' म्हणजे त्याच्या अप्रतिपादनांत फलरहितत्व उपाधि आहे असा अर्थ. पुढील 'हे दोन्हींचे विशेषण आहे' येथपर्यंत वाक्य स्पष्ट आहे. पण शाब्दज्ञानापासून अग्रहण निवृत्त होते असल्यामुळे साक्षात्काराने काय? अशी आशंका असतां ताहूयें सांगतो - 'जरी शाब्दज्ञानापासून' पण आत्मज्ञानाचे विधान इच्छित असल्यामुळे 'ते ज्ञान कोणते?' या प्रश्नाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां ताहूयें सांगतो - 'मग विधीयमान'

॥ व्याख्यान ॥

ज्ञान कोणते? (कोण्या साधनाने होते?) प्रत्यक्षादिकांना तर आत्मा अगोचर आहे. कारण "न चक्षुषा गृह्यते" [मुं. ३।१।८] असा मंत्रवर्ण आहे; शाब्दतर तुम्हास इष्ट नाही? खरें आहे; शाब्दज्ञान विधिरहित अनुभवाकरिता समर्थ नाही विहिततर अनुभवाचा हेतु आहे. तें अयुक्त

॥ विवरण ॥

पण प्रत्यक्षादिकांना अपरोक्ष ज्ञान साधनत्व प्रसिद्ध आहे? त्यावर नाही असें सांगतो- 'प्रत्यक्षादिकांना तर' पण शाब्द प्रकरण आहे? नाही कारण पूर्वज्ञानाप्रमाणे याचेही ते फळ असण्याचा प्रसंग येतो असें सांगतो- 'शाब्दतर' पण ते विधीयमान असें शाब्दज्ञान आहे. मग विधीयमान तेंच अपरोक्ष फळ ते ज्ञान कोणते? प्राथमिक ज्ञान? किंवा त्याच्या संतानी प्राथमिक-ज्ञानतर नव्हे असें सांगतो- 'तें अयुक्त आहे' कारण उभयपरत्व असतां वैरूप्याला दाखवीत आहे असा वाक्यशेष. पण

शाब्दीने वेदन

॥ विवरणव्याख्यान ॥

कार्य जें आहे अन्यतम आत्म्याच्या प्रतिपत्तीचे (साक्षात्काराचे) कारण आहे किंवा शाब्द? असा विकल्प असतां पहिल्या पक्षाचे उत्थापन करतात 'पण प्रत्यक्षादिकांना'. श्रुतिविरोधामुळे असें नाही असें सांगतो- 'त्यावर नाही'. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितात- 'पण शाब्दच'. शब्दाचा परोक्ष ज्ञान जनन स्वभाव असल्यामुळे त्यापासून अपरोक्ष असणें अयुक्त आहे असें सांगतो- 'नाही कारण पूर्व' पण अभिहिततर प्रत्ययाला विहित प्रत्ययाप्रमाणे शाब्द प्रत्ययत्व असल्यामुळे अनुभव फळकत्व आहे. अन्यथा उतराला ही तें असणार नाही. म्हणून 'खरें आहे' इत्यादि व्याख्यानाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां सहकारीच्या अपेक्षेनें शाब्दज्ञानाला अन्यथात्व आहे? अशी शंका घेतात- 'पण ते विधीयमान' पण शाब्द ज्ञान मात्राला विधेयत्व अंगीकृत नसल्यामुळे 'कारण जें' इत्यादि अयुक्ताचा दोष आहे? अशी आशंका असतां विकल्पाच्या उत्तर परतेने व्याख्यान करितो- 'मग विधीयमान तेंच' पण शाब्द ज्ञानाला विधेयता सांगितली असल्यामुळे विकल्पाची अनुपपत्ति आहे? अशी आशंका असतां काय शाब्द ज्ञानमात्राला विधेयत्व आहे? किंवा आवृत्ति विशिष्टाला? असा विकल्पाची उपपत्ति होते असें जाणावें. दुसऱ्या पक्षाच्या अभावाविषयी हेतु सांगतो- 'कारण उभयपरत्व' पण अभ्यासविशिष्ट आत्मज्ञान मात्राला असिद्धत्व असल्यामुळे त्याच्या उद्देशाने संतानरूप विधानाचें अभिधान

॥ व्याख्यान ॥

आहे. कारण जे तर स्वाध्यायाध्ययन विधीने ग्रहित पद असन्दवयापासून स्वनयवत्, असुत्पन्न आहे; तर निर्विण्यमान नाही कारण त्याला प्रमेयत्वेने विधीविषयत्वाची अनुपपत्ति आहे असे सांगितले. आतां त्याच ज्ञानाचा संतान करावा असा विधि असेल तर

(उद्देश करून) ॥ विवरण ॥

प्रथम ज्ञानाने ~~शब्दजन्य~~ असतां त्याच्या उद्देशाने प्रत्यय संतानाचा विधि आहे? कारण त्याच्या संस्कार प्रत्ययापासून अपरो-
(एकदेशी [illegible] पृ. ६५।पं. ९ येथपर्यंत या ग्रंथांत बहुवचन एकदेशी कथितावापरले आहे.)
क्षसिद्धि होते? अशी शंका घेतात- 'आतां त्याच ज्ञानाचा', काय उपासनाविधि सामर्थ्याकरून हे कळते? किंवा "आत्मोदा-ते ... आत्मन्येवात्मानं पश्येत्" [बृ. ४।४।२३] या दर्शनविधानाच्या सामर्थ्याकरून? उपासनेंत तर विधीचे श्रवण नाही. कारण 'आत्मेत्येवोपासीत' [बृ. १।४।७] "आत्मानमेव लोकमुपासीत" [बृ. १।४।१५] "तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः" [बृ. ४।४।२१] इत्यादिकांनी स्वभावसिद्ध प्रत्ययाच्या ग्रहणाने अर्थात् आत्म~~प्रत्यय~~विषय प्रतिपादनपरत्व आहे; कारण एवकार विशेषणाच्या श्रवणामुळे अन्यव्यवच्छेदक विशेषणपरत्व आहे. व उभयाच्या प्रतिपादनांत वाक्यभेद होतो.

॥ विवरणव्याख्यान ॥

कसे? अशी आशंका असतां व्याख्यानार्थ स्पष्ट करितात 'पण प्रथमज्ञानाने' पण उत्पत्तीतर ज्ञानोत्पत्तीच्या समयीं पूर्वपूर्वज्ञान नष्ट होत असल्यामुळे अपरोक्षप्रसिद्धीचा उदय कसा? अशी आशंका असतां सांगतात- 'कारण त्याच्या संस्कार' पण 'उपासीत' इत्यादि शब्दापासून संतानाची प्रतिपत्ति होत असल्यामुळे कसा अभाव होईल? हे (हा आक्षेप) अयुक्त आहे, अशी आशंका असतां विकल्प पुढे व्याख्यान करितो- 'काय उपासनेचा' 'स्वभावसिद्ध' - लौकिक आत्मप्रत्ययाचा 'उपासीत' याने अनुवाद करून प्रमाणान्तराने नक्की केलेला निष्प्रपंच आत्मा "आत्मेत्येव" या वाक्याने प्रतिपादन केला जातो असा अर्थ. पण यांना अलौकिकात्मप्रतिपादकत्व कशामुळे आहे? श्रवणानुसार त्यांना उपास्तिविधिपरत्व का असणार नाही? अशी आशंका असतां सांगतो- 'कारण एवकार'. कारण "यद्भूतयेन प्राप्तमित्याद्युद्देश्यलक्षणम्। तद्भावमेवकारस्य स्यादुपादेयलक्षणम्॥" असें आचार्यांनी स्पष्ट केले आहे. असा अर्थ. "विशेषणपरत्व आहे" असें जें सांगितलें त्यांत अधिक पुरवणी देऊन करितात 'व उभयाच्या प्रतिपादनांत'. पण 'निदिध्यासितव्यः"

॥ व्याख्यान ॥

तो ज्ञानसंतानवाची उपास्ति वध्यायति तीठ एकाचे तरी ग्रहण केल्यावाचून कसा लभ्य होईल? ज्ञानानेच ही स्वसंतान लक्षित नाही. कारण लक्षण करिता आहच्चर्यादि अन्यमेच

॥ विवरण ॥

“निदिध्यासितव्यः” [बृ. २।४।५] यदिही आत्मप्रतिपादनपर वाक्यांत वाक्यभेद टाळण्याकरितां स्तुतिपरत्व आहे; पण दर्शनविधिसामर्थ्यावरून संतानाचा विधि आहे? त्यावर नाही असें सांगतो - ‘तो ज्ञानसंतानवाची’ पण ज्ञानाचा सर्वत्र प्रवाहाशी अविनाभाव असल्यामुळे ज्ञानविध्यानेच संतानविधि लक्षित होतो? यावर नाही असें सांगतो। ‘ज्ञानानेच ही’ आतां जरी कोणत्या रीतीने निदिध्यासन विधीवरून उपासन विध्यानाची कल्पना केली तरी.

॥ विवरणव्याख्यान ॥

या वाक्यावरून आलेली उपासनविधि जाणतोही अशी आशंका असतां सांगतो - ‘निदिध्यासितव्यः यदिही’ पूर्वोत्तर वाक्यांना आत्मपरत्व असल्यामुळे हें देखील तत्पर आहे असा अर्थ. पण “अधस्तात्समिधं धारयन्ननुद्रवेत्” अशा अधोधारणविधी परही वाक्यांत जसा उपरिधारणाचा विधि आहे, तसा येथेही उपासनविधि आहे? अशी आशंका असतां सांगतो - ‘वाक्यभेद टाळण्याकरितां’ तेथें एकप्रयोजनत्वाला असंभव असल्यामुळे वाक्यभेदाला स्वीकार केला आहे, तसा येथें नाही कारण ‘तव्य’ प्रत्ययाचे योग्यार्थत्वांतही स्मरण असल्यामुळे स्तावकत्वानेही अन्वयाची उपपत्ति होते. असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करितो - ‘पण दर्शनविधि’, पण आवृत्तिवाचक पदार्थाचा अभाव असतांही ज्ञानशब्दाने तोच लक्षित होतो असल्यामुळे त्याचे विधान युक्त आहे? अशी शंका घेतात - ‘पण ज्ञानाचा’ ‘अविनाभाव असल्यामुळे’ असें ज्ञानप्रवाहाचे मात्र विवक्षित आहे. म्हणून अनात्मज्ञानाप्रमाणे आत्मज्ञानालाही प्रवाहाचे साहचर्य असल्यामुळे ज्ञानाने प्रवाहाची लक्षणा आहे असा अर्थ. प्रवाहाचा अभाव अस~~ल्यामुळे~~ तेंही ज्ञान दिसत असल्यामुळे लक्षणा नाही असें सांगतो - ‘यावर नाही’ पण अभ्यासाचा विधि नसला त्याला साक्षात्कारहेतुत्व उपपादत आहे, म्हणून ‘अभ्यासावृत्तीने’ या उत्तरग्रंथाचा विरोध आहे? अशी आशंका असतां ‘उपासनाच्या विधीच्या संगतीकरून त्याच्या साक्षात्कारहेतुत्वाला निरास करितो. ‘आतां जरी’ ‘क्रो-

॥ व्याख्यान ॥

रित संबंधाचा अभाव आहे. अभ्यासापासून साक्षात्भाव सिद्ध होत नाही. श्रुतही नाहीं कीं

॥ विवरण ॥

उपासनेला अपरोक्षफलाचे अहेतुत्व असल्यामुळे शाब्दज्ञानाहून त्याला विशेष नाही असे सांगतो - 'अभ्यासापासून' कारण अभ्यासाला अप्रमाणत्व आहे (ध्यान साक्षात्कारातील) विषयाला असंप्रयुक्तत्व आहे. त्यामुळे अभ्यासापासून वस्तूचे अपरोक्ष्य होत नाही. परंतु ध्यानाच्या अपरोक्ष होते असा अर्थ. पण "ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः" [मु. ३।१।८] असे ध्यानाचे अपरोक्षफल श्रुत आहे? खरे आहे - एकाग्रचित्ताची सम्यक् अवधानता । त्यात (आ- प्रत्यय ध्यानं) एकाग्रतेला निमित्त होते. व त्यांत एकाग्रचित्त असा सहकारीने युक्त शब्द "औपनिषदं" अशा तद्धित प्रत्यय सामर्थ्यामुळे अपरोक्ष ज्ञानाला उत्पन्न करितो. कारण "ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वः ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः"

—ध्येय ध्यायमान

॥ विवरणव्याख्यान ॥

व्यासेसीने = वाक्यभेदाने असा अर्थ. पण कामुकाला कामिनीच्या ध्यानापासून तिचे अपरोक्ष्य दिसते. तेव्हा त्याला अपरोक्ष्याचे अहेतुत्व कसे? अशी आशंका असतां सांगतो - 'कारण अभ्यासाला' इंद्रियांशी संप्रयुक्तत्व (संयोगत्व) तर अपरोक्षत्व आहे. परंतु नष्ट किंवा व्यवहित कामिन्यादिकाला तशा प्रकारत्व नसल्यामुळे अपरोक्षत्व नाही असे सांगतो - 'विषयाला' पण आत्मज्ञानाच्या अभ्यासाला साक्षात्कार हेतुतेचे श्रवण असल्यामुळे त्याच्याशी व्यभिचार आहे अशी शंका घेतात - 'पण ततस्तु' ततः = अंतःकरणाच्या शुद्धीच्या अनंतर असा अर्थ. श्रुतमात्राला अंगीकार करितो - 'खरे आहे' मग इष्टाची सिद्धि होते? अशी आशंका असतां ध्यानकार्य प्रत्यक्ष साक्षात्काराला उत्पन्न करिते किंवा परंपरेने? असा विकल्प करून दुसऱ्याचा अंगीकार करितो - 'एकाग्रचित्ताची' 'सम्यक् अवधानता' ह्या ज्ञानाने ध्यान विवक्षित आहे. पण एकाग्रतेला प्रत्यक्षकरणत्व अप्रसिद्ध असल्यामुळे त्याच्या द्वाराने साक्षात्कार कसा? त्याला सांगतो - 'व त्यांत एकाग्रचित्त' त्याविषयी हेतु सांगतो - 'औपनिषदम्' पण अशी कल्पना असतां "ध्यायमानः पश्यते" ही श्रुति पीडित होईल? अशी आशंका असतां सांगतो - 'ध्येयं ध्यायमान' 'ज्ञानप्रसादेन' = ज्ञायते अनेन अभ्यासोगाने जाणतो तें ज्ञान अंतःकरण. तस्य प्रसादः = त्याचा [illegible]

॥ विवरण ॥

(ईप्सित) ज्ञानप्रसादाने पहातो असा वाक्याचा अन्वय आहे. व चित्ताच्या ऐकाग्र्याने सूक्ष्मवस्तुदर्शनसिद्धित्व (दृष्ट) आहे. दृष्टानेंच उपकारसिद्धि होत असतां अदृष्टकल्पनेचा अयोग आहे. कारण आपरोक्ष्यकाम्याची उपासनेंत (= एकाग्रतेकरिता चित्ताच्या सम्यक् अवधानांत) स्वतः प्रवृत्ति ~~असल्यामुळे~~ आहे. व निदिध्यासनविधानाला अदृष्टार्थत्व असल्यामुळे असें जें सांगितलें तें हें सांगतो – 'श्रुतहि नाहीं'. दृष्टसामर्थ्यामुळे वाक्याला अनुवादत्व आहे. म्हणून विध्यंतर श्रवण नाहीं असा अर्थ.

॥ विवरणव्याख्यान ॥

माहेश्वरैकाग्र्य त्यांस कवीन्द्र शब्दापासून आत्मतत्त्वाला ध्यान~~वान्~~ पहातो असा अर्थ. पण ध्यानाला शब्देतर सहकारित्व अदृष्टद्वारक आहे? अशा शंकेचा निरास करितो – 'चित्ताच्या ऐकाग्र्याने'. कारण स्वरूपाच्या ज्ञानाला ध्यानाची अपेक्षा नसतांही सूक्ष्माच्या ज्ञानांत त्याच्या अपेक्षेचें अन्वय दिसतात असा अर्थ. शक्तिकल्पायिल्या (~~[illegible]~~) कल्पनेच्या निरासकरिता – 'दृष्टानेंच' कारण ध्यानाला साक्षात् प्रमितिहेतुत्व लोकांत दिसत नसल्यामुळे त्या कल्पनेची (~~[illegible]~~) अनुपपत्ति आहे असा अर्थ. अन्वयव्यतिरेकावरून सिद्ध साधनतेला कुठेही अभ्यासांत सिद्धि नाही असें सांगतो – 'आपरोक्ष्यकाम्याची' पण 'मनन निदिध्यासनांच्या सह श्रवण नामक अंगीचें विधान केलें जातें' (२.१.२.८) येथें निदिध्यासनाच्या विधीचा आश्रय केला आहे. तेंव्हां त्याचें निरसन कसें? अशी आशंका असतां सांगतो – 'अदृष्टार्थत्व असल्यामुळे' साक्षात् आपरोक्ष्याच्या हेतुत्वानें निदिध्यासनाचा विधि केला जातो असें जें मत त्याचा येथें निरास केला जातो. पहिल्या वर्णकांत तर निदिध्यासन विधीच्या स्वाधीन असलेलें जें हें चित्तैकाग्र्यलक्षण दृष्टफळ त्याच्याशीं मिळणारें जें अदृष्ट ते असतां शब्दापासूनच अपरोक्ष प्रत्ययाची उत्पत्ति होते असें सांगितलें असल्यामुळे कांहींही दोष झाला नाहीं असा अर्थ. पण 'ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः' असें श्रवण असल्यामुळे 'श्रुतहि नाहीं' असें कसें म्हटलें? अशी आशंका असतां 'ध्यायमानः' शब्दाचा अप्रवृत्तांचें प्रवर्तकत्व आहे? (केवळ) किंवा स्वार्थविधि आहे? असा विकल्प करून पहिल्या पक्षाचा निरास करितो – 'दृष्टसामर्थ्यामुळे' ध्यानाला ऐकाग्र्यद्वारानें जें हें ज्ञानहेतुत्व प्राप्त आहे त्याच्या मध्यें अनुवाद केला जातो. म्हणून हें अनुवादाच्या अभिप्रायानें आहे (म्हणून याला अप्रवृत्तांचें प्रवर्तकत्व नाहीं) असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा निरास करितो – 'म्हणून विध्यंतर' (विधिपदाच्या अभावा

॥ व्याख्यान ॥

ज्याचे त्याच्या उद्देशाने ज्ञानसंतानाचा विधि राहील. पण येथे विधिश्रवणाचा काय उपयोग? पुरुषार्थत्वामुळे स्वतंत्र साक्षात्करणाकरिता पुरुष आपोआप प्रवृत्त आहे. शास्त्रश्रवणादिकांत ज्ञानाभ्यास साक्षात्करणास हेतु सिद्धच आहे. असे आहे तर विधीने काय उपयोग? स्वतन्त्रपुरुषार्थ.

४५१९ ६८२/६८३

॥ विवरण ॥

११९।२५

पण एकाग्र्यद्वाराने ध्यानाच्या आपरोक्ष्याच्या निमित्तत्वामुळे इष्ट द्वारानेही पुरुष प्रवृत्त होवो. अशी आशंका घेऊन- 'पण येथे विधिश्रवणाचा?' येथे ध्यानात अप्रवृत्त प्रवर्तक म्हणून विधिश्रवणाने काय फळ होणार? साक्षात्करणांतर प्र- करीत नाही असे सांगतात- 'पुरुषार्थत्वामुळे स्वतंत्र' स्वसाध्य साधनांत इच्छा लक्षण प्रवृत्तीही विधि विवेचन नाही कारण ती अन्यतः सिद्ध आहे असे सांगतात- 'शास्त्रश्रवणादिकांत' म्हणून निर्वर्तन (= सिद्धि) लक्षण प्रवृत्ति विध्यधीन असली पाहिजे. तिच्याकरिता विधीची कल्पना आहे. असा अर्थ. मग फळ गुणादिकांनीही प्रवृत्तीचा संभव असल्यामुळे सिद्धीकरिता विधीची कल्पना नाही? असे सांगतो- 'असे आहे तर' म्हणून ज्ञान द्वयाचा अभाव असल्यामुळे व [illegible] ज्ञाना-

त. दि. ४०५।२५ ६८२ ११९।२८

॥ विवरणव्याख्यान ॥

मुळे असा अर्थ) पण विधीच्या अंगीकाराने आरंभात समर्थन प्रस्तुत असल्यामुळे 'पण येथे (विधि) श्रवणाचा काय उपयोग?' हें अनुपपन्न आहे. त्यावर सांगतात- 'पण एकाग्र्यद्वाराने' हें अप्रवृत्ताचा प्रवर्तक नाही परंतु बोधक आहे असा अर्थ. समुच्चयार्थी 'ही' शब्दाने येथें विधीचेही अभिधान जाणावें. पण विधीवाचून पुरुष ध्यानांत कशामुळे प्रवृत्त होईल त्यावर सांगतात- 'इष्ट द्वाराने' 'इष्ट जे ऐकाग्र्य ते द्वार- कारण ज्या साक्षात्काराचा आहे ते इष्ट द्वार त्याने असा विग्रह. साक्षात्काराच्या निमित्ताने असा अर्थ. तथापि ध्यानांत प्रवृत्ति कशी? त्यावर सांगतात- 'एकाग्र्यद्वाराने'. येथें ध्यानांत येथून 'म्हणून ज्ञानद्वय' यांच्या पूर्वीपर्यंतचा ग्रंथ स्पष्टार्थ आहे. व्याख्यानांत अपेक्षित उपसंहार पूर्ण करितो- 'म्हणून ज्ञानद्वय' पण कोठे उपयार्थता दिसत असता त्यान्यायाने इतरत्रही विधीची कल्पना होईल असल्यामुळे 'तेथे प्रत्यक्ष' या समाधानाचा आशय काय आहे? अशी आशंका असता काय शब्दाला अनुसरून उपयार्थत्व आहे? किंवा एखादे कामी वाहिला पक्ष नाही असे सांगतो-

६८२ च्यु ४०५८

॥ व्याख्यान ॥

निर्ज्ञात असतां हेतूंत प्रवृत्त होतो. आतां जे पुनः सान्नीकरितां पाठ काढले जातात असें उदाहरण दिले तेथें प्रत्यक्ष उभयार्थता उपलब्ध होत असल्यामुळे तो युक्त आहे. येथें तर न्यायावरून ~~[illegible]~~ प्रतिपत्तव्य आहे. तोतर न्याय युगपत संभवत नाही असा सांगितला. जेही धरलें कीं-

॥ विवरण ॥

ला उभयार्थतेचा प्रयोग असल्यामुळे भ्रमज्ञान विषय नाही असा भाव. स्थायीवस्तु दृष्टान्ताने तर तात्पर्य सापेक्ष शाब्दव्यापाराच्या निर्णय नाही असें सांगतो- 'तेथें प्रत्यक्ष' 'येथें तर न्यायावरून प्रतिपत्तव्य आहे' असें सांगितले त्यावर तो न्याय कोणता ही अशी आशंका असतां निर्विषयज्ञानविषयीची अनुपपत्ति असल्यामुळे (पुढे जे प्रमेय वाचिले या) उभयपरत्व सांगितले त्यावर 'तोतर न्याय युगपत् संभवत नाही कारण वैरूप्य प्रसंग येतो' असे जे सांगितले त्याचे स्मरण करून असे सांगतात- 'तोतर न्याय'. पण "समिधो यजति" "तनूनपातं यजति" "इडो यजति" "बर्हिर्यजति" "स्वाहाकारं यजति" अशी पांच वाक्यें पांच पदार्थांचे विधान करून त्यांच्या क्रमाचेही विधान करितात. म्हणून शब्दावरून द्वैरूप्य असें जे सांगितले त्याचा अनुवाद करितो- 'जेही धरलें कीं' पदार्थच शब्दगम्य आहे क्रम तर अर्थापत्तिगम्य आहे. शब्दगम्य नाही असा परिहार करितो-

॥ विवरणव्याख्यान ॥

'स्थायीवस्तु' कालव्याप्त स्थायित्व असल्यामुळे क्रमाने अनेक प्रयोजनवत्त्व घडते. शब्दगत न्हाहे कारण त्याला तात्पर्य वृत्तीने बोधकत्व आहे. व तात्पर्य नसल्यास उभय प्रयोजनवत्त्व अयुक्त आहे असा अर्थ. 'युगपत संभवत नाही कारण वैरूप्य प्रसंग येतो' यानें युगपत्पक्षाचाही निरास झाला. 'पदार्थांचा विधायक शब्द क्रमाचाही विधायक आहे' असें सांगितले तेथें तो विधायक शब्द कोणता अशी वीक्षा (पृच्छा) असतां सांगतात- 'पण समिधो यजति' ~~इति अनुवदु~~ योग्य? इत्यादि प्रतिवचन प्रश्नाच्या अनुसारी आहे अशी आशंका असतां तात्पर्य सांगतो- 'पदार्थेच' एकाच्या एकेकाची अनेक कर्मांच्या अनुष्ठानाच्या अनुपपत्तीने क्रमाचे ज्ञान होते असा अर्थ. पण शब्दाचा दोन्हीत ही प्राधान्य कां असा प्रकार नाही त्यावर सांगतो- 'शब्दगम्य नाही' कारण तो दुसरीकडून

॥ व्याख्यान ॥

पदार्थांचा विधायक शब्द क्रमाचाहि विधायक आहे. याप्रमाणे ऐकात्म्याच्या प्रतिपादक समन्वय विधिविषयालाहि जाणावें – असें संदेह अ~~[illegible]~~योग्य आहे. कारण जे तर प्रत्येक प्रयाजादि विधि आहेत. त्यांनी पुनः त्यांच्याच क्रमाचें विधान नाही. ते क्रम शब्दाचे अभिधेयही नाहीत. प्रयोगवचन विधीही प्रयोजित करणार। त्यांनांच प्रयोजित करितो.

॥ विवरण ॥

'कारण जे तर' काय पदार्थांहून भिन्न असलेल्या क्रमाचें प्रतिपादन वाक्यांनी सांगितलें जातें? किंवा पदार्थमात्र ~~[illegible]~~ क्रमाचें प्रतिपादन सांगितलें जातें? उत्तर कल्प तर नाही असें सांगतो- 'ते क्रम शब्दाचे' पण विहितांग असतें व अंगाला प्रयोगविधि प्रयोजित करितो. म्हणून प्रयोगवचनाला प्रयोज्यत्व असल्यामुळे क्रमालाही प्रयोज्यत्व असतां वाक्यांपासून पदार्थांहून क्रमाच्या विधि इष्ट आहे? ह्यावर नाही असें सांगतो- 'प्रयोगवचन विधीहि' कारण विहितालाच प्रयोज्यत्व आहे व पदार्थांनाच विहितत्व आहे असा अर्थ. अन्यथा विहित असतां प्रयोगविधि

॥ विवरणव्याख्यान ॥

सिद्ध होतो असा अर्थ. पण प्रयाजादिकांना क्रमानें अभिधेयत्व त्यांनी सांगितलें नसल्यामुळे त्यांचा निषेध असमंजस आहे? अशी आशंका असतां दुसऱ्या हेतूच्या अभिप्रायानें विकल्पपूर्वक अवतरण करितो- 'काय पदार्थांहून' एकाएका पदार्थाची प्रतिपत्ति झाली असतां त्यांची प्रतिपत्ति होत नसल्यामुळे क्रम पदार्थात्मक नाही असा अर्थ. पहिल्या पक्षाचें उत्थापन करितात- 'पण विहित' वाक्यांनी क्रमाचें विधान आहे याविषयी हेतु सांगतात- 'म्हणून प्रयोगवचनाचें' पण प्रयोज्यत्व झाल्यानें क्रमाला विधेयत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात- 'अंगाला' तथापि त्याला विधेयत्व कसें? ह्यावर सांगतात- 'विहित अंग असतें' विहितालाच अंगत्व असल्यामुळे व अंगाला प्रयोगवचनानें प्रयोज्यत्व असल्यामुळे व दुसऱ्या विधायकाचें निरूपण केलें नसल्यामुळे वाक्यच क्रमाचें विधायक आहे. असा अर्थ. प्रयोगवचनानें प्रयोज्यत्वच असिद्ध आहे असें सांगतो- 'ह्यावर नाही?' व्याख्यानांत अपेक्षित हेतु सांगतो- 'कारण विहितालाच' पदार्थांनाच विहितत्व असिद्ध आहे कारण प्रयोगवचनानें प्रयोज्यत्व असल्यामुळे क्रमालाहि विहितत्व आहे? असें मानल्यास निराकरण करितो- 'अन्यथा'

॥ व्याख्यान ॥

ते तर क्रम नाहीत असें सांगितलें. क्रमनामक मुख्य नाहीच असेंही नाहीं, कारण त्याच्या ज्ञानाचा

॥ विवरण ॥

१ प्रयोगविधि असतां विधि (विहितत्व) कल्पना असा इतरेतराश्रय येतो. पण मग पदार्थच क्रम आहे म्हणून पदार्थांना प्रयोजित करणारे क्रमाला हा प्रयोजित करीत [illegible] खबर नाहीं असें सांगतो - 'तत्तर' दुसरा म्हणतो - क्रमनामक कोणी नाहीं. कारण एकैक पदार्थ असतां तो दिसत नाहीं व त्याला अनेक पदार्थाश्रयत्व असतां पदार्थ यौगपद्यामुळे क्रमाचा अयोग आहे. अयौगपद्य असतांही उभयाश्रय धर्माचा अयोग आहे हीं खबर सांगतो - 'क्रमनामक'

॥ विवरणव्याख्यान ॥

प्रयोगवचनाने प्रयोज्यत्व = विहितत्व असा अर्थ. पण प्रयोगवचनाने प्रयोजकत्व घेऊनही क्रमाला विहितत्व सिद्ध होईल म्हणून इतरेतराश्रयत्व नाहीं अशी शंका घेतात - 'पण मग पदार्थच' (तरी) एकैकाच्या स्वरूपाची उपलब्धि होत असतांही त्याच्या अनुपलब्धी प्रमाणे एकैका पदार्थाची उपलब्धी होत असतांही क्रमाची अनुपलब्धि मुक्त आहे असा अर्थ. त्याची एकरूपत्वाभावामुळेच अनुपलब्धि आहे. परंतु क्रमाला पदार्थैकरूपत्व असतां त्याची अनुपलब्धि असतां क्रमाची उपलब्धि होईल. परंतु ती नाहीं म्हणून त्याला पदार्थैकरूपत्व असिद्ध आहे असें सांगतो - 'खबर नाहीं' पण पदार्थांच्या विधायका (शब्दा)ने क्रमाच्या सिद्धीचा अंगीकार करणाऱ्याकडून क्रमाच्या अभावाचा आश्रय केला जात नाहीं. तेव्हां त्याचा निषेध अनुपपन्न आहे अशी आशंका असतां सांगतो - 'दुसरा म्हणतो क्रमनामक' काय एकैकपदार्थवृत्ति क्रम आहे किंवा अनेकपदार्थवृत्ति? पहिला पक्ष नाहीं असे (तो) सांगतो - 'कारण एकैक' दुसऱ्या पक्षीं ही काय तो युगपत् उत्पन्न होणाऱ्या अनेकांत वर्तन करणारा आहे किंवा क्रमाने उत्पन्न होणाऱ्या अनेकांत? पहिला पक्ष नाहीं असें सांगतो - 'त्याला अनेक' दुसऱ्या पक्षीं ही काय एकैकाची परिसमाप्ति न करितां अनेकांत राहतो किंवा परिसमाप्ति करून? हें सांगितलें पाहिजे. पहिला पक्ष नाहीं असें तो सांगतो - 'अयौगपद्य असतांही' कारण उत्पन्नांत व अनुत्पन्नांत संयोग दिसत नाहीं असा अर्थ. दुसऱ्या पक्षीं तर एका व्यक्तीची उपलब्धि झाली असतां 'गाय' अशा उपलब्धी प्रमाणे एका व्यक्तीची प्रतिपत्ति झाली असतांही क्रमाची प्रतिपत्ति होईल असा अर्थ. पण उपलब्ध होत असतांही क्रम निरूपण करितां येत नाहीं असें सांगितलें.

॥ व्याख्यान ॥

व शब्दाला निरालंबनत्व प्रसंग येतो. तेथे क्रम नामक वस्तुभूत धर्म आहेच. ते (वस्त्वादिक) च कोणत्यातरी उपाधीनें वनाप्रमाणे क्रमबुद्धि व शब्दाचे आलंबन आहेत किंवा स्मृति विज्ञान-

॥ विवरण ॥

पण । संयोगाप्रमाणे उभयाश्रयत्व असतां पदार्थ यौगपद्यामुळे क्रमाचा अयोग आहे, असें सांगितलें त्यावर सांगतो- 'तेथें क्रमनामक' क्रमत्वामुळेच यौगपद्याची अपेक्षा नाहीं असा भाव, पण देशकालवस्तु उपाधि परामर्शामुळे क्रम दिसत नाहीं. त्यांना सांगतो- 'तेच' = देशकालवस्तूच. पण अनुष्ठेय पदार्थांना अनिष्पन्न स्वभावत्व असल्यामुळे देशकालवस्तु क्रम कोठे? त्यावर सांगतो 'किंवा स्मृति विज्ञानच' स्मर्यमाण पाठक्रमच अनुष्ठेय पदार्थांत उपरागाला प्राप्त होतो.

॥ विवरणव्याख्यान ॥

त्याचा अनुवाद करितो- 'पण संयोगाप्रमाणे' (एकेका[illegible]) (विवादी) सांगितलेल्या यौगपद्य प्रसंगाचा निरास करितो - 'क्रमत्वामुळेच' (अनेकांत) संयोगाची संयोगविशिष्ट अवयवांत वृत्ति नसेल. त्यांच्या अभावविशिष्टांतही नसेल परंतु प्रयोगयोग्यांत असेल. तसे क्रमालाही एकक्षणावच्छिन्न पदार्थ वृत्तित्व असतां क्रमत्वाच्या बाधात् होत असल्यामुळे अयुगपद्भावि (अनेक) पदार्थ वृत्तित्व आहे. पदार्थांना अविद्यमानत्व असल्यामुळे क्रमाला तदाश्रयत्व नाहीं! अशी ही शंका घेतां येणार नाहीं कारण अविद्यमानही प्रतियोगीला जसे अभाव निरूपकत्व आहे, वा जसे भावि घटादिकाला व्याप्ति निरूपकत्व आहे. तशी अविद्यमानालाही क्रमाश्रयत्वाची उपपत्ति होते. म्हणून अयुगपद्भावींतही क्रमाची उपपत्ति होते. असा अर्थ. पण एकदेशी मध्ये त्याच्या असण्यावाचून वनाच्या अनुपलब्धी प्रमाणे, प्रत्येक पदार्थादिकांच्या असण्यावाचून क्रमाची उपलब्धि होत नसल्यामुळे व गौरव दोष प्राप्त असल्यामुळे क्रमाचा स्वीकार करूं नये. अशी दुसरा शंका घेतो- 'पण देशकाल' इत्यादींनीं उत्तर सांगतो- 'त्यांना सत्क्रम गतो' (वन) इत्यादि विषम आहे अशा (दुसरा) शंका घेतो- 'पण अनुष्ठेय' सर्व त्या एकदेश त्यामुळे त्याचे उपाधि असतां त्यांना वन ज्ञानादि विषयत्व आहे. सोमयागादिकांना तर अयुगपत् असल्यामुळे, एकदेश कालातील क्रम ज्ञानादि विषयत्व नाहीं असा अर्थ. पण स्मृतिज्ञानाला उपलब्धीच्या अनुरोधाने पदार्थांचे परामर्शित्व असले तरी पदार्थांत

क्रमाच्या प्रतिपादक कशी? अशी आशंका असतां सांगतो- 'स्मर्यमाण'

व्याख्यान

च अनुष्ठानकाळी उपलब्धीच्या अनुसार पदार्थांना परामर्शीत करील. सर्वथा तर एकैक पदार्थांच्या अवबोधन ज्ञानाहून अतिरिक्त ज्ञानान्तर आहे. तेही कर्त्यांच्या एकत्वामुळे व पदार्थांच्या अनेकत्वामुळे एककाळीं अनुष्ठानाचा असंभव आहे म्हणून अपेक्षित व संनिहित असें प्रयोगवचनानें ग्रहण केलें जाते. असें तथ्य

॥ विवरण ॥

असा अर्थ. उपसंहार करितो- 'सर्वथा' पण क्रमाला विधायक सांगितले पाहिजे? नाही कारण क्रमाला अविधेयत्व आहे. परंतु अनुष्ठेयांच्या विशेषणतेने क्रम जाणल्या जातो व अननुष्ठेयत्वामुळे त्याचे विधान केलें जात नाही. तर मग कशाने क्रम कळतो? एकाला अनेक पदार्थांच्या एककाळी प्रयोगाच्या अनुपपत्तीने असें सांगतो- 'तेही'. तेही ज्ञानान्तर प्रयोगवचनाने ग्रहण केलें जाते असा संबंध. पण प्रयोगवचनाला क्रमज्ञानाचे संपादकत्व नाही कारण अनुपपत्ति दिसत नाही? त्यावर सांगतो- 'कर्त्यांच्या एकत्वामुळे' क्रम सोडून अनुष्ठान असतांही आकांक्षेच्या उपरमाच्या शंकेच्या निरास करितो- 'व संनिहित असे' अर्थामध्ये क्रमाचा अभाव असतांही पाठक्रमांत संनिहित असा अर्थ

॥ विवरणव्याख्यान ॥

पाठक्रमच? पण क्रमाला विधायकाच्या अभाव असल्यामुळे त्याला अनुष्ठेयत्व नाही? अशी दुसरी शंका घेतो- 'पण क्रमाला' अननुष्ठेयत्व इष्ट आहे असें सांगतो- 'नाहि कारण क्रमाला' कारण त्याला अक्रियात्व आहे असा अर्थ. मग क्रम सोडूनही अनुष्ठान होईल? अशी आशंका असतां पाठक्रमाच्या अनुसार पदार्थांतही क्रमाची प्रतीति होत असल्यामुळे त्याचा विरह नाही असे सांगतो- 'परंतु अनुष्ठेयांच्या' पण अक्रियारूप दध्यादिद्रव्यांसारखे क्रियेच्या उपरक्तत्वाने विधेयत्व आहे तसें क्रमाला ही आहे? अशा शंकेचा निरास करितो- 'अननुष्ठेयत्वामुळे' मग क्रमाची प्रतिपादक कशी? अशी (दुसरी) शंका घेतो- 'तर मग कशाने' पदार्थांना अलौकिकत्व असल्यामुळे क्रम तर लौकिक नाही. तो शब्दही नाही कारण शब्दाला अन्यपरत्व आहे असा अर्थ. अर्थापत्तीने सोडवतो असें सांगतो- 'एकाला अनेक' अनुपपत्तिविपर्ययी दुसरी शंका घेतो 'पण प्रयोगवचनाला' उत्तर सांगतो- 'त्यावर सांगतो' पण पूर्वोत्तर वाक्यांतही क्रमाची अप्रतिपत्ति असल्यामुळे 'व संनिहित' असें कसें म्हटले? अशी आशंका असतां सांगतो- 'अर्थात् पद्ये क्रमाचा'

॥ व्याख्यान ॥

युक्त आहे. यथेतर तशी दोन ज्ञानें नाहीत. कीं जी एकात्म्य विषयी व विधि विषयत्वा विषयीं राहतील. म्हणून येथें विधानांचें अश्रवण असल्यामुळें विधेयाच्या अभाव आहे. म्हणून (सफळत्वामुळें) न, व अध्याहारानेंही प्रमाणाचा अभाव आहे. म्हणून, प्रयोगवचनाविध नाही कीं जो मंत्राप्रमाणें ज्ञानाच्याही पुनः प्रयोगानें विधान करील. म्हणून कार्य विषयही वेद वस्तुतत्वाला अवबोधित करितात असेंच आहे. पुनः जो दृष्टांत दिला कीं रूप असतांना चक्षु द्रव्यालाही बोधित करितो. तसें कार्य असतां वेद तत्वालाही जाणवितो. असा. तेथें नेत्र ज्याला ज्याला बोधित करितो तेथें स्वतंत्रच प्रमाण असतो हे युक्त आहे. यथेतर जेथें तात्पर्य असेल त्याला प्रमेयत्व

॥ विवरण ॥

त्याला अतिक्रमण न करितां असा अर्थ. पदार्थांना अनिष्पन्नस्वभावत्व असल्यामुळें क्रमाचा अभाव असतांही पाठक्रमाचें अतिक्रमण न करितां सन्निहित अनुष्ठेय आहे. असें आग्नेयादि प्रयोगवचनानें ग्रहण केलें जातें असा योजना. म्हणून सर्वत्र प्रमाण द्वयानेंच प्रमेयद्वयसिद्धि होते. असा प्रकरणार्थ. 'यथेतर तशी' प्रमाणद्वयानें प्रमेयद्वयाला सिद्ध करणारें असा अर्थ. 'दोन ज्ञानें' येथून 'तत्वालाही जाणवितो' येथपर्यंतचा ग्रंथ स्पष्टार्थ आहे. प्रतिवस्तूंत संप्रयोग असतां निरपेक्षच प्रमाण नेत्र आहे. तसा प्रतिपदार्थांत शब्द प्रमाण नाही. पर जेथें तात्पर्य आहे तेथें मिळून एक प्रमाण असतें असें सांगतो— 'तेथें नेत्र'

॥ विवरणव्याख्यान ॥

'पदार्थांना' हा ग्रंथ स्पष्टार्थ आहे. दृष्टान्ताच्या निरसनाच्या उपसंहाराला अपेक्षित दाखवितो 'म्हणून सर्वत्र' अथवा नियोगाला बोधक लिङादि पदांचे ज्यांचे विषयादिकांची सिद्धि होते त्याप्रमाणें येथेंही दोन्हींची सिद्धि कां होणार नाही? अशी आशंका असतां सांगतो— 'म्हणून सर्वत्र' लिङादिकापासून नियोगाची प्रतिपत्ति होते व सामर्थ्यावरून प्रकृतिपासून विषयाची प्रतिपत्ति होते असें असतां येथें हे प्रमाणद्वय आहे असा अर्थ. पण नेत्र ज्याला ज्याला बोधित करितो तेथें तेथें स्वतंत्र प्रमाण आहे असें सांगितलें तें अनुपपन्न आहे. कारण त्याला संप्रयोगाचें सापेक्षत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो— 'प्रतिवस्तूंत' पण अभिधानें प्रत्यय विधिविषयक आहे असें

॥ व्याख्यान ॥

आहे. पदांनीं जे जे कळते त्याला त्याला नाहीं असें वैफल्य आहे? सांगतो- ज्ञानद्वय नसो,
मा (विधिज्यांत विरुद्ध आहे असाच)
जो हा आभिधानिक प्रत्यय आहे तो विधिविषयकच आहे. तो विहित असतां सामर्थ्यावरून सर्वांचा आत्मस्वभावता सिद्ध होते कारण ज्ञानाला सविषयत्व आहे. मग असें असतांही शब्दापासून

॥ विवरण ॥

पण आभिधानिक आत्मतत्त्वज्ञान प्रमेयपरच नसो परंतु विधायकपदजन्य विधिप्रमिति विषयत्वाने विधिविषयतेने आत्मा विधिशेष आहे. असें सांगतात- 'ज्ञानद्वय नसो' मग कधी आत्म्याची सिद्धि कशी? त्यावर सांगतात- 'तो विहित असतां सामर्थ्यावरून' पण कशाच्या अनुपपत्तीने (सामर्थ्यावरून) तत्त्वसिद्धि घेते? तें सांगतात- 'कारण ज्ञानाला' ज्ञानविषयाच्या अन्यथा अनुपपत्तीनेंच असा अर्थ. परिहार करितो- 'मग असें असतांही' एका विषयांत प्रथम प्रतिपत्ति (=ज्ञान) अप्रमाण असून त्यानंतरचें द्वितीयज्ञान प्रमाण आहे. असेंच श्रुति प्रमाण नसून श्रुतार्थापत्तिच प्रमाण आहे. इत्यादि विरुद्ध आहे.

॥ विवरणव्याख्यान ॥

असें कसें ठरवले जाते? कारण त्याच्यापासून आत्म्याची (आत्म्यांत) प्रतिपत्ति होते? अशी आशंका असतां सांगतात- 'पण आभिधानिक' जरी आत्मा शब्दापासून प्रतीत होतो तरी त्याचे ठायीं तात्पर्य नाहीं. असा अर्थ. मग ज्ञानाचें (=शब्दाचें) तात्पर्य कोठें आहे? असे विचारले असतां सांगतात- 'परंतु'. मग त्याला विधिविषयत्व कां? असें विचारले असतां सांगतात- 'विधायकपदजन्य' 'प्रमितिविषयत्व' = प्रमिति निषिद्धकार्य. पण ज्ञानाला सविषयत्व कसें? अशी शंका असतां सांगतात 'ज्ञानविषयाच्या अन्यथा' पण शब्दा-
अशी वाक्यार्थप्रतीति
पासून प्रतीत न होणारा ते अर्थ / सामर्थ्यावरून प्रतीत होतोच मा परिहाराला अवकाश आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'परिहि-रूकवितो' आणखी परिहार त्यांना सांगतो- 'एका विषयांत' कारण श्रुतीची अनुपपत्ति श्रुतींत अंतर्भूत आहे? किंवा नाहीं? पहिल्या पक्षीं शब्दापासून उत्पन्न होणारे प्रथम ज्ञान त्यांत अप्रमाण असून दुसरें तर प्रमाण आहे हें अति साहस आहे असा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषित करितो- 'व श्रुति' प्रत्यक्षादिकाच्या विरोधामुळें अनुपपत्ति ही प्रमाण नाहीं असा अर्थ. तत्त्वमस्यादि वाक्यांनी विधिप्रतीति होत नाहीं. तथापि ती विधींत प्रमाण आहे हें विरुद्ध आहे इत्यादि 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. पण प्रतिपत्ति विधीनें

॥ व्याख्यान ॥

अविवक्षित अर्थ सामर्थ्यावरून विवक्षित आहे अशी वाक्यार्थ ज्ञात्ता जास्तच शोभते. पुनः नियोगापासून कळणारा प्रतिपत्ति (ज्ञान) विधि वास्तवसंसर्गाला जाणवीत नाही कारण "वांचं धेनु मुपासीत"

॥ विवरण ॥

असा अर्थ पुनः ज्ञानाच्या विधानाची अनुपपत्ति ज्ञेयाच्या वस्तुत्वाला जाणवीत नाहीं असें सांगतो 'पुनः नियोगापासून', पण ज्ञानाच्या स्वतःप्रामाण्यामुळे त्याला तथाभूतार्थत्व युक्त आहे कारण अन्यथा आरोपित ज्ञानाच्या विधीला प्रयोजनाचा अभाव आहे. ते स्पष्ट सांगतो - 'कारण वांचं धेनुम्'. मग आभिधानिक प्रत्ययाला ही विधिसंसर्गाच्या पूर्वी स्वतः प्रमाण्य कां असणार नाहीं? असा भाव. पण येथें विषय ज्ञानानेही स्वविषय प्रमितीच इष्ट फल आहे. आरोपित विषयत्व

॥ विवरणव्याख्यान ॥

कारण वस्तीतिकर्तव्यतेच्या संसर्ग काढत असल्यामुळे तो नियमाने वास्तविक संसर्गाला जाणवीत नाहीं असें कसें म्हटलें? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतो - 'पुनः ज्ञानाच्या' कारण ज्ञेयाच्या सत्वावांचून (विधानाच्या) अनुपपत्तीचा अभाव आहे हे सामर्थ्य. अनुपपत्तीचा अभाव असिद्ध आहे अशी शंका घेतात - 'पण ज्ञानाच्या' दुसऱ्या हेतु ही सांगतात - 'कारण अन्यथा' 'आरोपित ज्ञानाच्या' = आरोपित विषयाच्या ज्ञानाच्या असा अर्थ. 'प्रयोजनाचा अभाव आहे' येथें 'त्यामुळे उपासना विधीला वैयर्थ्य येईल असा अनुषंग: समारोपित विषय असणारी ब्रह्म चन्द्रादि उपास्तींना त्यांच्या प्रामाण्यामुळे जसा फलवत्वाचा आश्रय केला जातो. तसा येथें ही असें सांगतो 'स्पष्ट सांगतो'. स्वतः प्रामाण्यामुळे तथाभूतार्थत्व सांगितले त्याचा निरास करितो - 'मग आभिधानिक' मग स्वतः प्रामाण्य असतां विधिसंसर्गाच्या अभाव असतांही आभिधानिक प्रत्ययाच्या प्रामाण्याचा आश्रय कोठें ही त्यागात नाहीं की असा कोणी दृष्टान्त आहे? अशी शंका घेतात - 'पण येथें विषय'. वाक् धेन्वादिकांना अविद्यमानत्व असल्यामुळे आरोपित विषयत्व युक्त आहे. आत्म्याला तर परमार्थत्व असल्यामुळे त्याच्या प्रतीति जनकत्वाने ज्ञानाला फलवत्व असतां समारोपित विषयत्वाने अदृष्ट कल्पना अयुक्त आहे. असा अर्थ. प्रत्यक्षाच्या विरोधामुळे "वांचं धेनु मुपासीत" इत्यादिकाला जसा स्वविषयक प्रतीति जनकत्वाचा अभाव आहे तसा येथें ही.

॥ व्याख्यान ॥

इत्यादि परिकल्पित विषय अशाही चोदनालक्षण प्रतिपत्ति ~~फल~~वान् होतात. व हें यथेर्थं युक्त आहे. कारण असत्य~~र~~ शब्दाला प्रत्यक्षादिकांचा विरोध असतां तशा निश्चय हेतुत्वाचा अयोग आहे. म्हणून कार्यनिष्ठ वेद असतां वस्तुतत्त्वासिद्धि मनोरथमात्र आहे. म्हणून अहंप्रत्ययानें कळणाराच आत्मा आहे. त्याचें शब्दानें कळणारें अतीन्द्रिय रूपान्तर नाहीं. कारण शब्दाला तेथें सामर्थ्य नाही व असें असतां "अयमात्मा ब्रह्म" [मां.२] "एष त आत्मान्तर्याम्यमृतः" इ-

२०।२५ ३८०। ३८१

॥ विवरण ॥

असतां त्यांचा परित्याग होऊन अदृष्ट कल्पना होतेती? त्यावर सांगतो- ‘व हें यथेर्थं’ सकल प्रमाणांच्या विरोधानें दृष्ट कल्पनेपेक्षा अदृष्ट कल्पनाच युक्त आहे असा अर्थ. ‘म्हणून कार्यनिष्ठ वेद असतां’ असा अनारम्भवादी सिद्धान्तैकदेशी यांच्या दूषणाचा उपसंहार करितो- पण कार्यनिष्ठ वचन वस्तुपर नाहीं तर आत्म्याची सिद्धि कशी? अशी आशंका असतां काय आत्ममात्राची असिद्धि आहे किंवा विशेषात्म्याची? असा विकल्प करून पहिला पक्ष नाहीं असें सांगतो ‘म्हणून अहंप्रत्ययानें’ उभय पक्षाची अनुपपत्ति म्हणून शब्दाचा अर्थ आहे. दुसऱ्या पक्षाचा निरास करितो- ‘त्याचें शब्दानें’ परमेश्वराला धर्मब्रह्मविषय शास्त्र प्रमाण असतां अध्ययनविधीनें ग्रहण केलेल्या पदांना सामर्थ्य कल्पयेत? यावर नाहीं असें सांगतो- ‘व असें’

१२१।१८

॥ विवरणव्याख्यान ॥

आहे असें सांगतो- ‘त्यावर सांगतो’ ‘अदृष्ट कल्पना होतें’ असें सांगितलें त्याचा निरास करितो- ‘सकल प्रमाणांच्या’ वेदाला कार्यनिष्ठत्व असतां वस्तूची असिद्धि होत असल्यामुळें त्याला कार्यनिष्ठत्व नाहीं? ~~असा~~ अशा भ्रमाचा (अनारंभवादी) निरास करितो (असें विवरणकार सांगतात-)- ‘म्हणून कार्यनिष्ठ वेद असतां असा अनारंभवादी’ कार्यपरत्व तर सिद्धान्तैकदेशी याकडून सांगितलें जातें. त्यावर कार्यनिष्ठत्व असतां वस्तुनिष्ठत्व संभवत नाहीं असा अनारंभवाद्याकडून त्यांच्या मताचें ~~वादी त्यांच्या मताचा निरास~~ निरसन आहे ~~करितो असा अर्थ~~. “तत्त्वमसि” “अयमात्मा ब्रह्म” इत्यादिकांचें अदृष्ट नसल्यामुळें व स्वतंत्र प्रामाण्य नाहीं म्हणून तेही नाहींत कारण (त्यांचा प्रमाण) त्यांची प्रतिपत्ति होत नाहीं म्हणून नावलौकिक तुल्यता येईल? अशी शंका घेतात- ‘पण वेदावांचून’ "आदित्यो यूपः" इत्या- ~~दिकांत~~ यूपादि शब्दांनी जशी उपचारामुळें अन्यत्र प्रवृत्ति आहे तशी येथेंही आहे असें सांगतो ‘म्हणून नाहीं’

॥ व्याख्यान ॥

[बृ. ३।७।२३] असे ब्रह्म अंतर्याम्यादि शब्द अर्थप्रत्ययाने कथणाऱ्याच आत्म्यांत कसेतरी (उपचाराने) वर्तन करितात. त्याने "स आत्मा तत्त्वमसि" [छां. ६।८।७] असे विद्यमान व आरोपित गुणांनी आत्मोपासनेच्या मोक्षफळाकरिता विधान केले जाते. हे युक्त आहे म्हणून न्यायानुरक्त वेदार्थाचा संभव असल्यामुळे व त्याच्या सर्व दृष्टीने विचार केला असल्यामुळे दुसरे काय अवशिष्ट राहते की जे ब्रह्म जिज्ञासेच्या आरंभाला प्रयोजित करील?

[सिद्धान्ती-] सांगतो- हे असे असेल जर सर्वच वेदार्थ विचार्य असते "अथातो"

॥ विवरण ॥

असंज्ञा" इत्यादि "त्याच्या सर्व दृष्टीने" पूर्वतंत्रांत, वेदांतात संकीर्तित समस्त गुणविशेष आत्म्याच्या उपासनोत्पत्ति विधींत, शमादि इतिकर्तव्यतेच्या उपसंहाराच्या विनियोग विधींत, मोक्षकामाने येऊ पाविष्यतेने अधिकार विधींत व सांगकर्मांत आधीच त्याच्या अनुष्ठापकत्वाने प्रयोग विधींत, जसे वेदान्त पर्यवसानाला प्राप्त होतात तसे सर्व निरूपित आहे असा अर्थ.

येथें काय शब्दाच्या काक्षिप्त स्वार्थावबोध सामर्थ्यामुळे सर्व वेदकार्य पर्यंत निरूपित आहे असे समजले जाते.

किंवा सूत्रकारादि आणि पुरुष वचन सामर्थ्यामुळे परिरक्षा पक्षांतर उक्त नाही कारण पुढें समन्वय सूत्रांत त्याचे ~~निरा~~ निराकरण करावयाचे ~~[illegible]~~ आहे. ~~अभि~~ [illegible] सामर्थ्यामुळे? असे आक्षेप तर सांगतात- "हे असे असेल जर सर्वच -- उपपन्न"

॥ विवरणव्याख्यान ॥

'पूर्वतंत्रांत' हे पद 'ते सर्व निरूपित' याच्याशी संबंधित आहे. 'पूर्वतंत्रांत' पूर्वतंत्र न्यायावरून असा अर्थ: उत्पत्ति विध्यादि कांचे पूर्वीच व्याख्यान केलेले आहे.

पण 'सांगतो' इत्यादिकाने सर्व वेदार्थाचा विचार तितका नाही असे सांगितले ते असाधु आहे; कारण वेदान्ताचे उदाहरण घेऊन विचाराचा अभाव असला तरी त्यांचा विशेषत्व असल्यामुळे व विध्यांचा अपरोक्षत्वाय पूर्वतंत्रांत सांगितला असल्यामुळे त्यांचा पूर्ण अनारंभत्व सांगितले. अशी आशंका असतां कार्यपरत्व असिद्ध आहे असे सांगतात— 'येथें काय' 'येथें' पूर्वतंत्रांत.

॥ व्याख्यान ॥

"धर्मजिज्ञासा" अशा रीतीने उपक्रांत व विचारित असें (परंतु तसें नाहीं कारण) ज्यामर्थी

क कार्यनिष्ठत्व वेदभाग निराशित आहे. वस्तुतत्त्वनिष्ठ नाहीं.

॥ विवरण ॥

पण धर्माचाच उपक्रान्तत्व असतांही प्रसंगिकत्वाने हें ब्रह्म निरूपित आहे? त्यावर नाहीं असें सांगतात- 'अविचारित असेंच' पण वेदार्थी पाद्यांत विचार प्रवृत्त नाहीं असें कसें कळते? सूत्र भाष्य वार्तिककार वचन सामर्थ्यावरून असें सांगतात- 'ज्यामर्थी कार्यनिष्ठत्व'

येथें हा आशय- 'अथातो धर्मजिज्ञासा' [पू.मी. १।१।१] या सूत्राचा धर्म मीमांसा शास्त्र विषय आहे ते काय आरंभ करण्यास योग्य आहे किंवा नाहीं असा येथें विचार (=संशय) आहे. तें आरंभ करण्यास योग्य नाहीं असा पूर्वपक्ष. कारण विचार्यमाण अर्थाच्या (=धर्माच्या) निर्णयाकरिता प्रत्यक्षादिकांना असाधनत्व आहे. वेदाचाहि ॥-

---

" विवरणव्याख्यान "

पण धर्माचाच उपक्रान्तत्व असतांहीं जसा प्रसंगामुळे प्रतिपाद्य चोदनार्थ निरूपित आहे, तसा वेदान्तार्थ ही निरूपित आहे? अशी शंका घेतो- 'पण धर्माचाच' 'प्रासंगिकत्वाने' सर्व वेद धर्मांत प्रमाण आहे असें संगितले असतां वेदान्तांना धर्मांत प्रामाण्य कसें? अशी आशंका असतां सर्व वेदाला कार्याधीनत्व असल्यामुळे स्वाध्याय शेषत्वाने वेदान्तांचे ही प्रामाण्य मानणे योग्य आहे म्हणून प्रसंगाला तेथे निरूपितत्व आहे असा भाव. विवक्षित वेदान्तार्थ निरूपण अनुपलब्धीच्या विरुद्ध आहे. असें सांगतात- 'त्यावर नाहीं असें सांगतात' उक्तार्थांत विनिगमना (=नियामक) काय ते कारण विचारतो 'पण वेदार्थी पाद्यांत' अनुपलब्धि असिद्ध आहे. असा भाव. 'ज्यामर्थी' येथें अपेक्षित हेतूला सांगतात- 'सूत्र भाष्य वार्तिककार'

सामर्थ्याचा विवरण करतात- 'येथें हा आशय' आलंबनाच्या संभव असंभवाच्या योगाने येथें चिंता आहे असें जाणावें. विचार प्रमाणानुग्राहक तर्क. तेंव्हा अनुग्राह्य प्रमाण प्रत्यक्षादि आहे किंवा आम्नाय (वेद) परिज्ञापक नाहीं असें सांगतो- 'कारण विचार्यमाण' धर्माला प्रत्यक्षादिकांनी अयोग्यत्व असल्यामुळे त्यांना अनुग्राह्यत्व नाहीं असा अर्थ. दुसऱ्याला दूषित करतो- 'वेदाचाहि'

॥ विवरण ॥

अध्ययनविधीने अदृष्टार्थ तेने नियोग आहे म्हणून हेतुच्या विधीकरिता अध्ययनविधि अदृष्टार्थ आहे? किंवा दृष्टार्थ आहे? असा प्रथम विचार केला जातो. दृष्टसाधनांत विधीचा उपयोग असल्यामुळे व (दृष्टांत विधि असताही) अदृष्टाचा नियम असल्यामुळे तो अदृष्टार्थ आहे असं प्राप्त झाले. पण "स्वाध्यायोऽध्येतव्यः" [तै. आ. २।१५।७] येथे स्वाध्याय अध्ययनक्रियाकर्मत्वाने कडून त्याचा संस्कार्य आहे किंवा आप्य आहे. असा दृष्टार्थ संभवत असतां त्याला अदृष्टार्थता कशी संभवेल? नाही कारण संस्कृताचा क्रत्वंतरांत विनियोजक प्रमाणाचा अभाव आहे व अवघातादि निष्फल आहे. पण अवाप्ति आम्नायापासून फलवत् अर्थावबोध दृष्टफल असतां अदृष्टकल्पना।

॥ विवरणव्याख्यान ॥

~~पण~~ अदृष्टार्थ तेने विनियोग असिद्ध आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'म्हणून हेतुच्या' 'अध्ययनविधि' याने 'तव्य' प्रत्ययाभिधेय शाब्दभावना सांगितली जाते. शाब्दभावना आणि अर्थभावनेचे काय अदृष्टफल भाव्य आहे? किंवा दृष्टफल? असा विचार करण्याचा अर्थ. दुसऱ्या पक्षाला दूषण देतात- 'दृष्टसाधनांत' अन्वयव्यतिरेकाने सिद्ध फलाच्या साधनांत विधीचा असंभव आहे असा अर्थ. पण 'व्रीहीनवहन्यात्' येथे दृष्टफलसाधनांतही विधि दृष्ट आहे? अशी आशंका असतां तेथेही अदृष्ट आहे असे सांगतो- 'व अदृष्टाचा' कारण जेथे अदृष्ट असते तेथेच विधि असतो असा नियम आहे असा अर्थ. म्हणून परिशेषपक्ष ग्रहणीय आहे असे सांगतो 'ता अदृष्टार्थ'. काय अध्ययनविधीचा स्वतंत्र अदृष्टार्थत्व आहे? किंवा कर्म-
(उत्तरपक्षी)
कारकसमवायी अदृष्टार्थत्व? असा विकल्प करून पहिल्याला दूषित करितो- 'पण स्वाध्याय'. 'कडून त्याचा' = 'तव्य' प्रत्ययाने असा अर्थ. क्रियाजनित अतिशयशाली 'संस्कार्य' शब्दाचा अर्थ आहे. 'आप्य' = स्वाधीनोच्चारणक्षमत्व. त्याचा विषय 'आप्य' असा अर्थ. कर्मकारकगतत्वाने दृष्ट अतिशयाचा येथे संभव असल्यामुळे स्वतंत्र अदृष्टार्थत्व कसे? असे सांगतात- 'असा दृष्टार्थ'. दृष्टसंभव असिद्ध आहे असे सांगतो- 'नाही कारण संस्कृताचा' क्रत्वंतर विनियुक्त किंवा विनियोजक प्रमाणाचा संस्कार दृष्ट आहे स्वाध्याय तसा नाही म्हणून त्याला संस्कार्यत्व नाही असा अर्थ. सुखप्राप्ति किंवा दुःखनिवृत्तींत अन्यतराला फलत्व असल्यामुळे व स्वाध्यायाच्या आप्तीला तद्रूपत्व नसल्यामुळे आप्तीलाही फलत्व नाही असे सांगतो '[illegible]' [illegible] असेल तरी परंपरेने फलत्व आहे? अशी शंका घेतात- 'पण अवाप्ति आ-

॥ विवरण ॥

करणे शक्य नाही? नाही कारण इष्टफल साधनांत दुसरीकडून च प्रवृत्ति होत असल्यामुळे विधीच्या वैयर्थ्याचा प्रसंग येतो. पण कर्मकारक प्रधान अध्ययनाचें स्वतंत्र अदृष्ट फलत्व कसें कल्पिले जातें? नाहीं कारण कर्मकारकाका वैफल्य येत असल्यामुळे सक्तुन्यायानें ~~स्वाध्याया~~ याने अध्ययन करो अशी वैपरीत्य कल्पना आहे. पण अध्ययनाचें अर्थवादांत हि फलश्रुति नाहीं? तसे नाहीं कारण जपाध्ययनफल घृतकुल्यादिकांच्या अध्ययनसामान्याने प्रथमा.

विवरणव्याख्यान

न्यायापासून फलत्वाचा अंगीकार करून विधेयत्वाला दूषित करितो - 'नाहीकारण इष्टफलसाधनांत' 'दुसरीकडून च' इत्यादि ग्रंथाने असा अर्थ. पण 'व्रीहीनवहन्यात्' असा कर्मकारक समवायी अदृष्टाकरितां जसा विधि आहे तसा 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' येथें हि ~~[illegible]~~ अवघात स्वाध्याय समवेत अदृष्टार्थत्वाने विधि अर्थवान् होईल? असें असेल तर नाहीं कारण 'व्रीहीन्यजेत' येथे दर्शपूर्णमास अपूर्वांत निमित्त युक्त व्रीहींना अपूर्व साधनत्व कसें? अशी आकांक्षा असतां पुरोडाश द्वाराने असा निश्चय होतो. पुरोडाशाला ही तंडुल निष्पत्तीने, व तंडुल निष्पत्ती ही अवहननाने असा नियम केला जातो. तसें स्वाध्यायाला अपूर्वांगत्व नाहीं कीं ज्याने अध्ययनांत नियम घडेल. असें वैषम्य आहे. म्हणून कर्मकारकगत इष्टफल समवायि अदृष्टार्थ विधि आहे हा (दुसरा पक्ष) ही असंगत आहे असे जाणावे. पण (कर्मकारक प्रधान) तव्य प्रत्यय विरोधामुळे स्वतंत्र अदृष्टार्थत्व नाहीं? अशी शंका घेतात - 'पण कर्मकारक प्रधान', 'ग्रामं गन्तव्य आहे' असें म्हटले असतां जसे गति क्रियेला ग्राम समवेत अतिशय साधनत्व आहे. तसे अध्ययनाला ही स्वाध्याय गत अतिशय हेतुत्व 'तव्य' प्रत्ययाने कळत असल्यामुळे स्वतंत्र अदृष्ट फलत्व कसें? असा अर्थ. पण 'सक्तून् जुहोति' येथील सक्तु प्राधान्य भंगा प्रमाणे स्वाध्यायांत ही क्रियाजनित अतिशयाच्या अनिरूपणामुळे प्राधान्य भंग पाहिजे असें सांगतो - 'नाहीं कारण' म्हणजे भाग्यत्याचें कार्य नाहीं? अशी आशंका असतां सांगतो - 'सक्तुन्यायानें' पण फलाच्या अश्रवणामुळे अध्ययनविधीला स्वतंत्र अदृष्टार्थत्व नाहीं? अशी शंका घेतात - 'पण अध्ययनाचें' पण 'य ऋचोऽधीते पयसः कुल्या अस्य पितॄन्स्वधा अभिवहन्ति' [तै. आ. २।१०।७] (जो ऋग्वेदाचे अध्ययन करितो त्याच्याकरितां स्वधा पितरांप्रत दु-

॥ विवरण ॥

ध्ययनांत अति देशकरून यमिसर्व न्यायाने (पू.मी. ४।३।१६) 'घृतकुल्यादि काम ~~स्वा~~ध्यायाने अध्ययन करो' असा फळाचा विपरिणाम होतो. संस्कारकर्मत्वाचा अभाव असल्यामुळे तर फलश्रुतीचा अर्थवादत्व नाही. पण अदृष्टार्थत्व असतां ही स्वाभाविक अर्थावबोध ~~साम~~ध्यानेच काय होणे आहे. नाही कारण ~~विध~~ निर्हरणादि कार्यांमध्ये विनियुक्त मंत्रांना अर्थविवक्षेचा प्रतिबंध दिसतो. म्हणून आम्नायाला अर्थविवक्षेचा अभाव असल्यामुळे व विचार्यमाण अर्थाला (=धर्माला) प्रत्यक्षादिकांचे अविषयत्व असल्यामुळे व विचाराला प्रमाणक अनुग्राहकत्व असल्यामुळे निरालंबन धर्मविचार आ:

॥ विवरणव्याख्यान ॥

याच्या म्हणण्या ~~स्वर्ग (=हवि)~~ होऊन त्या नाश्ताव) इत्यादि मंत्रवादांत फलश्रुति होते. अशी आशंका असतां त्याला नित्यजपाध्ययनविधि फलत्व असल्यामुळे प्रथमाध्ययन विधिफलत्व नाही. असें सांगतात – 'अर्थवादांतही' फलश्रवण असिद्ध आहे असें सांगतो – 'तसें नाही' प्रथमाध्ययनांत = स्वाध्यायाच्या ग्रहणांत. पण "यस्य पर्णमयी जुहूर्भवति न स पापं श्लोकं शृणोति" इत्यादि फलश्रवणाला ज्याप्रमाणे अविद्यमान अर्थवादत्व आहे त्याप्रमाणे याला ही आहे. अशी आशंका असतां सांगतो – 'संस्कारकर्मत्वाचा'. विधि वाक्य विनियोग प्रमाणांनी संस्कार द्वार आहे. स्वाध्यायाला तर अतथात्व असल्यामुळे त्याच्या अध्ययनाला संस्कारकर्मत्व नाही. तसेंच त्याला अद्रव्यत्व असल्यामुळे क्रतूंत अंगत्व होणार नाही. म्हणून त्याच्या फलश्रुतीचा अर्थवादत्व नाही. इतराला तर वाक्यामुळे क्रत्वंगत्व सिद्ध असतां पर्णतादि (पलाशादि) फलश्रवणाचा अर्थवादत्व घडते असा अर्थ. पण श्रुतव्याकरणाला वैदिक पदश्रवणापासून अर्थप्रतीति उत्पन्न होत असते असे दिसते. म्हणून अर्थप्रायपूर्वक विचार प्रवृत्त आहे. अशी शंका घेतात – 'पण अदृष्टार्थत्व असतांही' 'अंगुल्यग्रे हस्तियूथशतमास्ते' इत्यादि वाक्यार्थ प्रतिपत्तीप्रमाणे आम्नायाने आम्नायार्थ प्रतिपत्ति घडते. अशा आशयाने सांगतो – 'नाही कारण विधिनिर्हरणादि' 'प्रतिबंध' = अभाव असा अर्थ. पूर्वपक्षाचा उपसंहार करितो 'म्हणून आम्नायाचा' स्वाध्यायाध्ययनाला अदृष्टार्थत्व असल्यामुळे असा 'म्हणून' शब्दाचा अर्थ. पण प्रधान प्रयोजन विचारासाठी स्वातंत्र्याने अर्थसाधकत्व असल्यामुळे आलंबन शोधण्याचा काय उपयोग? अशी आशंका असतां सांगतो – 'विचाराला'. विचाराला प्रमाणाने ~~क~~केलेल्या अर्थाच्या संभवनासंभवाच्या साधकत्व–

॥ विवरण ॥

– इत्थं करणपरत्व संभव नाही? असे (पूर्वपक्षाने) प्राप्त झाले. त्यावर हा विचार आरंभणीय आहे, असा सिद्धान्त आहे. कारण, त्याला स्वाध्यायाध्ययनविधीने प्रमित (= कळलेले) कर्तव्यत्व आहे. पण त्याला निरालंबनत्व सांगितले? नाही, कारण आम्नायाला आलंबनत्व आहे. पण हा अदृष्टार्थ दाखविला? नाही, कारण अध्ययनाला कर्मकारक प्रधानत्वामुळे स्वतंत्र अदृष्टार्थत्वाला अयोग आहे. पण कर्मकारकांत काही प्रयोजन बाळे असे सांगितले? नाही, कारण उभयाचीही उपपत्ति होते – अध्ययनाने दृष्ट द्वाराने स्वाध्याय प्राप्त केला जातो व सांगाध्ययनविधि सामर्थ्याकरने संस्कृत केल्या.

॥ विवरणव्याख्यान ॥

स्वाभाव्यामुळे अनुग्राहक प्रमाण सांगितले पाहिजे. नंतर नाही. म्हणून विचाराचा आरंभ नाही असा अर्थ. 'स्वाध्यायाध्ययनविधीने प्रमितकर्तव्यत्व' – 'अध्येतव्यः' यांतील 'तव्य' प्रत्ययाने सांगितले की शब्दप्रकरण, आम्नायापासून उपपन्न न होणारी पुरुषप्रवृत्ति लक्षण अर्थ भावनेचा उपलक्षक, तरी भाव्यावाचून अनुपपन्न आहे म्हणून जो अध्ययन संबंधाचा ग्राह होतो. त्याला फलवत् अर्थावबोधपर्यंतत्वाचा अभाव असतां भाव्यत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे अर्थावबोधपर्यंतता आक्षेपित केली जाते. अर्थनिर्णयाकरिता विचाराधीनत्व असल्यामुळे अध्ययनविधि विचाराच्या कर्तव्यतेला आक्षेपित करितो. असा अर्थ. पण स्वाध्यायाला अविवक्षितार्थत्व असल्यामुळे त्याच्या निर्णयाकरिता विचाराची प्रवृत्ति नाही. अर्थभावनाभाव्यत्व दुसरेच अर्थ ही आहे? अशा अभिसंधानाने शंका घेतो – 'पण त्याचा निरालंबनत्व'. गुरु अभिसंधीने उत्तर सांगतात – 'नाही कारण आम्नायाला' यथाश्रुत

(इति सिद्धान्तोपयुक्त अर्थाला सांग[illegible] उत्तरपक्षी)

ग्रहण करून शंका घेतो – 'पण हा अदृष्टार्थ'. सिद्धान्ती आपल्या अभिसंधीने उद्धार करितात – 'नाही कारण अध्ययनाला' पण क्रियाजन्य अतिशय शालित्व कर्मकारकत्व असल्यामुळे व स्वाध्यायांत अतिशयाचे निरूपण करिता येत नसल्यामुळे याला कर्मकारकत्व नाही? अशी शंका घेतो 'पण कर्मकारकांत' अतिशयाचे निरूपण असिद्ध आहे असे सांगतात – 'नाही कारण उभयाचीही' – अवाप्ति व संस्कार व रूप अतिशयाची असा अर्थ. त्याचेच विवरण करितात – 'अध्ययनाने'. 'प्राप्ति' स्वाधीन उच्चारणक्षमत्व. निष्पन्न करिता गुरूच्चारणाचा व्यापार अध्ययन असा विभाग. 'दृष्टद्वाराने' पुनः पुनः उच्चारणाने प्रथम पाद प्राप्त केला जातो. अनंतर अर्धऋचा, अनंतर पूर्ण ऋचा. अशा रीतीने क्रमाने सकल स्वाध्याय प्राप्त केला जातो असा अर्थ. 'स्वाध्याय' स्वशाखीय वेद असा अर्थ. 'सांग' प्राङ्मुखादि इतिकर्तव्यता सहित असा अर्थ. पण स्वाध्यायाला अविनियुक्तत्व असल्यामुळे संस्कार-

॥ विवरण ॥

(उपपत्ति.)

केल्या जातो - अशी. पण संस्कृताच्या विनियोगाच्या अभाव सांगितला? नाही कारण क्रतुविधीच्या ग्रहण प्रमाणावरून च विनियोग सिद्ध होतो. क्रतुविधि तर स्वविषयाच्या अवबोधाची आकांक्षा करणारा त्याच्या जनकतेने संस्कृत स्वाध्यायाचा ग्रहण करितो. पण ग्रहणप्रमाण ज्ञानाच्या जनकतेने स्वाध्यायमात्राचा ग्रहण करितो, संस्काराचा नाही? खरे आहे. अध्ययनविधि सामर्थ्यापेक्षा न ~~त्र~~ संस्कृत स्वाध्यायापासून उत्पन्न झालेल्या विशिष्ट ज्ञानवानाकडूनच अनुष्ठित याग अपूर्वाला उत्पन्न करितो, अशी कल्पना केली जाते म्हणून स्वाध्यायविधि सामर्थ्याला पहाणारा क्रतुविधि.

~~स्वविषय~~

विवरण व्याख्यान

(अध्ययनविधीचे) फल नाही? अशी शंका घेतो - 'पण संस्कृताच्या' विनियोगाभाव असे ~~ह~~ आहे असे सांगतात - 'नाही कारण' क्रतुविधीच्या अनुपपत्ति प्रमाणावरून असा अर्थ. पण स्वाध्यायावाचून क्रतुविधीचे अनुपपद्यमानरूप झाली पहात नाही? अशी आशंका असतां सांगतात - 'क्रतुविधि तर' कारण यज्ञकर्तव्यता ज्ञानाचा अभाव असतां अनुष्ठानाची अनुपपत्ति असल्यामुळे त्याचे ज्ञान अवश्य आहे; तें तर स्वाध्यायावाचून नाही. म्हणून संस्कृत स्वाध्यायाचा आक्षेप आहे असा अर्थ. पण स्वाध्यायमात्रापासून बोधाची उत्पत्ति होत असल्यामुळे संस्काराच्या आक्षेप नाही? अशी शंका घेतो - 'पण ग्रहण'? पण पाठकादिकाला स्वाध्यायाचे श्रवण असतां ही बोधाची अनुत्पत्ति असल्यामुळे स्वाध्यायमात्राला त्याच्या जनकतेने अभिधान करी? ह्यावर सांगतो - 'संस्काराला नाही?' संस्कारावाचूनही शिक्षादि सांग अध्ययनवानाला बोध मुळे आहे असा अर्थ. क्रतुविधि काय स्व-रूपाने संस्काराला आक्षेपित करीत नाही किंवा अन्यापेक्षेने ही? पहिल्या पक्षाच्या अंगीकार करितात - 'खरे'? दुसऱ्याला दूषित करितात - 'अध्ययनविधि', वाक्य पाठमात्रजनित ज्ञानाला अपूर्व प्रकारकत्व असतां (स्वाध्याये) लिखित पाठादि अवाप्त वेदोत्थ ज्ञानाला अपूर्वाप्रकारकत्व संभवत असल्यामुळे सांगाध्ययनविधान असणार नाही. तें तर आहे. म्हणून संस्कृत स्वाध्यायोत्थ ज्ञानाला ~~साला~~ अपूर्वजनकत्व आहे. असा अर्थ. तथापि क्रतुविधीला संस्कारोपकारकत्व कसे? ह्यावर सांगतात - 'म्हणून स्वाध्याय' 'विधिसामर्थ्याला' = सांगाध्ययनविधिसामर्थ्याला असा अर्थ. (अंगें = प्राङ्मुखादि) दृष्टादृष्ट-प्रयोजन कल्पनेपेक्षा स्वतंत्र अदृष्ट कल्पना श्रेष्ठ. अशा आशयाने उक्त शंकेचे स्मरण करितो-

॥ विवरण ॥

स्वविषयाच्या ज्ञानजनकतेनें संस्कृत स्वाध्यायाला ग्रहण करितो. पण स्वतंत्र अदृष्टाची कल्पना करावी. असें सांगितलें? नाहीं कारण स्पष्ट अक्षर स्वीकरणानें त्यांच्या पासून उत्पन्न झालेल्या ज्ञानादि संभवणाऱ्या अदृष्टाची संपत्ति असतां श्रुतविरोधानें कारकवैपरीत्य ग्रहण करून स्वतंत्र अदृष्ट कल्पनेची अनुपपत्ति आहे. आधानाप्रमाणें अनंग ही अध्ययनाला अनुपकारित्व विरुद्ध नाहीं. पण 'तव्य' प्रत्ययानें प्रकृत्यर्थ उपरक्त अपूर्व स्वतंत्र सांगितलें? तसें नाहीं. अपूर्वाभिधान असतांही भिन्न पदानें ग्रहण केलेल्या प्रकृत्यर्थोपरक्त अपूर्वाभिधानापेक्षा

॥ विवरणव्याख्यान ॥

'पण स्वतंत्र' "प्रमाणवन्त्यदृष्टानि कल्प्यानि सुबहून्यपि" असा न्यायमत आणि संधान करून समाधान करितात- 'त्यांचे कारण स्पष्ट' 'ज्ञानादि' यांतील आदि शब्दाचा प्रवृत्ति अर्थ आहे. 'श्रुतविरोधानें' 'स्वाध्यायोऽध्येतव्यः' येथें तव्य प्रत्ययानें कर्मकारकभूत स्वाध्यायाला प्राधान्य व अध्ययनाला त्याचे शेषत्व दिसत होतें त्याच्या परिणामानें स्वाध्यायाला (करणविभक्ति द्वारा कारकवैपरीत्यानें) गौणत्व ग्रहण करून अध्ययनाला स्वतंत्र अदृष्टार्थ कल्पना अयुक्त आहे. असा अर्थ. अध्ययनाला क्रतूच्या अंगत्वाचा अभाव असल्यामुळें त्याचे उपकारकत्व कसें? अशी आशंका असतां सांगतात- 'आधानाप्रमाणें'. पण अध्ययनाला स्वाध्यायाचे संस्कारार्थत्व 'तव्य' प्रत्ययाच्या विरुद्ध आहे? अशी शंका घेतात- 'पण तव्य प्रत्ययानें', पण अध्ययनाला अपूर्वद्वारानें फलसाधनत्व कशावरून? स्वाध्यायाच्या संस्कारद्वारानें फलसाधनत्व असो? अशी आशंका असतां सांगतो- 'स्वतंत्र' स्वाध्यायाशीं असंबद्ध असा अर्थ. तव्य प्रत्ययार्थ अपूर्वाचा प्रकृत्यर्थाशीं अन्वय आहे कारण त्यांना समान पदानें उपात्तत्व (गृहीतत्व) आहे, भिन्न पदानें गृहीत स्वाध्यायाशीं नाहीं. असा अर्थ. स्पष्टसाधनतादिकाला प्रत्यक्षत्व असल्यामुळें (क्रियेच्या सूक्ष्म रूपास) अपूर्वाला प्रत्ययार्थत्व नाहीं. असें सांगतात- 'तसें नाहीं' अंगीकार करून सांगतात- 'अपूर्वाभिधान असतांही' "सुप्तिङन्तं पदम्" [पा. सू. १.४.१४] या पाणिनी सूत्राप्रमाणें जरी 'अध्येतव्यः' हें एक पद आहे तरी "पदैर्गतो (ज्ञानें)" [ ] असा स्मरणामुळें 'बोधकपद' असा अर्थ करून प्रकृतीला क्रियावाचकत्व असल्यामुळें (कर्माभिधायी) 'तव्य' प्रत्ययाहून भिन्नत्व (भिन्नपदत्व) विदित आहे. व

॥ विवरण ॥

एकपदाने ग्रहण केलेले कर्मकारकगत अपूर्वाभिधान श्रेष्ठ आहे. 'भावार्थजन्य अपूर्व आहे, द्रव्यादिजन्य नाही' असे त्यावरूनच असो. समवायसंबंधाने जेथें कोठेंही संभवतो. 'अदृष्टार्थतेने' तर स्वाध्यायाचा अर्थ विवक्षेच्या अभावी असतां अध्ययनविधि-वाक्याला ही अदृष्टार्थत्वाने अर्थविवक्षेचा अभाव असल्यामुळे अध्ययनविधानच असणार नाही. म्हणून सांगाध्ययन-विधि प्रयुक्त अदृष्टाला स्वसमवायित्वाने अक्षरग्रहण, अर्थावबोध करून प्रवृत्यादि इष्टफल सापेक्षत्वामुळे स्वाध्यायाला स्वभावनिमित्त अर्थविबोध प्रतिबंधकाच्या अभावामुळे विवक्षितार्थ आम्नायाचा अवलंब करून धर्मविचार कर्तव्य आहे. असें सिद्ध झाले. म्हणून अशा रीतीने ते त्याचा अर्थ विवक्षेमुळे धर्मविचारावसर प्रदर्शनपर आरम्भांत सर्व के-

॥ विवरणापरिष्कार ॥

'तयोरेव कृत्यक्तखलर्थाः' असे [पा. सू. ३।४।७०] 'तव्य' प्रत्यय हा कर्मांतही स्मरण असल्यामुळे कर्मकारक स्वाध्यायाला (ए-कार्थबोधकत्वामुळे) त्याच्याशी एकपदाने गृहीतत्व आहे; तेथें 'तव्य' प्रत्ययाला स्वतः ग्रहण केलेल्या कर्मकारकाशी समवेत अपू-
शी (असमवेत अपूर्वाभिधान असतां)
परिहार करीतात - 'असें आहे तर' धर्म शब्दाचें तर वेदार्थांत प्रयोगाचें निमित्त सांगितले पाहिजे. रूढी तर नाही कारण कौत्यवेदनादिकांतही प्रयोगाची विप्रतिपत्ति (विवाद) आहे. आतां अन्वयव्यतिरेकावरून सिद्ध श्रेयःसाधनाला सांगणारा धर्म शब्द आहे. वेदार्थाचाही तत्साधनत्व असल्यामुळे धर्म शब्द तेथें प्रवृत्त होतो असें असल्यावर स्वाध्यायपाठावरून प्रतीयमान ब्रह्माला श्रेयरूपत्व असल्यामुळे धर्म शब्दाभिधेयत्वाचा अभाव आहे. म्हणून (धर्मग्रहणानें) सामर्थ्यावरून त्याचा त्याग केला असल्यामुळे धर्माला पुढें करूनच विचार युक्त आहे. अन्यथा आपाततः केल्या धर्म व ब्रह्माच्या संग्रहाच्या ज्ञापनाकरिता 'वेदार्थजिज्ञासा' असें म्हणावयास पाहिजे होतें असा भाव. अनुष्ठेयश्रेयःसाधनाप्रमाणें अननुष्ठेयश्रेयरूप हें ब्रह्म पदान्वयसामर्थ्यावरून विचाराच्या पूर्वी प्रतीत होत नाही. असें.

विवरणव्याख्यान

पण धर्म शब्दानें वेदार्थ विवक्षित असल्यामुळे त्याच्याही (धर्माच्याही) विचारयोग्यतेनें वेदार्थ उपाधींत विचार युक्त असल्यामुळे 'असें आहे तर' या परिहाराला आभासत्व आहे अशी आशंका असतां सांगतात - 'परिहार करीतात' सम्यक् परिहार काय सांगतात - 'धर्मशब्दाच्या' काय धर्म शब्द वेदार्थांत रूढीनें वर्तन करितो? किंवा गुणाच्या योगानें? पहिला पक्ष नाही असें सांगतात - 'रूढी तर' अविवाद प्रयोगाला रूढित्व असल्यामुळे न येथें प्रयोगाविषयीं विवाद असल्यामुळे वेदार्थांत त्याला रूढित्व नाही असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अनुवाद करीतात - 'आतां', वेदार्थांपर्यंत निश्चय आहे असें म्हणण्यास काय अभीष्ट आहे? काय वेदार्थ ब्रह्माचा त्याग? किंवा संग्रह? पहिला पक्ष अयुक्त आहे असें सांगतात - 'असें असल्यावर' धर्मशब्दाभिधेयत्वाभावाविषयीं हेतु सांगतात - 'श्रेयोरूपत्व' ~~'अन्यथा'~~ श्रेयःसाधन धर्म शब्दार्थ आहे. ब्रह्म तर श्रेयोरूप आहे म्हणून धर्म शब्दवाच्य नाही. असा अर्थ. दुसरा पक्ष बरोबर नाही असें सांगतात - 'अन्यथा आपात' ब्रह्माचें आपातप्रसिद्धि असिद्ध आहे अशी आशंका असतां सांगतात - 'अनुष्ठेयश्रेयःसाधनाप्रमाणें' कारण अनुभवाचा विरोध येतो.

॥ व्याख्यान ॥

आहे. व तसें असतां उत्तरसूत्रही 'चोदनालक्षणोऽर्थो धर्मः' असें, धर्माच्या स्वरूपांत विप्रतिपत्त्यां-च्या निरास पर अनुगुण होतें. अन्यथा वेदार्थांत विप्रतिपत्ति असतां त्यांच्या निरासाकरितां 'चोदना ~~लक्षणोऽर्थः~~

॥ विवरण ॥

म्हणे तर शास्त्र नाहीं. लक्षणसूत्रही धर्मविषयक आहे वेदार्थविषयक नाहीं असें सांगतात – 'व तसें असतां उत्तरसूत्रही' लक्षणतर लक्षणाच्या अन्य प्रसंगाविभ्रमनिरासपर असतें. तेथें तर धर्माच्या वेदनादिकांत प्रसक्त तेनें विप्रतिपन्न आहे. वेदार्थ नाहीं. म्हणून लक्षणाच्या कृतार्थत्वाकरितां धर्माचें लक्षित केला जातो असें सांगतात – 'धर्माच्या स्वरूपांत'. पण वेदार्थांतही काय अर्थवादलक्षण वेदार्थ आहे? किंवा चोदनालक्षण? अशा विप्रतिपत्त्या आहेत? त्यांच्या निरासाकरितां लक्षण सांगितलें जातें? म्हणून सांगतात 'अन्यथा वेदार्थांत'. मंत्र (अर्थवाद) दिकांत कार्याची अप्रतीति असल्यामुळे. व ज्ञानें तो प्रतीत होतो त्याच्या।

॥ विवरणव्याख्यान ॥

असा अर्थ. पण धर्मग्रहणसामर्थ्यावरून जिज्ञासा (एकदेशविषयत्व) पूर्वी सांगितलें 'व तसें असतां' येथेंही जर तेंच सांगितलें जातें तर पुनरुक्तिदोष येतो? अशी आशंका असतां सांगतात – 'लक्षणसूत्रही'. वेदार्थजिज्ञासेचा उपक्रम असतां त्याचेंच लक्षण येथें सांगावयास पाहिजे होतें. तुम-पादन नाहीं असा अर्थ. ~~[illegible] धर्मग्रहणसामर्थ्यावरून [illegible] एकदेशविषयत्व सांगितलें~~ यथेक्षण-सूत्र ~~[illegible] असें सांगितलें जातें [illegible] पुनरुक्ति नाहीं असें [illegible]~~ वेदार्थविषयक लक्षणाभिधान आहे? अशा शंकेचा निरास करितात – 'लक्षणतर' 'तेथें तर' वाक्यांत असा अर्थ: 'धर्माचें' येथील 'च'काराचें स्पष्टीकरण करितात – 'वेदार्थ नाहीं'. वेदार्थांतही विप्रतिपत्तीच्या संभवामुळे तिच्या निराकरणाकरितां लक्षणाभिधान युक्त आहे? अशी शंका घेतो 'पण वेदार्थांतही' ~~[illegible]~~ पक्षांत सूत्र अनुगुण आहे असें सांगतात – 'अन्यथा वेदार्थांत'. पुनः अर्थवादलक्षण वेदार्थ आहे? येथें काय कार्यरूप वेदार्थ असतां विप्रतिपत्ति-अभिप्राय आहे? किंवा स्वरूप असतां? किंवा उभयरूप असतां? पहिला पक्ष संभवत नाहीं असें सांगतात – 'मंत्रादिकांत' (दुसरा पक्षही नाहीं. कारण सिद्धापासून त्याची अप्रतिपत्ति आहे. तिसराही नाहीं कारण मंत्रादिकापासून उभयरूपाची अप्रतिपत्ति आहे. असा अभिसंधि) धर्मशब्दानें वेदार्थाचा विवक्षितत्व असल्यामुळे विप्रतिपत्तीच्या निरास संभवतो? अशा आशयानें शंका घेतो –

व्याख्यान

लक्षणो वेदार्थः" असे इद्रिक कारण धर्मग्रहण असतां वेदार्थ विप्रतिपत्तींच्या निरास करणें शक्य (चोदनयाहि ज्ञायते चोदनेन कथ्यतो) नाही. कसा? जेणेंहो चोदनालक्षण जो अर्थ तो धर्म असें धर्मत्व जाणविलें जातें तेणेंहो तोच

॥ विवरण ॥

अर्थ असतो" असा नियम असल्यामुळे येथें तशी विप्रतिपत्ति नाही असा भाव. पण धर्मग्रहण असतांही अर्थवादक-धर्मांच्या निराकरण करून वेदार्थाचें धर्मलक्षणत्व कां सिद्ध होणार नाही? त्यावर सांगतात- 'कारण धर्मग्रहण असतां' कारण (धर्मग्रहण असतां) वेदार्थातील विप्रतिपत्तींच्या निराकरणाच्या पूर्वाभासाच्या अभाव असल्यामुळे व धर्मातील विप्रतिपत्तींच्या निरासाच्या प्रसंग नस असल्यामुळे अप्रतिपन्न वेदार्थातील विप्रतिपत्तींच्या निरासाच्या ग्रहणाचा अवकाश नाही असा अर्थ. पण धर्म शब्दाचा वेदार्थांत प्रयोग असल्यामुळे त्यांच्या विप्रतिपत्तींचा निरास न निवार्ये तशा-न्याचा? अशी शंका येते. कसा? तेथें रूढीचा आश्रय करून तर धर्म शब्दाचा वेदार्थात प्रयोग नाही असें सांगितले. लक्षणेनेही नाही कारण अभिधेयाहून अन्याचा लक्ष्य असल्यामुळे वेदार्थाचा धर्मत्व नसण्याचा प्रसंग येतो. असा स्वार्थ प्रक्षेपाने (अजहल्लक्षणेन) तेथें प्रवृत्ति? किंवा शब्दमात्राचा संज्ञासंज्ञिसंबंधपरत्वाने उपयोग होय राहतो. त्यांत

विवरणव्याख्यान

कारणधर्म

'पण धर्मग्रहण असतांही' अध्ययन जाणल्याने उत्तर सांगतात- 'यावर सांगतात'. व्याख्यानाला अपेक्षित हेतू सांगतात- 'कारण वेदार्थातील' पूर्वपक्षी आपला आशय स्पष्ट करतो- 'पण धर्म शब्दाचा'. व्याख्यानांतील रूढीच्या लक्षणेच्या निरासाच्या अभाव प्रसंग असल्यामुळे त्यांच्या योगाने धर्म शब्दाच्या वेदार्थात प्रवृत्ति शंकेचा निरास करितात- 'तेथें रूढि' कारण धर्मत्वाचा विप्रतिपन्न प्रयोगत्व आहे असा अर्थ. लक्षणा कशा दूषित करितात- 'लक्षणेनेही' लक्षणा शब्दाने काय जहल्लक्षणा विवक्षित आहे? किंवा अजहल्लक्षणा? पहिला पक्ष बरोबर नाही असें सांगतात- 'कारण अभिधेयाहून'. 'गंगेवर घर आहे' येथें ज्याप्रमाणे गंगापदाचे लक्ष्य जे तीर त्याचा ज्याप्रमाणे गंगात्वाचा त्याग आहे. त्याप्रमाणे जहल्लक्षणा असतां धर्मपदाने लक्ष्यमाण वेदार्थाचा धर्मत्व राहणार नाही असा अर्थ. म्हणून दुसरा पक्ष किंवा संज्ञापक्ष परिशेष राहतो असें सांगतात - 'आत्मत्वां स्वार्थप्रक्षेपाने' = अजहल्लक्षणेन असा अर्थ 'संज्ञा' इत्यादि शब्दशेष

~~१००~~
६५०

॥ व्याख्यान ॥

वेदार्थ आहे अन्य नाही असें कळण्यास नाही. आतां पुनः जर (जो चोदनालक्षण अर्थ) तो धर्म (=तो धर्मनामक आहे) असा नामनामिसंबंध सूत्रानें सांगितला जातो तर तो अप्रक्रान्त व

निष्प्रयोजन आहे.

॥ विवरण ॥

स्वार्थप्रक्षेपानें तर नव्हे असें सांगतात - 'जें हें चोदनालक्षण' चोदनालक्षणाचें धर्मत्व सांगितलें असता किंवा धर्माला चोदना-लक्षणत्व (=प्रमाणत्व) असता वेदार्थ तर एवढाच आहे असें निर्णीत होत नाही. कारण चोदना व धर्म शब्दांना (सकळ) वेदांत त्याच्या अर्थाचें अभिधायित्व आहे. जसें जें चाक्षुष (प्रत्यक्ष) तें रूप असें म्हटलें असतां सर्व प्रत्यक्षात्मा रूप अर्थ आहे असें सांगितलें होत नाही. त्याप्रमाणें असा भाव. चोदनालक्षण अर्थात सूत्राचें धर्म संज्ञाविधिपरत्व निराकरण करितात - 'आतां पुनः जर' धर्म चित्रा त्याच्या प्रक्रमाच्या विरुद्ध नामनामिसंबंधाचें प्रतिपादन आहे असें सांगतात - 'तो अप्रक्रान्त' अनुपक्रान्तत्व असताही त्याचें अनन्यथासिद्ध फलभाव असतां सांगणें युक्त होतें. परंतु तें नाही असें सांगतात - 'तो निष्प्रयोजन' अशा प्रकारचें पु-

चाही

॥ विवरणव्याख्यान ॥

जसा अर्थ विशेषांत संकेतित आहे. तसा धर्म शब्दही वेदार्थांत संकेतित आहे असा अर्थ. त्यांत पहिल्या पक्षाला दूषित करितात - "तें तर स्वार्थप्रक्षेपानें" अजर लक्षणें धर्म शब्दाची वेदार्थांत प्रवृत्ति असतां त्याची इयत्ता सिद्ध होत नाही असें ~~[illegible]~~ सांगितलें. त्याविषयीं हेतु सांगतात - 'चोदनालक्षणाचा' ~~[illegible]~~ चोदना शब्दाचा वैदिकेतरव्यावृत्तित्व असल्यामुळें व धर्म शब्दाला श्रेयःसाध-नत्व असल्यामुळें वेदार्थाच्या इयत्तेची सिद्धि होत नाही असा अर्थ. 'आतां पुनः' येथें कोणाला नामत्व व कोणाला नामित्व विवक्षित आहे? अशी शंका असतां अभिप्राय सांगतात - 'चोदनालक्षण अर्थात' 'निराकरण करितात' - संज्ञा या दुसऱ्या पक्षाला उत्थापन करून निराकरण करितात असा अर्थ. 'अनन्यथासिद्ध' = त्याच्यावाचून दुसऱ्या रीतीनें सिद्ध न होणारा असा अर्थ. ~~[illegible]~~ अनावश्यक संबंधरूपी अर्थाला सांगणें अशा अतिप्रसंगाला दाखवितात - 'अशा प्रकारच्या ही' पण धर्म शब्दाच्या वेदार्थवाचकत्वाचा निरास केला असल्यामुळें 'त्यानें वेदार्थच सांगितला जातो' असें कसें म्हटलें? अर्थ म्हटला असतां अंगीकार केल्यामुळें विरोध नाही.

व्याख्यान

व अतिप्रसंगही प्राप्त होतोच. असे असताही कोणत्या रीतीने धर्मशब्दाने वेदार्थच सांगितला।

॥ विवरणव्याख्यान ॥

विपादन असताही हे प्रतिपाद्य आहे हें नाही असा नियम होणार नाही असें सांगतात – 'व अतिप्रसंगही' (धर्मशब्दाचा वेदार्थ (त्यामुळे धर्मनामत्व) वाच्यत्व) ते त्यांनी अंगीकार करून दूषण सांगतात – 'असें असताही कोणत्या रीतीनें' इ. भाव – चोदनालक्षणत्व वेदार्थत्व (त्यामुळे धर्मनामत्व) असता अर्थशब्दाचा वैयर्थ्य येते. कारण श्येनादिकांनाही चोदनालक्षणत्व व वेदार्थत्व असल्यामुळे त्यांच्या व्यावृत्तीची अनुपपत्ति येते. त्यांना अचोदनालक्षणत्व व अवेदार्थत्व असता (त्या दोहोंच्या) त्यांच्या योगानेच श्येनादिकांची निवृत्ति होते असल्यामुळे अर्थशब्दाचा वैयर्थ्य येतेच. लक्षण वाक्यांत अनुवादमात्राची अनुपपत्तीही आहे. प्रमाण प्रतिज्ञेत तरही अर्थशब्दाचा वैयर्थ्य येते. धर्मजिज्ञासापक्षांत तर प्रतिपाद्य चोदनाविषय श्येनादिकांची अनर्थत्वाने अधर्मत्व-सिद्धि प्रयोजन आहे. तसेंच चोदनाशब्द हो संपूर्ण वेदलक्षणापर म्हणावा लागेल. कसा? चोदनाशब्द सर्वही वेदभाग आहे? किंवा नाही? नाहीतर चोदनालक्षण अर्थ चोदनार्थ असे लक्ष्य लक्षणांत ऐक्यच येते.

॥ विवरणव्याख्यान ॥

असें सांगतात – 'अंगीकार करून' पण धर्मशब्दाचे वेदार्थवाच्यत्व अंगीकृत आहे तर 'कोणत्या रीतीनें' हें व्यर्थ आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात – 'भाव' पण श्येनादि यागांच्या व्यावृत्तीकरिता अर्थ पद आहे अशी आशंका असतां काय श्येनादिकांना चोदनालक्षणत्व व (त्यामुळे धर्मनामत्व) वेदार्थत्व आहे? किंवा नाही? असा विकल्प करून पहिला पक्ष दूषित करतात – 'कारण श्येनादिकांनाही' दुसरा दूषित करितात – 'त्यांना अचोदनालक्षणत्व' पण त्यांच्या (त्या दोहोंच्या) योगाने सिद्ध अर्थांचा अर्थशब्दाने अनुवाद केला जातो अशी आशंका असतां सांगतात – 'लक्षण वाक्यांत' दुसरे सूत्र लक्षणपर आहे या पक्षांत अर्थशब्दाचे वैयर्थ्य सांगून प्रमाणपरत्व पक्षांत ही सांगतात – 'प्रमाण प्रतिज्ञेत ही' धर्मपर्यायीत विचाराची प्रतिज्ञा असतां अर्थशब्द अर्थवान् कसा? अशी आशंका असतां सांगतात – 'धर्मविचार पक्षांत तर' अशा रीतीने सूत्रांत अर्थशब्दाचे वैयर्थ्य सांगून दुसराही दोष सांगतात – 'तसेंच चोदना' चोदनाशब्दाने सकल वेदलक्षणांत कोणता हेतु आहे? अशी शंका घेतो – 'कसा?' 'लक्ष्य लक्षणांस ऐक्यच येतें' याचा हा अर्थ – धर्मशब्दाने सांगितलेला वेदार्थ शब्दाने चोदनालक्षण।

॥ व्याख्यान ॥

जातो. असे वाटले जाईल तर तसे असतां चोदनालक्षणवेदार्थ आहे अर्थवादादिलक्षण नाही

॥ विवरण ॥

आहे तर तोही वेदभाग अर्थवान् आहे? किंवा निरर्थक आहे? अर्थवान् आहे तर अचोदनाभागाच्या अर्थ चोदनाप्रमेय कसे होईल? चोदनाव्यतिरिक्त वेदभाग अर्थशून्य असेल तर अर्थ व अनर्थवान् भागद्वय समुदाय वेदाचा अर्थ चोदनार्थ कसा होईल? म्हणून चोदनाशब्द सकल वेदलक्षणापर आहे असे होऊन 'चोदनालक्षणो वेदार्थः' या वाक्यात शब्दद्वय दूषण येते. अशा अभिप्रायाने येथे 'कोणत्याही रीतीने' असे म्हटले — असा. तसे असतां (प्रामाण्य)विचाराच्या पूर्वीच वेदाच्या प्रामाण्यामुळे अर्थवत्त्व निश्चय झाला असतां काय वेदार्थ चोदनालक्षण आहे? किंवा अर्थवादादिलक्षण? असा संशय असता. अर्थवादादिलक्षण नाही परंतु चोदनालक्षण वेदार्थ आहे. असे निर्णयपर सूत्र होईल. तें तर अनुपपन्न आहे. कारण (प्रामाण्यविचाराच्या पूर्वी) अर्थवत्त्वाला अनिश्चितत्व आहे. असे सांगतात - 'तसे असतां' व प्रथम सूत्रांत स्वाध्यायाच्या अर्थविवक्षेला दाखविले असल्यामुळे अर्थवत्त्वाचा निश्चय झाल्यामुळे त्याचा उद्देश करून

॥ विवरणव्याख्यान ॥

अर्थ सांगितला जातो. व 'चोदनालक्षण' येथेही तोच अर्थ सांगितला जातो — असा पहिल्या पक्षाचा अनुवाद करितात — 'आहे तर' विकल्पाला सहन करीत नसल्यामुळे हाही पक्ष साधु नाही असे सांगतात - 'तरी आहे' पहिल्या पक्षी अचोदनाभागाच्या प्रमेयाला चोदनाप्रमेयत्व व्याहत आहे असे सांगतात - 'अचोदनाभागाच्या' दुसऱ्या पक्षीं ही व्याघाताला सांगतात - 'चोदनाव्यतिरिक्त' इत्यादिकाने. 'अर्थ व अनर्थवान्' सविषयाने विषय वाक्यद्वय समुदायस्वरूप वेदार्थ आहे. असा अर्थ फलित सांगतात — 'म्हणून चोदनाशब्द' 'शब्दद्वय दूषण' अर्थशब्दाचे वैयर्थ्य व चोदनाशब्दाच्या (लक्षणेमुळे) स्वार्थ परित्याग असे दूषणद्वय असा अर्थ. पण वेदाच्या प्रामाण्याला मीमांसकाने मानले असल्यामुळे 'सिद्ध प्रामाण्यविचार होईल' हे इष्ट आहे. अशी आशंका असतां त्याचे सांगतात - 'तसे असता विचाराच्या' =प्रामाण्यविचाराच्या असा अर्थ. अनिश्चितत्व असिद्ध आहे? अशी शंका घेतात - 'पण प्रथम सूत्रांत' काय वेदप्रामाण्याच्या निश्चयपूर्वक अर्थवत्त्व निश्चित आहे? किंवा नाही? असा विकल्प करून दुसऱ्या पक्षीं दूषण सां-

॥ व्याख्यान ॥

अशा उत्तर लक्षणा (= अध्याया) प्रमाणे सिद्ध प्रामाण्य वेदार्थ विचार हा होईल. तेथें अनंतर

॥ विवरण ॥

लक्षण विधान युक्त आहे? नाही कारण प्रामाण्य अनिश्चित असतां अर्थ विवक्षेचा अयोग आहे. तथेंतर अध्ययनविधिप्रयुक्त ~~सर्व~~ अप्रामाण्य मात्र निराकरणाने अर्थविवक्षा दाखविली आहे. पौरुषेयत्व प्रमाणान्तर योग्य विषयत्वादि विविध अप्रामाण्य निराकरण करून तेथें प्रामाण्य व्यवस्थापित नाही. म्हणून अर्थवत्त्वाच्या अनिश्चयामुळे वेदार्थ चोदना लक्षण आहे असे ~~[illegible]~~ करणे शक्य नाही. आतां प्रथम सूत्र सामर्थ्यावरूनच अर्थवत्त्व अंगीकार करून जें लक्षण विधान त्यावर सांगतात- तेथें अनंतर प्रामाण्य प्रतिपादन युक्त होत नाही? पण त्याच्याच दृढीकरणाकरितां पुनः प्रतिपादन आहे? नाही कारण अर्थवत्त्व निश्चित असतां दृढीकरणाच्या प्रयोजनाचा अभाव आहे. अनिश्चित असतां तर लक्षणाची प्रवृत्तीच अभाव आहे. पण वेदप्रामाण्यानेच हे वेदार्थत्वामुळेच प्रतिपादन आहे. वेदाच्या अर्थवत्त्व निश्चयाकरिता

" विवरण व्याख्यान "

सांगतात- 'नाही कारण' पहिल्या पक्षीं हा काय विधिप्रयुक्त अप्रामाण्यमात्राचे निराकरण आहे? किंवा सर्व प्रकारच्या अप्रामाण्याचे? असे विकल्प करून पहिल्याचा अंगीकार करीतात- 'तथेंतर' दुसऱ्याला दूषित करितात- 'पौरुषेयत्व' विरुद्धार्थत्वादि 'आदि' शब्दाचा अर्थ आहे. कारण सर्व प्रकारच्या अप्रामाण्याचे निराकरण प्रथम सूत्रांत उपलब्ध होत नाही असा अर्थ. पण सामर्थ्यावरून तेथें प्रामाण्य निर्दिष्ट आहे अशी शंका घेतो- 'आतां प्रथम सूत्र'. प्रथम सूत्रांतच प्रामाण्य सिद्ध असतां "तत्प्रमाणं बादरायणस्य" [पू. मी. १।१।५] इत्यादिकांनी पुनः प्रामाण्य प्रतिपादन व्यर्थ आहे असे सांगतात- 'त्यावर सांगतात तेथें'. पण सांगितलेल्याच्याच विस्ताराकरिता पुढील ग्रंथ असल्यामुळे त्याला वैयर्थ्य नाही! अशी शंका घेतो- 'पण त्याच्याच'. काय अर्थवत्त्व निश्चित असतां त्याच्या दृढीकरणाकरिता प्रारंभ आहे? किंवा अनिश्चित असतां? असा विकल्प करून दोन्हींचा क्रमाने निरास करितात- 'नाही अर्थवत्त्व कारण' पण प्रथम सूत्रांतच वेदप्रामाण्य सिद्ध आहे. एतद्यावरून उत्तरग्रंथांच्या प्रतिपादनाची अनुपपत्ति नाही. कारण कसे प्रमाणेच प्रामाण्या काही वेदार्थत्व असल्यामुळे त्याच्या प्रतिपादनाची उपपत्ति होते? अशी शंका घेतो- 'पण वेदप्रामाण्यानेच हे' ~~प्रामाण्याला~~

॥ व्याख्यान ॥ [पू.मी.भा.२।१।१]

प्रामाण्यप्रतिपादन युक्त होत नाही. 'वृत्तं प्रमाणलक्षणम्', असे भाष्यवचनही युक्त होत नाही. मंत्रार्थवादांतही कार्यार्थत्वाविषयीं विप्रतिपत्ति होणार नाही. तीतर पुढें त्यांचें निरसन केली जाते.

॥ विवरणव्याख्यान ॥

नहीं? नहि कारणे वेदप्रामाण्याला ही वेदार्थत्व असतां सिद्ध (अज्ञात्या) वस्तूंत (प्रामाण्यांत) (वेदाच्या) प्रामाण्याचा प्रसंग येतो. द्वितीयाध्यायाला प्रारंभ करणारे भाष्यकारही 'वृत्तं प्रमाणलक्षणम्' असें प्रथमाध्यायानें वेदाचें प्रामाण्य साध्य झाले आहे असे दाखवितात. ते वेदाच्या अर्थपरत्वनिश्चयपूर्वक विचारांत युक्त होत नाही. म्हणून द्वितीयसूत्रानें धर्मांत प्रमाण प्रसिद्ध ज्ञान किंवा लक्षण केलें जाते असें सांगतात- 'वृत्तं प्रमाणलक्षणम्' पुनः याच सूत्रांत मंत्र व अर्थवादांच्या धर्मांत अप्रामाण्याचें निराकरण असल्यामुळे अर्थवादाधिकरण अनपेक्षित होईल असें सांगतात- 'मंत्रार्थवादांतही' 'मंत्रार्थवादांतही'

॥ विवरण व्याख्यान ॥

प्रामाण्याला वेदार्थत्व असिद्ध आहे अशी शंका घेता येणार नाही कारण अध्ययनविधीनंतर अध्ययनाच्या फलपर्यंतच्या आकांक्षित वेदाला फलवान अर्थावबोधसामर्थ्य प्रतिपादन करितो. त्यानें वेदप्रामाण्याचा ही वेदार्थत्वाची उपपत्ति होते, असा अभिप्राय. प्रामाण्याला वेदार्थत्व असिद्ध आहे असें सांगतात- 'नहि कारणे वेदप्रामाण्यवादाही', प्रथमसूत्रांतच प्रामाण्याचें प्रतिपादन असल्यानें याही कारणानें पुढे अयुक्त आहे असें सांगतात- 'द्वितीयाध्यायाला' असा द्वितीय सूत्रार्थ नाही चोदनाप्रमाणकत्व आहे याविषयीं दुसरीही उपपत्ति सांगतात- 'पुनः याच सूत्रांत' 'अर्थवादाधिकरण' 'आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानां तस्मादनित्यमुच्यते' [पू.मी.१।२।१] हें या अधिकरणांतील प्रथम पूर्वपक्ष सूत्र आहे. सर्व वेदाला धर्मपरत्वानें अर्थवत्व असतां "वायुर्वै क्षेपिष्ठा देवता" इत्यादिकांनाही त्याप्रमाणें असलें पाहिजे. अन्यथा आनर्थक्य येते. असें यांत प्रतिपादन केलें आहे. तें तर द्वितीय सूत्रांतच धर्मांत त्यांचें अप्रामाण्यनिराकरण केलें असल्यामुळे युक्त होत नाही असा अभिप्राय. पण सिद्धबोधी मंत्र व वेदाच्या भागात धर्मांत प्रामाण्याची अनुपपत्ति असल्यामुळें त्यांना आनर्थक्य येते अशी आशंका असतां

॥ व्याख्यान ॥

म्हणून पूर्वोक्त न्यायाने कार्यनिष्ठच वेदभाग विचार्य ते ने प्रक्रान्त व विचारित आहे. वस्तुनिष्ठ नाही. म्हणून वस्तुतत्त्वनिष्ठ वेदभागाच्या विचार करण्याकरितां हें 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' असें आरंभ केलें जातें.

॥ असे व्याख्यानातील विस्तृत द्वितीयवर्णक समाप्त झाले ॥

॥ विवरण ॥

पणस्तावकत्वाने (विधीशी) अन्वयाच्या प्रकाराचे प्रतिपादन करण्याकरितां अधिकरण आहे? असें म्हणणे असत्यक नाहीं कारण येथेंच धर्मांचें अप्रामाण्याचें निराकरण असल्यामुळे धर्माच्या प्रतिपादकत्वाचें ~~उदय~~ येत ~~नाहीं~~ येथे पूर्वपक्षाचा उदय होत नाही. (प्रतिपादनाच्या) उपसंहार करितात - 'म्हणून पूर्वोक्त'

॥ असे विवरणातील विस्तृत द्वितीयवर्णक समाप्त झाले ॥

विवरणव्याख्यान

सोपयोगित्व दाखविण्याकरितां अधिकरणारंभ युक्त आहे? अशी शंका घेतां - 'पणस्तावकत्वाने' प्रयोगविधीचा अपेक्षित शास्त्र व अनुष्ठानोपयुक्त द्रव्य देवतादि कारणद्वारा त्यांना विधींत अन्वितत्व आहे असा अर्थ. तथापि पूर्वपक्षाचा अभाव असल्यामुळे अधिकरणाचा आरंभ होत नाही असें सांगतात - 'नाहीं कारण' म्हणून वेदान्तांना अगतार्थत्व असल्यामुळे वेदान्तमीमांसा शास्त्र आरंभ करण्यास योग्य आहे असें सिद्ध झाले अशा आशयाने सांगतात - 'उपसंहार करितात' त्या या अर्थाच्या अभिप्रायानें भाष्यकारांनीं 'वेदान्तमीमांसाशास्त्रस्य व्याचिख्यासितस्य' असें म्हटलें आहे. म्हणून हें ~~विस्तृत~~ द्वितीयवर्णक 'व्याचिख्यासितस्य' या भाष्यपदाचें विस्तृत व्याख्यान आहे असे जाणावें.

॥ असें विवरणव्याख्यानातील विस्तृत द्वितीयवर्णक समाप्त झाले

इति ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान
सविवरण व त्याच्या व्याख्याना सह
याच्यातील या वेदान्तमीमांसा शास्त्राच्या
अव्यवहित विषये वेदान्त विचार विषयक
विस्तृत द्वितीय वर्णक

अथ ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान

सविवरण व त्याच्या व्याख्याना सह

याच्यातील या वेदान्तमीमांसाशास्त्राच्या

अधिकार्यादि साधक जिज्ञासा सूत्रातील अथादिपदार्थ विचार रूपी

तृतीय वर्णक

॥ अथ अधिकार्यादिसाधकमथादिपदार्थविचारात्मकं तृतीयवर्णकभाष्यम्॥

अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥१॥

तत्राथशब्द आनंतर्यार्थः परिगृह्यते नाधिकारार्थः, ब्रह्मजिज्ञासाया अनधिकार्यत्वात्। मंगळस्यच वाक्यार्थे समन्वयाभावात्। अर्थान्तरप्रयुक्त एव ह्यथशब्दः श्रुत्या मंगळप्रयोजनो भवति। पूर्वप्रकृतापेक्षायाश्च फळत आनन्तर्याव्यतिरेकात्। सति चानंतर्यार्थत्वे यथा धर्मजिज्ञासा पूर्ववृत्तं वेदाध्ययनं नियमेनापेक्षते एवं ब्रह्मजिज्ञासाऽपि यत्पूर्ववृत्तं नियमेनापेक्षते तद्वक्तव्यम्। स्वाध्यायानंतर्यन्तु समानम्। नन्विह कर्मावबोधानन्तर्यं विशेषः। न। धर्मजिज्ञासायाः प्रागप्यधीतवेदान्तस्य ब्रह्मजिज्ञासोपपत्तेः। यथाच हृदयाद्यवदानानामानन्तर्यनियमः, क्रमस्य विवक्षितत्वान्न तथेह क्रमो विवक्षितः, शेषशेषित्वेऽधिकृताधिकारे वा प्रमाणाभावात्। धर्मब्रह्मजिज्ञासयोः, फळजिज्ञास्यभेदाच्च। अभ्युदयफळं धर्मज्ञानम्, तच्चानुष्ठानापेक्षम्। निःश्रेयसफळन्तु ब्रह्मविज्ञानं नचानुष्ठानान्तरापेक्षम्। भव्यश्च धर्मो जिज्ञास्यो न ज्ञानकालेऽस्ति, पुरुषव्यापारतंत्रत्वात्। इहतु भूतं ब्रह्मजिज्ञास्यं नित्यत्वान्नपुरुषव्यापारतंत्रम्। चोदनाप्रवृत्तिभेदाच्च। याहि चोदना धर्मस्य ळक्षणं सा स्वविषये नियुञ्जानैव पुरुषमवबोधयति। ब्रह्मचोदना तु पुरुषमवबोधयत्येव केवळं, अवबोधस्य चोदनाऽजन्यत्वान्न पुरुषोऽवबोधे नियुज्यते। यथाक्षार्थसन्निकर्षेणार्थावबोधे तद्वत्। तस्मात्किमपि-वक्तव्यं यदनंतरं ब्रह्मजिज्ञासोपदिश्यत इति। उच्यते- नित्यानित्यवस्तुविवेकः, इहामुत्रार्थफळभोगविरागः, शमदमादिसाधनसंपत्, मुमुक्षुत्वञ्च। तेषु हि सत्सु प्रागपि धर्मजिज्ञासाया ऊर्ध्वंच शक्यते ब्रह्म जिज्ञासितुं ज्ञातुंच न

विपर्यये । तस्मादथशब्देन यथोक्तसाधनसंपत्त्यानन्तर्यमुपदिश्यते । अतःशब्दो हेत्वर्थः । यस्माद्वेद एवाग्निहोत्रादीनां श्रेयःसाधनानामनित्यफलतां दर्शयति – "तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते" [छा. ८।१।६] इत्यादिः । तथा ब्रह्मविज्ञानादपि परं पुरुषार्थं दर्शयति – "ब्रह्मविदाप्नोति परम्" इत्यादिः [तै. २।१] तस्माद्यथोक्तसाधनसंपत्त्यनंतरं ब्रह्मजिज्ञासा कर्तव्या । ब्रह्मणो जिज्ञासा ब्रह्मजिज्ञासा । ब्रह्म च वक्ष्यमाणलक्षणं "जन्माद्यस्य यतः" इति । एत एव न ब्रह्मशब्दस्य जात्याद्यर्थान्तरमाशंकितव्यम् । ब्रह्मण इति कर्मणि षष्ठी न शेषे, जिज्ञास्यापेक्षत्वाज्जिज्ञासायाः, जिज्ञास्यान्तरानिर्देशाच्च । ननु शेषषष्ठीपरिग्रहेऽपि ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं न विरुध्यते, संबंधसामान्यस्य विशेषनिष्ठत्वात् । एवमपि प्रत्यक्षं ब्रह्मणः कर्मत्वमुत्सृज्य सामान्यद्वारेण परोक्षं कर्मत्वं कल्पयतो व्यर्थः प्रयासः स्यात् । न व्यर्थः, ब्रह्माश्रिताशेषविचारप्रतिज्ञानार्थत्वादिति चेन्न, प्रधानपरिग्रहे तदपेक्षितानामर्थाक्षिप्तत्वात् । ब्रह्म हि ज्ञानेनाप्तुमिष्टतमत्वात्प्रधानम् । तस्मिन्प्रधाने जिज्ञासाकर्मणि परिगृहीते यैर्जिज्ञासितैर्विना ब्रह्म जिज्ञासितं न भवति तान्यर्थाक्षिप्तान्येवेति न पृथक् सूत्रयितव्यानि । यथा राजासौ गच्छतीत्युक्ते सपरिवारस्य राज्ञो गमनमुक्तं भवति तद्वत् । श्रुत्यनुगमाच्च । "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" [तै. ३।१] इत्याद्याः श्रुतयः, "तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्म" इति प्रत्यक्षमेव ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं दर्शयन्ति । तच्च कर्मणि षष्ठीपरिग्रहे सूत्रेणानुगतं भवति । तस्माद्ब्रह्मण इति कर्मणि षष्ठी । ज्ञातुमिच्छा जिज्ञासा ।

अवगतिपर्यन्तं ज्ञानं सन्वाच्यायाः इच्छायाः कर्म। फलविषयत्वादिच्छायाः। ज्ञानेन हि प्रमाणेनावगन्तुमिष्टं ब्रह्म। ब्रह्मावगतिर्हि पुरुषार्थः, निःशेषसंसारवीजाद्यनर्थनिवर्हणात्। तस्माद्ब्रह्म विजिज्ञासितव्यम्।

॥ अथ जिज्ञासा सूत्रातील अधिकार्यादिकांना साधक अर्थाद्-पदार्थ विचार रूपी तृतीयवर्णक ॥

॥ व्याख्यान ॥

७११३४

अथाशेसीने (प्रथमवर्णकांत) सूत्राचे आदित्व कारणाने व सूत्रत्वाने विषय व प्रयोजन व त्यांच्या सिद्धीला करणारा अविद्यारूप वंध त्याच्या सामर्थ्यावरून कळलेला आहे असें प्राप्त करून आतां तेथे सूत्राचे सामर्थ्य दाखविण्याकरितां त्याचे पदशः व्याख्यान आरंभ करितात –

॥ विवरण ॥

'तत्राथ शब्दः' इत्यादि पदव्याख्यान भाष्याचे वृत्त संकीर्तन पूर्वक तात्पर्य सांगतात – 'अथातोतीनं' सूत्राच्या आदित्वाने

॥ विवरण व्याख्यान ॥

पण 'प्रथमवर्णकांत' सूत्रार्थ दाखविला असल्यामुळे भाष्यकार 'पदशः व्याख्यान आरंभ करितात' असे म्हणणे अयुक्त आहे" अशी आशंका असतां तात्पर्याच्या कथना प्रमाणे पदव्याख्यान ही कर्तव्य आहे. कारण "पदच्छेदः पदार्थोक्तिः" इत्यादि व्याख्यानाचे लक्षण आहे. अशा आशयाने सांगतात – 'तत्राथशब्दः इत्यादि' 卐

पण शास्त्राच्या फलाची सिद्धि असतां सामर्थ्यावरून त्याची इच्छा करणारा अधिकारी सिद्ध होतो. पुढील (अधिकान्याच्या सिद्धिपर) ग्रंथाचा काय उपयोगी असे म्हणणे असेल तर पुरुषबुद्धि मात्राला अधिकार निमित्तत्वाचा असंभव असल्यामुळे विशेषणान्तराची अपेक्षा आहे. म्हणून साधन चतुष्टय विशिष्ट अधिकान्याच्या निरूपणाकरिता वर्णकान्तराचा आरंभ युक्त आहे. व्यवहित व अव्यवहित विषय व फलसिद्धीच्या उत्तर समयी अधिकान्याचे उत्पादन सुकर असल्यामुळे पूर्वीक (प्रथम व द्वितीय) ~~(प्रथम)~~ व या वर्णकांत पौर्वापर्य आहे. येथे वेदान्त शास्त्र आरंभणीय आहे किंवा अनारंभणीय आहे असा विशिष्ट अधिकाऱ्याच्या संभव व असंभवाच्या योगाने संदेह घेतल्या जातो. त्या विशिष्ट अधिकाऱ्याविषयीं प्रमाणाचा अभाव असल्यामुळे शास्त्र अनारंभणीय आहे असा पूर्वपक्ष. 'परीक्ष्य लोकान्' [मुं. १।२।१२] 'शान्तो दान्तः' [बृ. ४।४।२३] इत्यादि वाक्यांच्या पर्यालोचनेने साधन चतुष्टय विशिष्ट अधिकारी प्रसिद्ध असल्यामुळे ते आ-

॥ अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥

भाष्य

तत्राथशब्द आनंतर्यार्थः परिगृह्यते नाधिकारार्थः ब्रह्मजिज्ञासायाः अनधिकार्यत्वात्॥

॥व्याख्यान॥

'तत्र' = या जिज्ञासासूत्रांत 'अथशब्दः' = अथशब्द 'आनंतर्यार्थः' = अनंतर अर्थात 'परिगृह्यते' = ग्रहण केला जातो. 'नाधिकारार्थः' = प्रारंभार्थी नाही. 'ब्रह्मजिज्ञासायाः अनधिकार्यत्वात्' = कारण ~~ब्रह्मजिज्ञासेला~~ ब्रह्मज्ञानेच्छेला अप्रारभ्यत्व आहे ~~= कारण ब्रह्मज्ञानाच्या इच्छेचा आरंभ केला जाऊं शकत नाही~~

प.पा. ५२।२

'तत्र' येथून 'अव्यतिरेकात्' येथपर्यंतचे भाष्य जिज्ञासा शब्दाला अवयवार्थत्वाने अर्थवत्त्व असतां युक्त होते. कारण अधिक्रियेला (प्रतिपादनाच्या प्रारंभाला) योग्य ब्रह्म-

---

॥विवरण॥

२३।२।१ (=सूत्रपदांमध्यें)

तेथें 'अथ' शब्दाचे लोकांत चार अर्थ वृद्धव्यवहारांत प्रयोगसामर्थ्यावरून प्रसिद्ध आहेत १ आनंतर्य, २ अधिकार (आरंभ) ३ मंगलाचरण ४ व प्रकृत अर्थाहून अर्थान्तरत्व. त्यांत इतर अर्थांच्याहून पर्युदासाने (अन्यार्थत्वाने) अथशब्दाने येथें आनंतर्य ग्रहण केलें जाते. या अर्थात 'अतश्च आनंतर्यार्थत्वे' याच्याहून पूर्वीच्या भाष्याचे तात्पर्य सांगतात - 'तत्र' येथून 'अव्यतिरेकात् येथपर्यंतचे भाष्य'

॥विवरणव्याख्यान॥

रंभणीय आहे असा सिद्धान्त, तेथें आनंतर्याच्या अभिधानमुखानें अधिकाराच्या समर्पणाकरिता हा अथशब्द आहे. असे प्रतिपादन करण्याकरिता भाष्यकार त्याच्या अधिकारार्थत्वाच्या (=प्रारंभार्थत्वाच्या) निषेध करीत आहेत. तो अनुपपन्न आहे; कारण एका शब्दाला अनेकार्थत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे अधिकारादि अर्थत्वाविषयीं शंका अवतीर्ण होत नाही. म्हणून भाष्य व त्याचे व्याख्यान असंगत आहे? अशी आशंका असतां तात्पर्य सांगतात - 'तेथें अथ शब्दाचे' 'तेथें' = सूत्र

तृतीयवर्णक

3 ~~६७४~~

॥ व्याख्यान ॥

ब्रह्म किंवा त्याच्या ज्ञानाचा (~~आत्मस्वरूपाचा~~) यांत (=अवयवार्थांत) प्राधान्याने निर्देश नाही

॥ विवरण ॥

१३२८५ सांगतो —

पण येथें इतर अर्थांचा पर्युदास (=त्याग) ~~करतो~~, जिज्ञासाशब्दाला अवयवार्थाने अर्थवत्त्व असतां इच्छेला कर्तव्यतेने प्रारंभार्थत्वाची अनुपपत्ति असल्यामुळे व प्रत्यधिकरणांत तिला प्रतिपादन केलें नसल्यामुळे अथ शब्द अधिकारार्थ नाही. ब्रह्मज्ञानेच्छेचे मंगलाचरणार्थत्व प्रसिद्धतर असल्यामुळे तो मंगलाचरणार्थीही नाही. अप्रसिद्धत्व असतांही प्रशंसापरत्वाने अर्थवादत्व प्रसंग येत असल्यामुळे सूत्राचा मंगलाचरणार्थ नाही. इच्छेचा कोणत्यातरी अर्थाहून अर्थान्तरभाव प्रसिद्धतर असल्यामुळे त्याला ही सांगण्यात प्रयोजन नाही. म्हणून अथशब्दाचे हे तीन अर्थ नाहीत. पण इच्छेचे कोणत्यातरी अर्थाहून आनंतर्य ही प्रसिद्ध आहे. बरें आहे. येथें

॥ व्याख्यान ॥

इतर अर्थांच्या (=त्यागाचे)

=सूत्रपदांमध्ये असा अर्थ, पर्युदासाचे पुढे आल्यात प्रतिपादन केले असले तरी व्याख्यानेवाच्य व्हावा म्हणून संक्षेपाने त्याला येथे दाखविण्याकरिता आकांक्षेला अवतीर्ण करितात - 'पण येथें' काय जिज्ञासा शब्दाच्या यौगिकत्वाला (=अवयवत्वाला) ग्रहण करून अधिकारादि अर्थत्व मानले जाते किंवा रूढीला? पहिल्या पक्षात दूषण सांगतात - 'जिज्ञासाशब्दाला' इच्छेचा आरंभ म्हणजे कार्य सिद्धीकर्तव्यता? किंवा प्रतिपाद्यता? पहिला पक्ष बरोबर नाही कारण इच्छेला विषयसौंदर्यलभ्यत्व आहे अशा आशयाने सांगतात - 'इच्छेला कर्तव्यतेने' दुसरा पक्षही बरोबर नाही असे सांगतात - 'प्रत्यधिकरणांत' पूर्वपक्ष व सिद्धान्तांनी इच्छेचे प्रतिपादन प्रत्यधिकरणांत दिसत नाही असा अर्थ. मंगलार्थत्वाला दूषित करितात - 'ब्रह्मज्ञानेच्छेचे' प्रसिद्धतरत्व असल्यामुळे त्याला सांगण्यात प्रयोजन नाही असा अर्थ. प्रसिद्धतरत्व मोहामुळे असिद्ध मानणाऱ्याला सांगतात - 'अप्रसिद्धत्व' अर्थवाद इष्ट आहे अशी शंका घेतां येत नाही कारण सूत्राला न्यायाचे प्रतिपादकत्व आहे असा अर्थ. सूत्र प्रकृत अर्थाहून अर्थान्तरत्व 'अथ' शब्दाचा अर्थ आहे. या पक्षाला निरसित करितात - 'इच्छेचा ~~हे~~ तीन अर्थ नाहीत' - म्हणून परिशेषाने ~~इच्छेचा~~ अथ शब्दाला आनंतर्यार्थत्व आहे असा भाव. पण सामर्थ्याने सिद्धत्वामुळे आनंतर्य हीं निर्देशित करण्याकरिता योग्य नाही? अशी शंका घेतात - 'पण इच्छेचे' आनंतर्य मात्राच्या प्रसिद्धीच्या अंगीकार करितात - 'बरें आहे'

तृतीय·वर्णक

४

॥ विवरण ॥

आनंतर्याच्या अभिधानद्वारानें

१३२।१०

हेतुफलभावानें आनंतर्य विवक्षित असल्यामुळें पूर्वप्रवृत्त पुष्कलकारण 'अथ' शब्दानें सुचविलें आहे. पण ब्रह्मज्ञानांत प्रवृत्तिपर्यंत इच्छेच्या उदयसामर्थ्यावरूनच पुष्कलकारण अनुमानिलें जातें तेथें 'अथ' शब्दानें काय उपयोग? खरें आहे इच्छोदयप्रभृति इष्यमाण ज्ञानाच्या उदयपर्यंत कार्याच्या पुष्कलकारणतेनें पूर्वप्रवृत्त शास्त्रीय अधिकारिविशेषणाच्या प्रतिपत्तिपरत्व 'अथ' शब्दाला असल्यामुळें दोष नाहीं. त्याची प्रतिपत्तीही इष्यमाण ज्ञानांत प्रवृत्तिपर्यंत इच्छेच्या उदयद्वारानें प्रवृत्तीच्या अंगभावाला प्राप्त होते. त्यानें आनंतर्याच्या अभिधानद्वारानें प्रवृत्तिनिमित्त विशिष्ट इच्छेच्या उदयप्रभृति ज्ञानाच्या उदयपर्यंत १३२।१८ कार्याच्या पुष्कलकारणतेनें पूर्वसिद्ध साधनचतुष्टयाला सुचविण्याकरितां आनंतर्यार्थ अथशब्द आहे असें याचें मूळ.

॥ विवरण व्याख्यान ॥

मग 'अथ' शब्द व्यर्थ आहे? त्यावर सांगतात- 'येथें हेतुफलभावानें', येथें तर मुख्य आनंतर्य प्रतिपाद्य आहे व तें हेतुफलभावांत असतें. कारण हेतुफलभावांत आनंतर्य अव्यभिचारामुळें व अव्यवधानामुळें मुख्य आहे असा अर्थ. तथापि त्याचें अभिधान व्यर्थ आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'आनंतर्याच्या अभिधानद्वारानें' पण पुष्कलकारण हें कार्यलिंगावरून अनुमित असल्यामुळें त्याकरितां 'अथ' शब्दाची अपेक्षा नाहीं? अशी शंका घेतात. 'पण ब्रह्मज्ञानांत' अनुपपत्तीचा अंगीकार करितात- 'खरें आहे' मग 'अथ' शब्दाचें वैयर्थ्य आहे? यावर नाहीं असें सांगतात- 'इच्छोदय' शास्त्रीय विशेषणाची प्रतिपत्ती ही कशाकरितां? त्यावर सांगतात- 'त्याची प्रतिपत्तीही'. जें हें पूर्वप्रवृत्त पुष्कलकारण त्याचें शास्त्रीयत्व ज्ञानाच्या अभावें असतां त्यानें निःसंदिग्ध प्रवृत्ति होणार नाहीं. कारण शास्त्रानें त्याच्या अग्रहणाच्या शंकेचा संभव आहे. म्हणून शास्त्रीय अधिकारिविशेषणाचें समर्पण करितें 'अथ' शब्द आहे असा अर्थ. पण तें शास्त्रीय विशेषण कोणतें? अशी आशंका असतां सिद्धान्त करून [illegible] मताचा उपसंहार करितात- 'त्यानें आनंतर्याच्या' अधिकारिविशेषणाच्या ज्ञानाला प्रवृत्तीचें उपयोगित्व 'त्यानें' शब्दाचा अर्थ. १३७।५

१३७।६

'पण हा जिज्ञासा शब्द' या व्याख्यानानें जिज्ञासा शब्द विचारांत रूढ आहे असें सांगितलें. परंतु तेथें अवयववृत्तीनें अ-

॥ व्याख्यान ॥

५।२४

व प्रधान असा इच्छेचा अनधिकार्य (=अप्रारभ्य) त्व आहे. पण हा जिज्ञासा शब्द मीमांसापरपर्याय विचाराला सांगणारा अभियुक्तांकडून प्रयुक्त आहे "इदमेतो जिज्ञास्यन्ते किं क्रतुगुणकमुपलक्षणं स्वामिकर्म उतर्त्विक्कर्म" असा "इदं तु जिज्ञास्यं किन्नु स्वत्विंमौ- २१ लप्यतापकौ वक्तव्यात्मनो भेदावुत जात्यन्तरम्" असा. धर्ममीमांसाभाष्यकारही जिज्ञासापदातील अवयवसंघाताचा "धर्मं जिज्ञासुमिच्छेत्" अशा रीतीने (विचारार्थक) वाचकत्वाने योजितात. कारण विचाराला संघाताचे वाच्यत्व आहे. अन्यथा 'धर्मं ज्ञातुमिच्छेत्' असे बोलले असते.

॥ विवरण ॥

३२।२

पण विचारात रूढ जिज्ञासा शब्दाचे अवयवार्थाने अर्थवत्त्व कसे ग्रहण केले जाते? कारण "रूढिर्योगमपहरति" असा न्याय आहे? असा आक्षेप घेतो 'पण हा जिज्ञासा शब्द' येथून आरंभ करून 'सांगतो' यांच्यापूर्वील ग्रंथाने.

ता. दी. २-३८।१०

जिज्ञासा शब्दाला विचारवचनत्व रूढ कसे? अशी आशंका असतां तसा तो वृद्धांकडून प्रयुक्त असल्यामुळे असे सां-

~~ता. दी. २-३८।१०~~ पू.पा.— ५२।४

गतो- 'मीमांसापरपर्याय' प्रयोगाला दाखवितो- 'इदमेतो' 'क्रतुगुणकम्' = क्रत्वंग उद्गीथादिविषयक असा अर्थ. जीवन संसार 'तप्यतापक' शब्दाचा अर्थ आहे. 'संघातवाच्य' = अखंड शब्दाचा असा अर्थ. तथापि त्याला विचारार्थत्व कसे? त्यावर सांगतो- 'कारण विचाराला' सांगितलेल्या अर्थाचे व्यतिरेकमुखाने उपपादन करितो 'अन्यथा' जिज्ञासा शब्दाला अवयवशक्तीने अर्थवत्त्व असतां 'धर्मं जिज्ञासुमिच्छेत्' हे अनुपपन्न आहे. कारण जिज्ञासा शब्दा- ॥

॥ विवरणव्याख्यान ॥

येथील प्रतिपत्ति संभवत असतां रूढिपक्षाच्या आश्रयाने प्रारंभादि अर्थत्वाची आशंका कशी? अशी आशंका असतां सांगतो- 'पण विचारात' ~~आ~~ संपूर्ण ग्रंथाचा तात्पर्यार्थ सांगून अजांप्रत्यक वाक्याचा आक्षेपपूर्वक सांगतो- 'जिज्ञासा शब्दाचे' 'क्रत्वंग उद्गीथादिविषयक' म्हणून असा विचार करितात की काय क्रत्वंग उद्गीथादि विषयक उपासन काय स्वामीचे कर्म आहे? किंवा ऋत्विगाचे? असा अर्थ. 'जिज्ञासा शब्दाने' - जिज्ञासा शब्दातील 'सन्' प्रत्ययाने असा अर्थ.

तृतीयवर्णक

६

॥ व्याख्यान ॥

म्हणूनच 'धर्माय जिज्ञासा धर्मजिज्ञासा' अशा रीतीने संघातांचे अर्थवत्त्व अंगीकार करून चतुर्थी समास दाखविला आहे. व त्याच्या अनुसारच ही पुढील भाष्यें आहेत. 'एवं वेदवाक्यान्येवैभिर्विचार्यन्ते' 'वेदवाक्यानि विचारयितव्यानि' 'कथं वेदवाक्यानि विचारयेत्' [पू.मी.भा.१।१।१] अशी. पुनः ही 'क्रत्वर्थपुरुषार्थयोर्जिज्ञासा' 'क्रत्वर्थपुरुषार्थौ जिज्ञास्येते' [पू.मी.भाष्य] अशी. येथेंही भाष्यकार सांगणार आहेत "तस्माद्ब्रह्म विजिज्ञासितव्यम्" [ब्र.सू.भा.१।१।१] असे. पुनः ही 'वेदान्तवाक्यमीमांसा तदविरोधितर्कोपकरणा निःश्रेयसप्रयोजना प्रस्तूयते'

॥ विवरण ॥

ने इच्छेला सांगितले असल्यामुळे इच्छाविषयत्वाने दुसऱ्या इच्छेची प्रसक्ति होते. म्हणून 'धर्मं ज्ञातुमिच्छेत्' असे अभिधान झाले असते. असा अर्थ. वरील विषयींच दुसरे लिङ्ग सांगतो- म्हणूनच. कारण जिज्ञासाशब्दाचा यौगिकत्व असतां इष्यमाण ज्ञानाचा फलत्व सिद्ध होत असल्यामुळे त्याच्या निर्देशाची अपेक्षा नाहीं. व विषयाचा अनिर्दिष्टत्व असल्यामुळे षष्ठी समास होईल. विचारयितव्य असतां तर प्रयोजनाची अपेक्षा असतां चतुर्थीने प्रयोजनाचा निर्देश युक्त होतो. पुढे विचाराला सांगितले असल्यामुळे हा संदिग्धार्थ जिज्ञासापद त्याच्या विषयत्वाने व्याख्येय आहे असें सांगतो- त्याच्या अनुसारच- आम्ही सांगितलेल्या त्याच्या अनुसारच असा अर्थ. याच न्यायाला धरून दुसरीही वचनें सांगतो- पुनः ही 'क्रत्वर्थ'= क्रतुस्वरूपोपकारी प्रोक्षणादि 'पुरुषार्थ'= फलोपकारी प्रयाजादि. फलाच्या उद्देशानें केले जाणारे कर्म.

॥ विवरणव्याख्यान ॥

'विषयाला' ज्ञानाच्या विषयाला- धर्माला. 'षष्ठीसमास'= 'धर्मस्य जिज्ञासा ज्ञातुमिच्छा'= धर्माच्या ज्ञानाची इच्छा असा समास होईल. 'युक्त होतो' म्हणून 'धर्माय जिज्ञासा' येथे जिज्ञासा शब्दाच्या रूढीने विचार अर्थ सिद्ध होतो असा अर्थ. वरील अर्थाच्या पुष्ट्यर्थ दुसरीही वाक्ये दाखविलीत- पुढे 'सांगितलेल्या त्याच्या अनुसारच'= जिज्ञासा शब्दाच्या विचाररूपी अर्थाच्या अनुसारच असा अर्थ. 'याच न्यायाला'= वर सांगितलेल्या रूढि न्यायाला.

॥ व्याख्यान ॥

[ब्र·सू·भा·१।१।१] असें म्हणून संघाताला अर्थवत्व असल्यामुळे 'अथ' शब्दाला आरंभार्थता युक्त होते. अशारितीनें जिज्ञासा शब्द तर शास्त्राला सांगणारा आहे. त्याने (अथशब्दानें) ब्रह्म-जिज्ञासा अधिकृत = प्रारंभ केली जाते असें जाणावें.

S. ५२।१५

'सांगतो – हा जिज्ञासा शब्द अवयवार्थाच्या परित्याग करून केवळ मीमांसेकरिता

विवरण

फळ वधुकरण असे हें पुकार्य शब्दाचा अर्थ आहे. 'संघाताला अर्थवत्व असल्यामुळे' = अखंड शब्दाला = विचाराला लक्षित = बोधित करणें, या अर्थानें अर्थवत्व असल्यामुळे असा अर्थ 'म्हणून' शब्दाच्या अर्थाला सांगतात – 'अशा

त·२ ३८।१५ प·पा· ५३।१८ 5 १३२।२१

रीतीनें शास्त्राला' = मिमांसेस असा अर्थ. वाक्यार्थाला सांगतात – 'त्याने' 'सांगतो हा जिज्ञासा' इत्यादि परिहार आहे

१३२।२२

फ्रा हा आशय – चार शब्दप्रवृत्तीचे प्रकार आहेत. १ रूढी २ योग ३ गौण ४ लक्षणा. त्यांत रूढी – जसें वृद्ध-व्यवहारांत अभिधान अभिधेयाहून व्यतिरिक्ताची अपेक्षा न करितां प्रयोगसामर्थ्यावरून अखंड अभिधानाचा ~~अर्थ~~

विवरणव्याख्यान

पण 'रूढिर्हि योगमपहरति' यान्यायाच्या विरोधामुळे जिज्ञासा शब्दाच्या अवयवार्थत्वाचा आश्रय करून समाधान कसें केलें जाते? अशी आशंका असतां सांगतात – 'सांगतो हा जिज्ञासा शब्द इत्यादि परिहार आहे' योग्य परिहार आहे असा अर्थ.

१३८।१७ ~~१३२।२२ १३८।१७~~

परिहाराच्या प्रकाराला सांगतात – 'हा आशय'. न्यायाच्या विषयभेदाला दाखविण्याकरिता शब्दप्रवृत्तीच्या भेदाला दाखवितात – 'चार शब्दप्रवृत्तीचे' क्रमानें त्यांनाच स्पष्ट करितात – 'त्यांत रूढी' अखंड अभिधानाचा अभिधेयाशी संबंध रूढी असें म्हटलें असतां सांकेतिक शब्दांतही अतिव्याप्ति होईल त्याकरिता 'अभिधान अभिधेयाहून व्यतिरिक्ताची अपेक्षा न करितांच' असें म्हटलें. कारण सांकेतिक शब्दांत संकेताची अपेक्षा असते. यौगिक शब्दाच्या व्यावृत्तीकरिता 'अखंड' असें विशेषण आहे. त्याची प्रतिपत्ति कशी? अशी आशंका असतां 'वृद्धव्यवहारांत प्रयोगसामर्थ्यावरून' असें म्हटलें. येथें 'गाय' 'घर' इत्यादि उदाहरणे जाणावीत. (अनेकाभिधानशक्तिद्वारानें) विशिष्ट अर्थाचें अभिधान योग असें म्हटलें असतां 'रत्नसेना' इत्यादिकांत अतिप्रसंग

॥ विवरण ॥

~~[illegible]~~ अभिधेयाशी संबंध. योग- समासादिकाने एकपद्याला प्राप्त आलेल्या शब्दाचे स्वावयवगत अनेकाभिधानशक्तिद्वारा विशिष्टार्थाचे अभिधान. हे दोन्ही प्रकार मुख्यवृत्ति म्हटले जातात. गौण- स्वाभिधेय अर्थाहून अर्थान्तरांत गुणांच्या योगाने वृत्ति. लक्षणा- स्वाभिधेय अर्थाहून त्याच्या संबंधी अर्थान्तरांत वृत्ति. त्यांत अर्थान्तरांस रूढ एकार्थ शब्दाची अर्थान्तरांत ही योगवृत्ति संभवत असतां 'रूढिर्योगमपहरति' या न्यायाने योगाचा त्याग करून रूढीग्रहण केले जाते (जसे छागांत = बोकडांत रूढ अज शब्द आत्म्यांत यौगिक असला तरी येथे 'अजाला प्रसवे' असें म्हटले असता छागाचे ग्रहण केले जाते.) रूढि व योग या मुख्य वृत्तींचा संभव असतां गौणाचा

॥ विवरणव्याख्यान ॥

येथे त्याकरिता 'स्वावयवगत' असे म्हटले. वाक्याला अवयवपदांतील शक्तिद्वारा विशिष्टार्थाभिधायित्व आहे. 'त्याच्या व्यावृत्तीकरिता 'एकपद' हे विशेषण आहे. एकपद्याला हेतु सांगतात 'समासादिकाने' प्रत्यय आदि शब्दांचा अर्थ आहे. 'पाचक लावकादि' शब्द येथे उदाहरण आहेत. गौण व लक्षणेहून रूढी व योगाचे प्राबल्य दाखविण्याकरिता सांगतात- 'हे दोन्ही प्रकार'. 'अर्थान्तरांत वृत्ति गौण' असें म्हटले असतां ज्याकरता न करतांही अर्थान्तरांत वर्तमान गो शब्दाला गौणत्व येईल त्याकरिता 'स्वाभिधेय अर्थाहून' असें म्हटले. एवढेंच म्हटले असतां सोमशब्द चंद्रांत वर्तमान असतां उमासहितांकल्पांतही राहतो तेथे अतिव्याप्ति होते. त्याकरिता 'गुणांच्या योगाने व त्याच्या संबंधी' असें म्हटले. गौण लक्षणेत सांकर्य

(त्या गुणाने युक्त) असे म्हटले. व लक्षणेंत | अ

येऊ नये म्हणून त्याच्या गुणांच्या योगाने त्या गुणाने युक्त अर्थान्तरांत गौण, व त्याच्या संबंधी (= अभिधेयाला सोडून न राहणाऱ्या) दुसऱ्या अर्थांत लक्षणा असें म्हटले) पुढे केवळ सांगतात- 'त्यांत अर्थान्तरांस रूढ' अर्थान्तरांत रूढीने प्रवृत्त एका शब्दाचा अर्थान्तरांत योगवृत्तीने प्रयोग (= प्रवृत्ति) असतां काय रूढीच्या अवलंबनाने अर्थ ग्राह्य आहे किंवा योगाच्या अवलंबनाने? असा संशय असतां रूढ्यर्थ ग्राह्य आहे कारण त्याला अविलंबनाने बाधकत्व आहे. यासाठीच 'रूढिर्योगमपहरति' या न्यायाला अवसर आहे. असा अर्थ. येथे तर मुख्य किंवा अमुख्याच्या ग्रहणाची शंका असते तेथे मुख्याचेच ग्रहण व अमुख्याचा परित्याग असतो असें सांगतात- 'रूढी व योग'

मग 'जिज्ञासा' शब्दावरून विचाराच्या परित्यागाने इच्छेची प्रतिपत्ति कशी? त्यावर सांगतात—

॥ विवरण ॥

(लक्षणेचा) त्याग केल्या जातो. तेथें (प्रस्तुतस्थळीं तर) एका अर्थात शब्दाची क्लृप्त (अवयवशक्ति) सामर्थ्याने योगवृत्ति संभवत असतां तेथेंच त्याच शब्दाच्या शक्त्यंतरकल्पनानिमित्त कार्यान्तराचा अभाव आहे. पण 'पंकज' शब्दादिकांत योगरूढी अशारीतीने वृत्त्यन्तराची किंवा शक्तिद्वयाची कल्पना केली जाते? नाही कारण तेथेही योगवृत्तीनेंच अर्थाची प्रतिपत्ति होते. पण उत्पलादि (=चंद्रविकासी कमळादि) व त्यतराचा त्याग करून पंकज शब्दावरून तामरसांत (=सूर्यविकासी कमळांत) लौकिक प्रतिपत्ति दिसत असल्यामुळे शक्त्यंतरच कल्पनीय आहे? नाहीं कारण सामर्थ्य अविशेष असतां प्रयोगबाहुल्यावरूनही प्रथम प्रतिपत्ति दिसते. जसें व [illegible] अर्थास शक्तीच्या अधि·

॥ विवरणव्याख्यान ॥

'तेथें एका अर्थात' त्याविषयीं हेतु सांगतात- 'क्लृप्त सामर्थ्याने' = अवयवशक्तीवरून असा अर्थ. 'शक्त्यंतर' = रूढी. अखंड शक्ती तिच्या वाचून उत्पन्न न होणाऱ्या कार्याच्या अभावामुळे तिची कल्पना नाहीं असें असता क्लृप्त रूढीचा योगाहून प्राबल्य कल्पिलें जातें ही भाव अर्थ. पण पंकज शब्दादिकांत योगाचा संभव असला तरी जसा वृत्त्यन्तराचा आश्रय केला जातो तसाच येथे योगाचा संभव असला तरी रूढीची कल्पना केली जाते? अशी शंका घेतो- 'पण पंकज शब्दादिकांत' पण अप्रसिद्धत्वामुळे व कल्पनागौरव प्रसंगामुळे वृत्त्यन्तर कल्पना नाहीं? त्यावर सांगतो- 'किंवा शक्तिद्वयाची' पूर्वोक्त पक्षांत एका शब्दाची दोन शक्तींच्या योगाने एका अर्थात वृत्ति सांगितली. येथें तर अवयव शक्तीने अनेकार्थत्व व अखंड शक्तीने तामरसार्थत्व असा विभाग आहे. दृष्टान्त समान आहे असें सांगतात- 'नाही कारण तेथेंही' दृष्टान्ताचे समर्थन करितो- 'पण उत्पलादि' पंकज शब्द योगवृत्तीने तामरसाला बाधित करितो तर योगवृत्ति उत्पलादिकांत ही अविशेष असल्यामुळे पंकज शब्दावरून त्याची ही प्रतिपत्ति होईल. तेवढ्यावर ज्ञान होत नाही. म्हणून तामरसांत शक्त्यन्तर किंवा वृत्त्यन्तर आश्रयणीय आहे. अशा अर्थी. कल्पनागौरव प्रसंगामुळे वृत्त्यन्तरादि आश्रयणीय नाही. तामरसाच्या प्रतिपत्तीच्या अनुपपत्तीमुळे ही ते आश्रयणीय आहे. कारण प्रतिपत्तीची अन्यथा उपपत्ति होते असें सांगतात- 'नाही कारण'. त्याविषयी दृष्टान्त सांगतात- 'जसें नव अर्थांत' दिक्, दृष्टि, किरण, स्वर्ग, वज्र, [illegible], [illegible], वारि, भू, या नव अर्थांत असा अर्थ. अनन्यथासिद्ध कार्याच्या अभावामुळे शक्त्यंतर

५ व्याख्यान ५

प्रयुज्यमान दिसत नाही. तसे स्मरणही नाही. अवयवार्थाने अर्थवत्व संभवतां असतां समुदायाला अर्थान्तराची कल्पना कुठेही नाही. पण त्याची कल्पना करीत नाही. शिष्टांच्या प्रयोग दर्शनीक? नाही कारण ती अन्यथासिद्ध आहे.

५ विवरण ५

-शेष असतांही गोशब्दावरून सास्नादिमत् आकृतीत प्रयोगबाहुल्यावरूनच प्रथम प्रतीपत्ति होते म्हणून असा.
१३३।१२
क्लृप्तसामर्थ्यावरूनच (=प्रयोगबाहुल्यावरूनच) प्रयोगव प्रतिपत्तीचा संभव असतां अत्यन्तर कल्पना नाही असे सांगतात- 'सांगतो- हा जिज्ञासा शब्द अवयवार्थाचा परित्याग करून केवळ मीमांसेकरिता प्रयुज्यमान दिसत नाही' (=ग्रथाचा) २३८।८ ना.टी. त्याचा हा अर्थ- काय अभियुक्तांच्या उपक्रमावरून जिज्ञासा शब्दाला विचार वाचित्व विवक्षित आहे? किंवा निघण्टु इत्यादि कोशसहकृत उक्तीवरून? असे विकल्पद्वय हृदयांत ठेवून सांगतात- 'सांगतो' पहिल्या विकल्पाचा निरास करितात- 'हा जिज्ञासा शब्द' केवळ शब्दाचा अर्थ सांगतात- 'अवयवार्थाचा परित्याग करून'. अवयवार्थांच्या ग्रहणाने ही प्रयोगाची उपपत्ति होते. असा अभिसंधि. दुसऱ्या कल्पाच्या निरास करितात- 'तसे स्मरणही नाही'. पण योगाहून रूढीचा प्राबल्य असल्यामुळे योगवृत्तीचा परिग्रह (=स्वीकार) नाही? त्यावर सांगतात- 'अवयवार्थाने'. शिष्ट प्रयोगाने अवयवार्थाने अर्थवत्व संभवत नसल्यामुळे त्याला विचारार्थत्व आहे. असा आशयवान् प्रश्न करितो- 'पण आम्ही' हा हेतु असिद्ध आहे असे सांगतात- 'त्याचे कारण'. पण अवयवार्थ संसर्गच ना.टी. २३८।१० १३३।१४

५ विवरणव्याख्यान ५

नाही असा उपसंहार करितात- 'म्हणून क्लृप्तसामर्थ्यावरून' वर्णन केले त्या अर्थास व्याख्यानाला अवतीर्ण करितात- 'असे सांगतात' सांगते परिहार ग्रंथाचा आशय सांगून. आतां पृथक् वाक्यांच्या अर्थ सांगतात- 'त्याचा हा अर्थ' 'काय अभियुक्तांच्या' येथून 'हा हेतु असिद्ध आहे' येथपर्यंतचा ग्रंथ स्पष्टार्थ आहे. 'कसा' शब्दाने सुचविलेल्या अनुपपत्तीला दाखविती- 'पण अवयवार्थ' २४०।१६
पण जिज्ञासा शब्दाला यौगिकत्व असतां विचाराला अवयवार्थत्व नसल्यामुळे त्याला=जिज्ञासा शब्दाला विचारार्थत्व कसे?

॥ व्याख्यान ॥

अन्यथासिद्ध ~~का~~? जिज्ञासाशब्द अंतर्गीत विचारार्थ असल्यामुळे. तो असा — विचारपूर्वक

रून (=स्वाध्याय)

साध्यज्ञानविषयक ~~इच्छा~~ जिज्ञासाशब्दाने प्रतीत होते. उपदेशमात्र साध्यज्ञानविषयक नव्हे.

॥ विवरण ॥

योगवृत्तीने शब्दाने प्रतिपादन केल्या जाणारा विचार तर जिज्ञासा शब्दाचा अवयवार्थ नाही. तेव्हां त्याच्या ज्ञाना-

४४०।१८

चा क्लृप्त (योग) सामर्थ्यानेच अन्यथासिद्ध कसा? अशी आशंका घेतो - 'अन्यथासिद्ध कसा' 'अन्यथा'

१३३।१६

=अखंडशक्तीवाचून असाध्य). स्वतःला (=विचाराला) अवयवार्थत्वाचा अभाव असतांही अवयवार्थ संसर्गाला

ही (=च) (विचाराच्या)

नसोडताही ~~[illegible]~~ ठसणेने ~~[illegible]~~ प्रयोग व प्रत्ययाची उपपत्ति होत असतां शक्त्यन्तरकल्पना नाही. कारण अन-

(=शक्त्यंतर) १३३।१८

न्यथासिद्ध (=त्याच्याबाचून सिद्ध न होणे) कार्याचा स्वभाव आहे. असा परिहार करितात - 'जिज्ञासाशब्द' पण

(विचारांत ~~[illegible]~~ ठसण्याकरितां)

दृश्यमाण ज्ञानमात्र विचाराने अविनाभूत (=विचाराबाचून सिद्ध न होणारे) कसे? त्यावर सांगतात - 'तो असा'

१३३।१८

॥ विवरणव्याख्यान ॥

अशी शंका असतां काय जिज्ञासाशब्दाने विचारार्थात प्रकृति व प्रत्यय विचारके जातात? किंवा त्याकरितां शक्त्यंतराची क-

(निरास करितात) संबंध

ल्पना करावी असें सांगितले जाते? असा विकल्प करून पहिल्या पक्षाचे ~~[illegible]~~ - 'स्वतःला' लक्षणा करितां लिहितात सांगि-
अवयवार्थ संसर्गाला न सोडताही विचाराच्या लक्षणेने सिद्ध होण्याला ?

तात - "अवयवार्थ संसर्गाला ~~[illegible]~~ ~~अविनाभावाला (=त्याच्याबाचून सिद्ध न होण्याला)~~ पुढे विस्ताराने सां-

गितले असल्यामुळे त्यांची (=जिज्ञासाशब्दाच्या विचारांत प्रकृति प्रत्ययांची) असिद्धि नाही असा अर्थ. दुसऱ्या

~~नसोडता~~ ~~[illegible]~~ असाधारण शक्त्यंतर किंवा शक्तिद्वय अनन्यथा

पक्षाचा निरास करितात - '~~[illegible]~~' पण शक्त्यंतराची कल्पना नाही? त्यावर सांगतात - 'कारण अनन्यथासिद्ध' पण

~~[illegible]~~

अविनाभाव असिद्ध आहे? अशी शंका घेतो - 'पण दृश्यमाण' काय ज्ञानमात्राचा विचाराशी अविनाभाव आहे? किंवा वि-

४४१।२

शिष्ट ज्ञानाचा? पहिला पक्ष नाही असें सांगतो - 'ज्ञानमात्र' कारण घटादि (=वार्तादि) विषयांचा विचार दिसत नाही. म्हणून य

दुसरा पक्ष ही नाही असा अर्थ. निरूपकांना (=विचक्षणांना) ज्ञानविशेषाची विचाराशी अविनाभाव (=विचाराबाचून न त्या-

च्या अभावाची) प्रतिपत्ति दिसत असल्यामुळे अविनाभावाची असिद्धि नाही असें सांगतात - 'त्यावर सांगतात तो'

॥ १० व्याख्यान ॥

कारण असे प्रयोग व प्रत्यय दिसतात. त्याने जिज्ञासा शब्दाला अवयवार्थाने अर्थवत्व असल्यामुळे

॥ विवरण ॥

पण त्याविषयीं प्रमाण काय? तें सांगतात- 'कारण असे' ज्ञानंतर इष्यमाण विषयाशीं सह अवगत असलेले इच्छिले जाते. कारण अनवगत विषय अशा ज्ञानाच्या इच्छेचा अयोग आहे. व त्यामुळे प्रतिपन्न वस्तूत इष्यमाण ज्ञान संदिग्ध असतां निश्चयफळ, परोक्ष असतां अपरोक्षफळ इच्छिले जाते. तीतर दोन्ही प्रमाणादि विचार विषयक प्रयत्नसाध्य आहेत. म्हणून प्रतिपन्न वस्तूत इष्यमाण विशिष्ट ज्ञान प्रमाणादि विचाराचा अविनाभावाने (= त्याच्या वाचून सिद्ध होत नसल्याने) जाणिले. म्हणून विचारसाध्य ज्ञान असतां (जिज्ञासा शब्दाने विचारांत) प्रयोग व प्रत्यय होतात असा अर्थ. उपसंहार करितात- 'त्याने' ॥

॥ विवरणव्याख्यान ॥

उत्तार्थात कल्पक विचारतो- 'पण त्याविषयीं' विचारसाध्य ज्ञानेच्छा विषयत्वाने जिज्ञासा शब्द उत्तमवृद्धाकडून प्रयुज्यमान असल्यामुळे, व मध्यमवृद्धाच्याही तसा प्रत्यय असल्यामुळे त्याचा अविनाभाव आहे असें सांगतात- 'तें सांगतात- कारण'. अहेतूची असिद्धि मानणाऱ्याचें निराकरण करितात- 'ज्ञानंतर' ज्ञानाचे अनवगति असतां कामनेची अनुपपत्ति असल्यामुळे अवगति अंगीकार्य आहे. तेथेही विशेषणाची अवगति असतां विशेष्याची अवगति आहे केवळ नाही) असा विकल्प करून पहिल्याला अवतीर्ण करितात- 'विषयाशीं सह' दुसऱ्याच्या निरासानें पहिल्यांत हेतु सांगतात- 'कारण अनवगत' अनवगत आहे विषय ज्या ज्ञानाचा तें अनवगतविषय ज्ञान तेथे इच्छेचा अयोग असल्यामुळे असा अर्थ. पण विषय विशेषित ज्ञानाची प्रतिपत्ति असो, तथापि तेथें इच्छा अनुपपन्न आहे अशी शंका असतां सांगतात- 'व त्यामुळे'. आद्य ज्ञानाने संदिग्धतेनें विषयाची प्रतिपत्ति असतां तेथे निर्णयज्ञानाची कामना केली जाते. असंदिग्धतेने प्रतिपत्ति असतांही अपरोक्षज्ञानाची अभिलाष आहे. त्याने काय? त्यावर सांगतात- 'तीतर दोन्ही प्रमाणादि' प्रमेय आदि शब्दाचा अर्थ आहे. तथापि जिज्ञासा शब्दाने विचाराची सिद्धि कशी? त्यावर सांगतात- 'म्हणून प्रतिपन्न वस्तूत'. विचाराला साधनत्व असल्यामुळे विशिष्ट ज्ञानाला साध्यत्व असल्यामुळे त्यांचा अविनाभाव आहे, असा अर्थ. त्यामुळे व्याख्यान ग्रंथ उपपन्न आहे असें सांगतात- 'म्हणून'

" व्याख्यान "

ब्रह्मजिज्ञासाया अनधिकार्यत्वात्' असें युक्त ठरलें.

पण असें (= जिज्ञासा शब्दाचा अवयवार्थत्व) असतांही हें ~~कसामुळें~~ ? (= अथ शब्दाचा आनंतर्यार्थत्व) कशामुळें.— (विचारवाचक) शब्दावरून गुणत्व असलें तरी अर्थ-लक्षण प्राधान्यानें अंतर्णीत विचाराचा आश्रय करून (त्यावाचिंव) ब्रह्मसंस्थाच्या ज्ञाना (प्रतिपादना करितां) लाही अधिकार (= प्रारंभ) योग्यत्वामुळें अधिक्रियमाणत्व अंगीकार करून 'अथ' शब्दाला।

" विवरण "

पण प्रयोजनाभावामुळें इच्छाश्रम सूत्रानें प्रतिपादन केली जात नाही. परंतु इष्यमाण ज्ञानाच्या प्रदर्शनमुखानें त्याचें साधन अंतर्णीत विचाराला उपलक्षित करून तात्पर्यानें प्रतिपादन केल्या जातो म्हणून तात्पर्यानें प्रतिपाद्य विचार ज्ञानवक्तृत्वांत अनुपपत्तमाच्या आरंभा करितां अथशब्द आहे, असा आक्षेप घेतो। 'पण असें असतांही', त्याचाच विस्तार करितो - 'शब्दावरून गुणत्व' अधिकारयोग्यत्वामुळे तिथांपैकी

॥ विवरण व्याख्यान ॥

पण शब्दाच्या 'जिज्ञासा' अशा रीतीनें इच्छेला प्राधान्य करता असल्यामुळें कोणत्या रीतीनें विचाराकिंवा प्राधान्य आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'पण प्रयोजनाभावामुळें' शब्दतः प्राधान्य करत असलें तरी इच्छेला अप्रतिपाद्यत्व असल्यामुळें तिला अर्थतः प्राधान्य नाही असा अर्थ. मग काय प्रतिपाद्य आहे अशी पृच्छा असतां सांगतो- 'परंतु इष्यमाण'. जिज्ञासा शब्दाला अवयवार्थत्व असतांही 'अथ' शब्दाला आनंतर्यार्थत्व होऊ कशामुळें' अशा अपेक्षेला अर्थ इच्छेला अनारंभत्व असल्यामुळें त्याला आनंतर्यार्थत्व आहे? अशी आशंका असतां सांगतो- 'त्याचाच विस्तार' अर्थलक्षण प्राधान्यानें अंतर्णीत विचाराचा आश्रय करून त्याला अधिक्रियमाणत्व अंगीकार करून 'अथ' शब्दाला अधिकारार्थत्व आहे. तसें ब्रह्म व त्याच्या ज्ञानाला शब्दतः गुणत्व असलें तरी अर्थलक्षण प्राधान्यानें अधिकार योग्यत्व असल्यामुळें अधिक्रियमाणत्व अंगीकार करून 'अथ' शब्दाला अधिकारार्थत्व काय म्हणून ग्रहण केलें जात नाही? अशी योजना. अथशब्दाच्या आरंभार्थत्वानें

॥ व्याख्यान ॥

अधिकारार्थत्व काय म्हणून ग्रहण केले जात नाही? की ज्याने शब्दप्रमाण प्राधान्याने इच्छेच्या अनधिकार्यत्वामुळे आनंतर्यार्थत्वच ग्रहण केले जाते? सांगतो- शास्त्राच्या अना-

---

" विवरण "

